# वृषाली जोशी

# हर्क्युल पायरोच्या साहसकथा



# हर्क्युल पायरोच्या साहसकथा 3

## मूळ लेखिका – अगाथा ख्रिस्ती

## मराठी अनुवाद – वृषाली जोशी

© वृषाली जोशी
सर्व हक्क अनुवादिकेच्या स्वाधीन. या अनुवादातील कोणताही भाग कोणत्याही माध्यमातून प्रसिद्ध करण्यासाठी अनुवादिकेची पूर्व परवानगी घेण्याची आवश्यकता आहे.
दूरभाष ९९२१७४६२४५

**या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!**

# हर्क्युल पायरोच्या साहसकथा ३

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो.

मजा येते.

पण

तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हालाही आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना हे पुस्तक मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# हर्क्युल पायरोच्या साहसकथा ३

लेखिका : अगाथा ख्रिस्ती

अनुवादिका: वृषाली जोशी

चलभाष : ९९२१७४६२४५

इमेल – vrishalisjoshi@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

## प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

प्रकाशन : १३ डिसेंबर २०२१



©esahity Pratishthan®2021

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध .
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता .
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

हर्क्युल पायरोच्या साहसकथा २

कथांचा क्रम

अगाथा ख्रिस्ती

1. बुरखाधारी स्त्री
2. मार्सडन शेतघरातील शोकांतिका
3. पळवलेला पंतप्रधान
4. महानगरातील हिऱ्यांची चोरी
5. स्वस्त सदनिकेचे साहस
6. शिकाऱ्याच्या लॉजमधील गूढ

# अगाथा ख्रिस्ती



अगाथा ख्रिस्ती ही जगातील पुस्तक खपाचा उच्चांक गाठलेली व जिच्या लिखाणावर आधारित असे अनेक नाटक व सिनेमे निघाले, अशी प्रसिद्ध इंग्लिश लेखिका होती. सुमारे शंभर भाषांमध्ये तिच्या पुस्तकांचे अनुवाद झाले.

पहिल्या महायुद्धात ती परिचारिका म्हणून काम करत होती. तिची पहिली कादंबरी 'The Mysterious Affair of Styles' ही १९२० मध्ये प्रकाशित झाली. त्यात तिने हर्क्युल पायरो या गुप्तहेराची निर्मिती केली. पुढे २५ कादंबऱ्यांमध्ये तेच पात्र रहस्ये

सोडवत राहिले. ‘The Murder of Roger Ackroyd’ या १९२६ मध्ये प्रकाशित झालेल्या कादंबरीपासून मिस जेन मार्पल ही स्त्री गुप्तहेर पुढे आली व त्यापुढील ७५ कादंबऱ्यांमध्ये तीच रहस्ये सोडवत राहिली. Mousetrap [१९५२] हे तिचे नाटक पहिल्यांदा एका थिएटरमध्ये रंगमंचावर सतत २१ वर्षे चालले व त्याचे ८८६२ प्रयोग झाले. तर दुसऱ्या थिएटरमध्ये रंगमंचावर सतत २०२० सालापर्यंत चालू होते व त्याचे २८००० प्रयोग झाले. ‘And then There Were None’ यावर आधारित हिंदी सिनेमा ‘गुमनाम’ तुम्हाला नक्कीच माहिती असेल.

१९२० मध्ये आर्चिबाल्ड ख्रिस्ती या तिच्या नवऱ्याने घटस्फोट मागितला. तेव्हा ती नाहीशी झाली. यथावकाश ती सापडली व तिने १९३० मध्ये पुरातत्वशास्त्रज्ञ सर मॅक्स मॅलोवनशी लग्न केले. तिने अद्भुतरम्य कादंबऱ्याही लिहिल्या. उदाहरणार्थ, Absent in the Spring ही १९४४ मध्ये लिहिलेली कादंबरी.

तिच्या सहा गोष्टींचा अनुवाद प्रस्तुत पुस्तकात केला आहे.

THE VEILED LADY

# बुरखाधारी स्त्री



## एक

काही दिवसांपासून माझ्या लक्षात आले होते, की हर्क्युल पायरो अस्वस्थ आणि असमाधानी आहे. त्याची अवगामी तार्किक पद्धत व शहाणपणा वापरला जाईल आणि स्वारस्य वाटेल अशा केसेस अलीकडे आमच्याकडे आल्या नव्हत्या. आज सकाळी वर्तमानपत्र वाचतांना, त्याने 'आ --- क्शी' असा मांजर

शिंकल्यासारखा त्याचा आवडता आवाज अधीरपणे काढत, ते बाजूला फेकले.

"हेस्टींग्ज, तुझ्या इंग्लंडमधले गुन्हेगार मला घाबरतात. जेव्हा मांजर तिथे असते, तेव्हा चीजभोवती उंदीर घोटाळत नाहीत."

मी हसत म्हणालो, "मला वाटते, त्यांच्यापैकी बहुतेकाना तुझे आस्तित्वदेखील माहिती नसेल."

पायरोने नाराजी व्यक्त करत माझ्याकडे पाहिले. त्याला नेहमी वाटते, की सर्व जग हर्क्युल पायरोबद्दल विचार करत असते आणि बोलत असते. त्याने कीर्ती मिळवली आहे, यात काही संशय नाही. पण त्याच्या आस्तित्वामुळे गुन्हेगारी जग हादरून जात असेल, यावर माझा विश्वास नव्हता.

मी विचारले, "बॉन्ड रस्त्यावर दिवसाढवळ्या झालेल्या रत्नांच्या चोरीचे काय?"

पायरो बोलला, "बेकायदेशीरपणे, अचानक झालेली चोरी! पण माझ्याकडे न आलेली केस. वजन पडेल अशा नाजुकपणाचा धीट स्त्रोत! एका जड छडी घेतलेल्या माणसाने, एका सोनाराच्या दुकानाच्या खिडकीची काच फोडून अनमोल रत्ने लंपास केली. तेथील जागरुक नागरिकांनी त्याला ताबडतोब पकडले. पोलीस आला व त्याला मुद्देमालासकट अटक केली. पण मग असे

समजले, की त्याच्याकडील रत्ने खोटी होती. खरी रत्ने त्याने दुसऱ्या साथीदाराजवळ दिली होती --- वर उल्लेखलेल्या एका सक्षम नागरिकाला वाटले की तो तुरुंगात जाईल, हे नक्की. पण जेव्हा तो बाहेर येईल, तेव्हा त्याचे चांगले नशीब त्याची वाट बघत असेल. हो. ही कल्पना काही वाईट नाही. पण मी याहून चांगले काही करू शकेन. हेस्टींग्ज, काही वेळा मला खंत वाटते, मी इतका नीतीमत्तेच्या मागे असतो. थोडा बदल म्हणून कायद्याविरुद्ध काम करणे आनंददायी असेल."

"पायरो, उत्साहित हो. तुझ्या कामात निष्णात असा तू एकमेव असल्याचे, तुला माहिती आहे."

"पण माझ्या हातात जर ती केस नसेल, तर मी काय करणार?"

मी वर्तमानपत्र उचलले.

"इथे एका इंग्लिश माणसाची हॉलंडमध्ये गूढ रीत्या हत्या झाल्याचे आले आहे."

"असे ते नेहमीच म्हणतात --- आणि नंतर त्यांना असे सापडते, की त्याने डबाबंद मासे खाल्ल्याने तो नैसर्गिकपणे मरण पावला."

"ठीक आहे. जर तुला तक्रारच करायची असेल, तर!"

पायरो खिडकीशी चालत जात म्हणाला, “थांब, इथे रस्त्यात ते कादंबऱ्यांमध्ये जिला जाड बुरखाधारी म्हणतात, अशी स्त्री चालली आहे. ती पायऱ्या चढून येते व घंटी वाजवते. ती आपल्याकडे सल्ला मागण्यासाठी आली आहे. काही रुचीपूर्ण घडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. जर कुणी इतके तरुण व सुंदर असेल, तर कुणी काही मोठे कारण असल्याशिवाय बुरखा पांघरणार नाही.”

एका मिनिटाने आमची पाहुणी आत आली. तिने काळ्या स्पॅनिश लेसचा बुरखा काढल्याशिवाय, तिचे नाक डोळे दिसणे शक्य नव्हते. मग मला पायरोचा तर्क खरा असल्याचे जाणवले. ती बाई फारच सुंदर होती. केस छान होते आणि डोळे निळे होते. तिचे कपडे महागाईचे पण साधे होते. मी लगेच अंदाज केला, की ती समाजातील उच्च स्तरातील असणार.

ती स्त्री मृदु, सांगीतिक आवाजात बोलली, “मिस्टर पायरो, “मी खूप त्रासात आहे. तुम्ही मला मदत करू शकाल का, याबद्दलही मला खात्री नाही. पण मी अशा काही नवलपूर्ण गोष्टी ऐकल्या आहेत, की त्यामुळे माझी शेवटची आशा म्हणून तुम्ही काही अशक्य असे कराल, या भरवशावर मी तुमच्याकडे आले आहे.”

“बाईसाहेब, अशक्य ते करायला मला नेहमीच आनंद होतो. तुमचे कथन चालू ठेवा.”

आमची सुंदर पाहुणी कां कू करू लागली.

पायरो बोलला, “पण तुम्ही मोकळेपणे बोलले पाहिजे. कुठल्याही मुद्द्यावर तुम्ही मला अंधारात ठेऊ नका.”

ती मुलगी अचानक म्हणाली, “मी तुमच्यावर विश्वास ठेवते. व्हॅउघमच्या राजवाड्यातील मिलीसेंट बाईसाहेबांचे नाव तुम्ही ऐकले असेल?”

मी रुचीपूर्णतेने ऐकले. ती इंग्लंडमधील एका गरीब आयरिश समकालीनाची पाचवी मुलगी असल्याचे मला माहिती होते. त्यांच्याशी बरोबर जुळेल, अशा साउथशायरच्या उमरावाबरोबरील बाईसाहेबांच्या साखरपुड्याची बातमी गेले काही दिवस गाजत होती.

ती मुलगी पुढे म्हणाली, “मी मिलीसेंट आहे. तुम्ही माझ्या साखरपुड्याबद्दल ऐकले असेल. त्यामुळे मी जगातील सर्वात आनंदी मुलगी असायला हवी होते. पण अरेरे, मिस्टर पायरो, मी मोठ्या संकटात सापडले आहे. एक भयंकर मनुष्य आहे --- त्याचे नाव लॅव्हिंग्टन आहे. आणि तो तुम्हाला कसे सांगावे, ते मला कळत नाही. --- मी सोळा वर्षांची असतांना तो --- तो --- “

“तुम्ही या मिस्टर लॅव्हिंग्टनला पत्र लिहिले होते?”

“ओहो, नाही. त्याला नाही. एका तरुण सैनिकाला --- मला तो खूप आवडत होता --- तो लढाईत मारला गेला.”

पायरो दयाळूपणे बोलला, “मी समजू शकतो.”

“ते मूर्खासारखे पत्र होते. माझ्या भावना उघडपणे मांडणारे होते. अजून काही नाही. पण त्यात काही वाक्ये होती --- त्यांचा अर्थ कदाचित वेगळा लागू शकत होता.”

पायरो बोलला, “अस्स! आणि ते पत्र या लॅव्हिंग्टनच्या हाताला लागले आहे?”

“हो. आणि तो मला धमक्या देतो आहे. मला अशक्य अशा रकमेची तो मागणी करत आहे. नाहीतर तो ते पत्र माझे लग्न ठरलेल्या उमरावाला पाठवणार आहे.”

मी उद्गारलो, “घाणेरडे डुक्कर! मिलीसेंट बाईसाहेब, मी काय म्हणतो, हे सर्व तुमच्या नियोजित वराला सांगणे बरोबर ठरणार नाही का?”

“मिस्टर पायरो, मी असे करायला घाबरते. तो उमराव विशिष्ट स्वभावाचा आहे. संशयी, हेवादावा करणारा आणि हलक्या कानांचा आहे. कदाचित माझा साखरपुडा लगेच मोडला जाईल.”

पायरो दिसेल असे दुःख करत म्हणाला, “अग प्रिय मुली, मी तुझ्यासाठी काय करू शकतो?”

“मला वाटते, कदाचित मी मिस्टर लॅव्हिंग्टनला तुम्हाला भेटायला सांगते. मी त्याला सांगते की माझ्या वतीने या प्रकरणावर चर्चा करायचे अधिकार, मी तुम्हाला दिले आहेत. तुम्ही त्याच्या मागण्या कमी करता आल्या, तर बघा.”

“त्याने किती रकमेची मागणी केली आहे?”

“वीस हजार पौंड --- हे अशक्य आहे. मला हजार जमवणेही अवघड आहे.”

“तुझ्या होणाऱ्या चांगल्या लग्नाच्या जीवावर, तू कर्ज काढू शकतेस. पण त्या रकमेच्या अर्धी तरी तुला कर्जाऊ म्हणून मिळेल का, याची मला शंका वाटते. शिवाय --- मला ही अट मान्य करण्यासारखी वाटत नाही. नाही, हर्क्युल पायरोची हुशारी तुझ्या शत्रूचा पराभव करेल. या मिस्टर लॅव्हिंग्टनला माझ्याकडे पाठव. तो ते पत्र घेऊन येईल ना?”

मुलीने मान डोलावली. “मला असे वाटत नाही. तो फार काळजी घेणारा आहे.”

“मला खरे तर अशी शंका आहे, की ते त्याच्याकडे आहे तरी का नाही?”

“मी त्याच्या घरी गेले होते, तेव्हा त्याने मला ते दाखवले.”

“तू त्याच्या घरी गेलीस? अग, ते फार धसमुसळेपणाचे होते.”

“हो का? मी इतकी निराश झाले होते. मला वाटले, माझ्या नम्र विनंतीने त्याला दयेचा पाझर फुटेल.”

“ओहो, ला ला! या जगातील लॅव्हिंग्टन विनंतीने हलणारे नसतात. त्यामुळे त्याला समजले असेल, की तू त्या पत्राला किती महत्व देतेस. हा माणूस कुठे रहातो?”

“बौना व्हिस्टा! विम्बल्डन. मी तिथे अंधार झाल्यावर गेले --- “

पायरोने दुःखाने काही आवाज काढला.

“मी जाहीर केले की मी शेवटी पोलिसांना सांगेन. पण तो खुनशीपणे फसव्या पद्धतीने फक्त हसला व म्हणाला, “तुला काय पाहिजे, ते कर.”

पायरो पुटपुटला, “हो, हे पोलिसांचे प्रकरण नाही.

मुलगी बोलली, “पण मला वाटते, तुम्ही त्याच्यापेक्षा शहाणे असाल.

लॅव्हिंग्टनने सुरु ठेवले. ‘असे बघ, इथे या चिनी पेटीत --- तुझे पत्र आहे!’ त्याने ती पेटी अशी धरली, की ते पत्र मला दिसेल. मी

ती खेचायचा प्रयत्न केला. पण माझ्यासाठी तो फारच चपळ होता. भयंकर रीत्या हसत, त्याने ते पत्र दुमडून लहानशा पेटीत ठेवले. तो बोलला, “मी तुला खात्री देतो, ते इथे सुरक्षित असेल. आणि पेटी अशा हुशारीच्या जागी राहील, की तुला ती कधीच सापडणार नाही.” माझे डोळे भिंतीतील लहानशा तिजोरीकडे वळले. त्याने डोके हलवले व हसला. तो म्हणाला, ‘माझ्याकडे यापेक्षा चांगली तिजोरी आहे.’ “ओहो, तो फारच वाईट होता. मिस्टर पायरो, तुम्ही मला मदत करू शकाल, असे तुम्हाला वाटते का?”

“पपा पायरोवर विश्वास ठेवा. मी काहीतरी मार्ग काढतो.”

पायरो शूरवीरासारखा बोलला व त्याच्या अशीलाला जिन्यापर्यंत सोडण्यासाठी गेला, तेव्हा मला वाटले, की ही खात्री फार चांगली ठरली. पण ही कामगिरी आमच्यासाठी कठीण ठरणार होती. पायरो परतल्यावर मी त्याला तसे म्हणालो. तो उदासीनतेने पण विनोदी पद्धतीने हसला.

हो --- या समस्येची उकल स्पष्टपणे समजेल अशी दिसत नाही. या मिस्टर लॅव्हिंग्टनचा हात फारच बळकट दिसतो आहे. त्या वेळेपुरते मला कळले नाही, की आम्ही हे त्या गुंडाचे प्रकरण कसे हाताळणार आहोत.”

## दोन

.मिस्टर लॅव्हिंग्टन दुपारी आम्हाला भेटायला आला. मिस मिलीसेंटने त्याचे वर्णन फारच वाईट, असे जे केले होते, ते अगदी बरोबर होते. मला माझ्या बुटातून जरासे टोचल्यासारखी काही जाणीव अगदी नक्की होत होती, की ज्यामुळे मला त्याला जिन्यातून खाली ढकलून द्यावेसे वाटत होते. तो नको इतक्या जोराने व आक्रमकपणे बोलत होता, जादापणा करत होता आणि पायरोच्या शिष्टसंमत सूचनेचा धिक्कार करत होता. तो स्वतःला त्या परिस्थितीचा राजा समजत होता. पायरो त्याच्या प्रयत्नांची पराकाष्ठा करताना दिसत नव्हता. तो घाबरलेला व निराश वाटत होता.

लॅव्हिंग्टन त्याची टोपी घालत म्हणाला, “हे बघा लोकहो, आपली चर्चा निष्फळ होते आहे. ही केस अशी आहे --- मी मिलीसेंटसाठी थोडा खाली येईन, कारण ती फारच सुंदर बाई आहे.” तो दुष्टपणे बघत बोलला, “मी अठरा हजार म्हणतो. मी आज पॅरीसला जातो आहे --- मला तिथे थोडे काम आहे. मी मंगळवारी परत येईन. त्या दिवशी संध्याकाळपर्यंत मला पैसे मिळाले नाहीत, तर मी उमरावाला ते पत्र देणार. ती पैसे उभे करू

शकत नाही, वगैरे काहीही सबबी मला चालणार नाहीत. तिच्यासारख्या सुंदरीला --- तिने व्यवस्थित प्रयत्न केले, तर तिच्या मित्रांपैकी कुणी ना कुणी नक्की कर्ज देऊ शकेल."

माझा चेहरा पडला. मी पुढे सरसावलो. पण त्याचे वाक्य संपल्याबरोबर लॅव्हिंग्टन खोलीबाहेर पडला होता.

मी ओरडलो, "अरे देवा! काहीतरी करायला हवे. पायरो तुझी काही मात्रा चाललेली दिसत नाही."

"माझ्या मित्रा, तुला चांगले हृदय आहे --- पण तुझ्या मेंदूतील करड्या पेशी मात्र झिजत चाललेल्या दिसतात. मला माझ्या क्षमतेने मिस्टर लॅव्हिंग्टनवर भाव मारायची इच्छा नाही. तो मला जितके घाबरट समजेल, तेवढे बरे आहे."

"का?"

पायरो काहीतरी आठवत पुटपुटला, "मिलीसेंट येण्यापूर्वी काही वेळ मी कायद्याविरुद्ध काही काम करण्याची इच्छा बोलून दाखवली होती."

मी आश्चर्याने आ वासून म्हणालो, "तो घरी नसतांना तू त्याच्या घरावर डल्ला मारणार आहेस का?"

"हेस्टीग्ज, कधीकधी तुझ्या मानसिक प्रक्रिया फार भरभर चालतात."

“समजा, त्याने पत्र त्याच्याबरोबर नेले तर?”

पायरोने डोके हलवले.

“तशी शक्यता कमी आहे. त्याच्या घरात नक्की अशी एखादी लपवायची जागा असणार, जी कुणालाही सापडणार नाही.”

“आपण ते --- केव्हा --- करायचे आहे?”

“उद्या रात्री. आपण इथून अकरा वाजता निघू.

## तीन

ठरलेल्या वेळी मी निघण्यासाठी तयार झालो. मी एक गडद सूट व मऊ, गडद टोपी घातली होती. पायरोने माझ्याकडे नजर टाकली.

त्याने निरीक्षण केले, “तू तर पटाईत चोरासारखे कपडे केले आहेस. चल आपण भुयारी रेल्वेने विम्बल्डनला जाऊ.”

“आपण आपल्याबरोबर काही हत्यारे --- घर फोडण्यासाठी --- घ्यायची आहेत का?”

“माझ्या प्रिय हेस्टीग्ज, हर्क्युल पायरो अशा अर्धकच्च्या पद्धती अवलंबत नाही.”

मी सोडून दिले, दुर्लक्ष केले. पण माझी उत्सुकता जबरदस्त होती.

आम्ही बौना व्हिस्टा येथील उपनगरीय बागेत गेलो, तेव्हा मध्यरात्र झाली होती. घर अंधारी व शांत होते. पायरो सरळ घराच्या मागील बाजूस असलेल्या एका खिडकीकडे गेला. त्याने खिडकीचे तावदान उघडले व मला घरात प्रवेश करायला सांगितले.

मी कुजबुजलो, "ही खिडकी उघडी असेल, असे तू कसे काय ठरवलेस?" कारण खरे तर तो चांगला अंदाज वाटत नव्हता.

"कारण मी आज सकाळी येऊन ते पाहिले."

'काय?"

"पण, हो. ते फार साधे होते. मी फोन केला व खोटे कार्ड --- जापचे व्यावसायिक कार्ड वापरून असे सांगितले, की मला लॅव्हिंग्टन इथे नसताना, चोरीचे काही पुरावे शोधण्यासाठी स्कॉटलंड यार्डकडून पाठवण्यात आले आहे. घरमालकाने माझे उत्साहाने स्वागत केले. असे दिसत होते, की अलीकडे इथे चोऱ्यांचे दोन प्रयत्न झाले होते --- तसे तर आमची छोटीशी कल्पना मिस्टर लॅव्हिंग्टनच्या इतर अशीलांवरही फारसा त्रास न घेता चालली. मी सगळ्या खिडक्या तपासल्या. नोकरांना उद्या पर्यंत खिडक्यांना हात न लावायची ताकीद दिली. कारण त्यांना मी

विजेचा प्रवाह जोडून ठेवला होता आणि डौलदारपणे मी तिथून परत आलो.”

“पायरो, खरेच, तू नवलपूर्ण आहेस.”

“अरे मित्रा, हे तर अगदी साधे होते. चल आता कामाला लागू. नोकर घराच्या वर झोपतात. तेव्हा ते जागे होण्याचा धोका फारच कमी आहे..”

“मला वाटते आहे, की तिजोरी कुठेतरी भिंतीत बांधलेली आहे?”

“तिजोरी? छट्! तिजोरी तिथे नाही आहे. मिस्टर लॅव्हिंग्टन हुशार माणूस आहे. तू बघशील की त्याने तिजोरीपेक्षा जास्त सुरक्षित अशी जागा त्या पत्रासाठी शोधून काढली आहे. तिजोरीत सगळेच नेहमी पहिल्यांदा बघतात.”

आम्ही सगळीकडे कसून तपास केला. पण अनेक तास घर पसरूनदेखील आमच्या हाती काही लागले नाही. मला पायरोच्या चेहऱ्यावर राग दिसू लागला.

“आहा, अरे देवा, हर्क्युल पायरोचा पराभव? कधीच नाही. आपण जरा शांत होऊन विचार करू. थोडक्यात, आपल्या करड्या पेशींना कामाला लाऊ.”

तो काही क्षण त्याच्या भुवया ताणून, गप्प राहिला. नंतर मला माहिती असलेला हिरवा प्रकाश त्याच्या डोळ्यात दिसू लागला.

“मी किती मूर्ख होतो. स्वयंपाकघर!”

मी ओरडलो, “स्वयंपाकघर? पण ते अशक्य आहे. नोकर!”

“बरोबर. शंभरपैकी नव्याण्णवजण हेच म्हणतील! आणि त्याच कारणासाठी स्वयंपाकघर ही आदर्श जागा आहे. ती अनेक घरगुती गोष्टींनी व्यापलेली असते. आपला मोर्चा मग आता स्वयंपाकघराकडे!”

मी त्याच्या मागोमाग गेलो. पूर्णपणे गोंधळलेला तो, पावाचे डबे, ताटल्या आणि गॅस शेगडीमध्ये डोके घालत होता. शेवटी त्याला बघून कंटाळा आल्याने, मी परत अभ्यासिकेकडे आलो. मला खात्रीपूर्वक वाटत होते, की इथे आणि इथेच ते सापडेल. पुढच्या मिनिटाला मी तिथे शोधू लागलो आणि मनात विचार केला, आता पावणेपाच वाजले आहेत. त्यामुळे आता हळूहळू उजाडेल. मग मी परत स्वयंपाकघरात गेलो.

आश्चर्य म्हणजे पायरो आता कोळशाच्या पोत्यावर उभा होता आणि त्याचा फिक्या रंगाचा कोट खराब होत होता. त्याने वेडावाकडा चेहरा केला. “हो माझ्या मित्रा, माझे कपडे खराब करणे, हे माझ्या स्वभावात बसत नाही. पण काय करणार?”

“पण लॅव्हिंग्टनने ते कोळशाच्या पोत्यात ठेवलेले असणे शक्य नाही, नाही का?”

“जर तुम्ही तुमचे डोळे वापरलेत, तर तुम्हाला दिसेल, मी काही कोळसे तपासत नाही आहे.”

नंतर मला कोळशाच्या पोत्यामागे काही लाकडाचे ओंडके रचून ठेवलेले दिसले. पायरो ते एक एक करून खाली उतरवत होता. अचानक हळू आवाजात तो काहीसे ओरडला.

“हेस्टीग्ज, तुझा चाकू!”

मी त्याला तो दिला. मला तो लाकडात चाकू खुपसताना दिसला. लाकूड दुभंगले. त्याच्या मध्यभागी पोकळी होती. त्यातून त्याने एक चिनी बनावटीची लाकडी पेटी काढली.

मी खूष होत म्हणालो, “वा! छान केलेस.”

“हेस्टीग्ज, सावकाश! जास्त जोरात बोलू नकोस. ये. आपण दिवस उजाडायच्या आत सटकू.”

ती पेटी खिशात टाकत, तो हळूच कोळशाच्या ढिगाच्या बाहेर आला. जमेल तेवढे स्वतःला झटकून स्वच्छ केले आणि आलो तसेच घराबाहेर पडलो. आम्ही भरभर लंडनच्या दिशेने चालू लागलो.

मी उद्गारलो, “काय असामान्य जागा शोधली आहे! कोणीही लाकडाचा ओंडका वापरला नसता.”

“हेस्टीग्ज, आणि तोही जुलैमध्ये? आणि तो सर्वात तळाशी होता --- लपवण्याची फारच नामी जागा! आहा, ही बघ टॅक्सी! आता घरी जाऊन अंघोळ आणि ताजेतवाने करणारी झोप.”

## चार

रात्रीच्या साहसानंतर मी उशीरापर्यंत झोपलो. एक वाजण्यापूर्वी मी जेव्हा आमच्या उठाबसायच्या खोलीत आलो, तेव्हा पायरोला एका खुर्चीत टेकून बसलेले पाहून, आश्चर्यचकित झाले. त्याच्याशेजारी चिनी पेटी उघडी होती, त्यातील पत्र काढून तो शांतपणे वाचत होता.

तो माझ्याकडे बघून प्रेमाने हसला. त्याने हातात धरलेल्या पत्रावर टिचक्या मारल्या.

“मिलीसेंट बाईसाहेबांचे बरोबर होते. उमरावाने कधीच या पत्राबद्दल कुणाला माफ केले नसते! मी आतापर्यंत पाहिलेल्या पत्रांपैकी, या पत्रात प्रेमाचे वारेमाप शब्द आहेत.

मी उबग येऊन बोललो, “पायरो, खरेच का? तू पत्र वाचशील, असे मला वाटले नव्हते. तशा प्रकारची गोष्ट तू कधी केलेली नाहीस, नाही, ना?

माझा मित्र न गोंधळता म्हणाला, “पण हर्क्युल पायरोने ते केले आहे.”

मी म्हणालो, “आणि दुसरी गोष्ट म्हणजे मला असे वाटते, की काल जापचे पोलीसमधील कार्ड दाखवणे, हे नुसते मजा करणे होते.”

“हेस्टीग्ज, पण मी मजा करत नव्हतो. मी एका केसच्या मागे होतो.”

मी माझे खांदे शहारवले. एका दृष्टीकोनाशी कुणी वाद घालू शकत नाही.”

पायरो म्हणाला, “जिन्यावर एक पायरी वाजते आहे. त्या मिलीसेंट बाईसाहेब असणार.”

आमची सुंदर अशील उत्सुक चेहऱ्याने आली आणि पायरोकडील पेटी व पत्र बघताच तिचा चेहरा आनंदाने उजळला.

“ओहो, मिस्टर पायरो, तुम्ही किती नवलपूर्ण आहात! तुम्ही हे कसे केले?”

“बाईसाहेब, तीव्र नापसंती दाखवणाऱ्या पद्धतीने. पण मिस्टर लॅव्हिंग्टन खटला दाखल करणार नाहीत. हे तुमचे पत्र आहे, नाही का?”

तिने त्यावर नजर टाकली.

“हो. ओहो, मी तुमचे कसे आभार मानू? तुम्ही नवलपूर्ण आहात. नवलपूर्ण मनुष्य. ते कुठे लपवलेले होते?”

पायरोने तिला सांगितले. तिने टेबलावरून लहान पेटी उचलत म्हटले, “मी ही आठवण म्हणून जपून ठेवेन.”

“बाईसाहेब, मला आशा होती, की ती ठेवण्यासाठी तुम्ही मला परवानगी द्याल --- शिवाय स्मृती म्हणूनदेखील.”

“मला आशा आहे, की माझ्या लग्नाच्या दिवशी, मी याहून चांगली आठवण पाठवेन. मिस्टर पायरो, मी तुमची ऋणाईत राहीन.”

“तुमच्यासाठी काम करणे, हे पैशांपेक्षा किंवा भेटींपेक्षा माझ्यासाठी जास्त मोलाचे आहे --- त्यामुळे तुम्ही मला ती पेटी ठेवून घ्यायची परवानगी द्या.”

ती हसत ओरडली, “ओहो नाही, मिस्टर पायरो, ती माझ्याकडेच पाहिजे.”

तिने तिचा हात पुढे केला पण पायरोने तिच्यापूर्वी त्या पेटीचा ताबा घेतला.

त्याचा आवाज बदलला, “मला वाटते, नाही.”

ती चढलेल्या आवाजात बोलली, “म्हणजे काय?”

तो देखील चढ्या आवाजात बोलला, “काही झाले तरी, मला यातील अदृष्य वस्तूंची कल्पना करू द्या. तुम्ही पाहिले आधीची पोकळी अर्धी झाली आहे. वरील अर्ध्या भागात सलोखा करणारे पत्र आणि तळाला - “

त्याने झटपट हालचाल केली व त्याचा हात लांब केला. त्याच्या तळहातावर, चार मोठे चकाकणारे हिरे आणि दोन मोठे दुधाळ पांढरे मोती होते.

पायरो पुटपुटला, “मला वाटते, त्या दिवशी बाँड रस्त्यावर चोरलेले हिरे. जाप आपल्याला सांगेल.”

मला आश्चर्याचा धक्का देत, स्वतः जापच पायरोच्या झोपायच्या खोलीतून अवतीर्ण झाला.

पायरो नम्रपणे मिलीसेंट बाईसाहेबांना म्हणाला, “माझा विश्वास आहे, तुमचा जुना मित्र.”

मिलीसेंट बाईसाहेब नेहमीची पद्धत पूर्णपणे बदलून म्हणाल्या, “देवाने दिलेला, चपळ जुना लबाड मित्र!” तिने पायरोकडे प्रेमळ आदराने पाहिले.

जाप म्हणाला, “गेर्टी, ठीक आहे. मला वाटते, आता या वेळचा तुझा खेळ संपलेला आहे. लवकरच तुला परत भेटायची आशा करतो. त्या दिवशी स्वतःला लॅव्हिंग्टन म्हणवणारा तुझा मित्र, आम्हाला आता मिळालेला आहे. त्या स्वतःला लॅव्हिंग्टन उर्फ क्रोकर उर्फ रीड म्हणवणाऱ्यासाठी मला नवल वाटते, की हॉलंडमध्ये नक्की कुठल्या गँगने त्याला चाकूने भोसकले होते? त्यांना वाटले त्याच्याबरोबर माल होता. तुला नाही का असे वाटत? पण त्याच्याकडे नव्हता. त्याने तुला छान तऱ्हेने फसवले --- माल त्याच्या घरात लपवून ठेवला. तू त्याच्या पाळतीवर दोन लोकांना पाठवले होतेस. आणि नंतर तू इकडे पायरोची मदत घेतलीस. आणि नशीबाने त्याने त्या गँगला शोधून काढले.”

त्या खोट्या मिलीसेंट बाईसाहेब म्हणाल्या, “तुला बोलायला फार आवडते, बरोबर? आता स्वस्थ रहा. तू मला पकडून फरफटत नेण्यापेक्षा मी शांतपणे येते. मी खरी मिलीसेंट नाही, असे तुम्ही म्हणू शकणार नाही. पायरो, टा- टा.”

पायरो स्वप्नात असल्यासारखा म्हणाला, “बोलायला मी अजून गोंधळलेला असतांना, बूट चुकीचे होते. मी व बुटांबद्दल विशेष जागरूक असणाऱ्या, इंग्लंडमध्ये जन्मलेल्या बाईचे व तुझ्या इंग्लिश देशाचे, थोडे निरीक्षण केले. मिलीसेंटचे कपडे एक वेळ गबाळे असतील, पण बूट मात्र नेहमी झकपक असत. आता या मिलीसेंट बाईचे कपडे महागाईचे व चटपटीत आहेत पण बूट स्वस्तातील आहेत. हे शक्य नव्हते, की तू किंवा मी खरी मिलीसेंट बाई पाहिली असेल. ती लंडनमध्ये फार थोडा काळ होती. आणि या मुलीचे फसवण्यापुरते, तिच्याशी फक्त वरवरचे साम्य होते. मी म्हणालो तसे पहिल्यांदा मला बुटांनी धक्का दिला आणि मग तिची गोष्ट --- आणि मग बुरखा --- हे सगळे जरा क्षोभनाट्यासारखे, सगळे खोटे होते, नाही का? वरती मला कामाला लावणारे खोटे पत्र असलेली चिनी पेटी, सर्व गँगला माहिती असणार. पण लाकडाचा ओंडका ही त्या लॉव्हिंग्टनची कल्पना होती. हेस्टीग्ज, वेगळी कल्पना होती, नाही का? मला आशा आहे की तू मला गुन्हेगारी जग माहिती नाही असे म्हणून, पुन्हा कालच्यासारख्या माझ्या भावना दुखावणार नाहीस. माझ्या विश्वासू मित्रा, ते सुद्धा जेव्हा फसतात, तेव्हा ती केस माझ्याकडे येते.”

The Tragedy at Marsdon Manor

# मार्सडन शेतघरातील शोकांतिका



मी थोडे दिवस शहरातून लांब गेलो होतो. आल्यावर पायरोला त्याची लहानशी प्रवासी बॅग नीट बंद करतांना पाहिले.

“हेस्टीग्ज, वेळेवर आलास. पण माझ्याबरोबर गावाला यायला वेळेवर आला आहेस की नाही?”

“म्हणजे तू तुझ्या केसच्या संदर्भात गावाला चालला आहेस?”

“हो. तरी मला कबूल करावे लागेल, की वरवर बघता हे प्रकरण काही खास वाटत नाही. नॉर्दन युनियन विमा कंपनी यांनी मला मिस्टर मालट्रॅव्हर्सच्या झालेल्या मृत्युचा शोध घ्यायला सांगितला आहे. काही आठवड्यांपूर्वी त्याने पन्नास हजार पौंड इतक्या मोठ्या रकमेचा विमा उतरवला होता.”

“मी रस घेत म्हणालो, “हो, मग?”

“नेहमीप्रमाणे त्या विम्यामध्ये अर्थात आत्महत्येचे कलम होते. हप्ता भरल्यापासून, एक वर्षाच्या आत जर आत्महत्या केली, तर हप्ता दंड म्हणून समजला जाईल. मिस्टर मालट्रॅव्हर्सना फक्त कंपनीच्या डॉक्टरकडून तपासले गेले. जरी तो माणूस तारुण्य ओलांडलेला असला तरी त्याची तब्येत उत्तम होती. शेवटच्या बुधवारी --- म्हणजे परवा मिस्टर मालट्रॅव्हर्सचे प्रेत इसेक्समधील मार्सडन शेतघरामध्ये त्याच्या घरी जमिनीवर सापडले. त्याच्या मृत्यूचे कारण कुठल्या तरी प्रकारचे अंतर्गत हॅमरेज असे सांगण्यात आले. ते काही फार उल्लेखनीय नव्हते. पण मिस्टर मालट्रॅव्हर्सच्या आर्थिक परिस्थितीशी संबंधित काही धोकादायक अफवा पसरू लागल्यावर, नॉर्दन युनियन विमा कंपनीची बालंबाल खात्री झाली

की हा आजारी माणूस कर्जबुडवेगिरीच्या काठावर उभा आहे. त्यामुळे आता गोष्टी खूपच बदलल्या. त्याला तरुण, सुंदर बायको होती.

आणि असे सुचवले गेले, की तो बायकोच्या फायद्यासाठी हप्ते भरत होता व नंतर त्याने आत्महत्या केली. असे घडणे शक्य होते. नॉर्दन युनियन विमा कंपनीचा संचालक असलेला माझा मित्र आल्फ्रेड राईट याने मला केससंबंधी तपास करायला सांगितला. मी म्हटले की यात मी यशस्वी होईनच असे नाही. जर हृदयक्रिया बंद पडून मृत्यू झाला असेल, तर मी जास्त आशावादी असेन. हृदयक्रिया बंद पडणे हे स्थानिक डॉक्टरच्या बाबतीत नेहमी कळेलच, असे नसल्याचे गृहीत धरले जाते. पण हॅमरेजच्या बाबतीत, नेमकेपणे कळू शकते. पण तरी आपण काही जरुरीच्या चौकशा करू शकतो. हेस्टीग्ज, पाच मिनिटात तुझी बॅग भर व आपण लिव्हरपूलला जाणारी टॅक्सी पकडू.”

सुमारे तासाभराने, आम्ही पूर्वेकडच्या गाडीतून, मार्सडन ली नावाच्या एका लहानशा स्टेशनवर उतरलो. तिथे केलेल्या चौकशीवरून समजले, की मार्सडन शेतघर इथून एक मैलावर आहे. पायरोने चालायचे ठरवले. आम्ही मुख्य रस्त्याने चालू लागलो.

मी विचारले, “आपल्या मोहिमेचा बेत काय आहे?”

“पहिल्यांदा मी डॉक्टरला बोलावेन. मला अशी माहिती मिळाली आहे, की मार्सडन ली या गावात फक्त एकच डॉक्टर आहे. डॉ राल्फ बर्नार्ड. आहा, इथे आपण त्याच्या घराशी आलो.”

ते घर एक छान घर होते. मुख्य रस्त्यापासून थोडे आत होते. गेटवर डॉक्टरच्या नावाची ब्रासची पाटी झळकत होती. आम्ही आत जाऊन घंटी दाबली.

आम्ही नशीबवान ठरलो. डॉक्टरांची दवाखान्याची वेळ चालू होती. आणि कुणी रोगी बसलेले नव्हते. डॉ राल्फ बर्नार्ड वयाने मोठे होते. रुंद, उतरत्या खांद्याचा माणूस! पण एकंदरीत तो थोड्या गुळमुळीत पद्धतीचा वाटत होता.

पायरोने स्वतःची ओळख करून दिली व आमच्या येण्याचा उद्देश सांगितला. अशा प्रकारचा केसमध्ये कंपनीला पूर्ण चौकशी करावी लागते.

डॉ बर्नार्ड थोडे गोंधळून म्हणाले, “अर्थात, अर्थात, मला वाटते, तो श्रीमंत मनुष्य असल्याने त्याचा मोठ्या रकमेचा विमा होता.”

“डॉक्टर, तुम्ही त्याला श्रीमंत मनुष्य समजता का?”

डॉक्टरांना नवल वाटलेले दिसले.

“तो तसा नव्हता का? त्याच्याकडे दोन गाड्या होत्या. मार्सडन शेतघर हे निगा राखण्यासाठी खूप मोठे घर आहे. पण मला वाटते ते त्याला स्वस्तात मिळाले.”

“मला असे समजले, की त्याला अलीकडे बराच तोटा झाला.”

पायरो डॉक्टरांना नीट न्याहाळत होता.

पण डॉक्टरने फक्त दुःखाने मान हलवली. “खरेच तसे आहे का? मग असा विमा उतरवलेला असणे म्हणजे त्याची बायको नशीबवान आहे. ती खूप सुंदर आणि आकर्षक आहे पण भयानक रीत्या अचानक बसलेल्या धक्क्याने ती उदास झाली आहे. बिचारी! फारच कोलमडून पडली आहे. मी तिला उभारी देण्याचा प्रयत्न केला. पण तिला बसलेला धक्का फारच मोठा आहे.”

“तुम्ही अलीकडे मिस्टर मालट्रॅव्हर्सकडे बघत होतात का?”

“नाही, कधीच नाही.”

“काय?”

“मला असे समजले की मिस्टर मालट्रॅव्हर्स हे ख्रिश्चन शास्त्रज्ञ --- किंवा त्या प्रकारचे कोणी होते.”

“पण प्रेताची तपासणी तुम्ही केलीत?”

‘अगदी नक्की. मला एका माळ्याने तिथे नेले.”

“आणि मृत्यूचे कारण स्पष्ट झाले?”

“हो, स्पष्टपणे. ओठांवर रक्त होते. पण बराचसा रक्तस्त्राव अंतर्गत होता.”

“ते अजून तिथे पडलेले आहेत का?”

“हो. प्रेताला कुणी हात लावलेला नाही. ते एका पिकाच्या कडेला पडले होते. ते सहसा डोमकावळ्याची शिकार करत असत. त्यांच्याशेजारी कावळ्यांना मारायची बंदूक पडलेली होती. हॅमरेज अचानक झाले असावे. संशयातीतपणे गॅस्ट्रीक अल्सर असावा.”

“त्याना बंदुकीने मारण्यात आले नसावे का?”

“माझ्या प्रिय सर!”

“माफ करा. पण माझी स्मरणशक्ती चांगली असेल, तर अलीकडील एका खुनाच्या केसमध्ये, डॉक्टरने प्रथम हृदयक्रिया बंद पडल्याचे म्हटले --- मग स्थानिक कॉन्स्टेबलने जेव्हा असे निदर्शनास आणले, की डोक्याला गोळी लागल्याची जखम आहे, तेव्हा त्याने ते बदलले.”

डॉ बर्नार्ड कोरडेपणे बोलले, “पण मिस्टर मालट्रॅव्हर्सच्या शरीरावर गोळी लागल्याची जखम नव्हती. सभ्य गृहस्थहो, आता अजून काही नसेल, तर --- “

आम्ही काय ते समजलो. “डॉक्टर, इतक्या चांगल्या रीतीने माझ्या प्रश्नांना उत्तरे दिल्याबद्दल मी आपला आभारी आहे. तसेही तुम्हाला शवविच्छेदनाची गरज वाटली नाही?”

डॉक्टर रागावून म्हणाले, “अर्थातच नाही. मृत्यूचे कारण स्पष्ट होते. आणि आमच्या व्यवसायात नातेवाईकांना उगीचच त्रास द्यायची पद्धत नाही.”

आणि आमच्या तोंडावर दार आपटून डॉक्टर निघून गेले.

आम्ही शेतघराकडे निघाल्यावर पायरोने मला विचारले, “हेस्टीग्ज, तुला डॉ बर्नार्ड कसे वाटले?”

“जरा जुनाट गाढव.”

“बरोबर. मित्रा, तुझे लोकांबद्दलचे मत नेहमीच योग्य असते.”

मी त्याच्याकडे अस्वस्थपणे पाहिले. पण तो हे गंभीरपणे म्हणत होता. पण त्याच्या डोळ्यात चमक आली आणि तो लबाडीने म्हणाला, “म्हणजे इथे सुंदर स्त्रीचा काही प्रश्न नाही आहे!”

मी त्याच्याकडे थंडपणे पाहिले.

आम्ही शेतघरात आल्यावर, आमच्यासाठी एका मध्यमवयीन नोकराणीने दार उघडले. पायरोने तिला मिसेस मालट्रॅव्हर्ससाठी त्याचे कार्ड आणि विमा कंपनीचे पत्र दिले.

आम्हाला तिने एका लहान खोलीत नेले. आणि ती तिच्या मालकिणीला सांगण्यासाठी गेली. दहा मिनिटे गेली. मग दार उघडले. विधवेच्या कपड्यातील एक नाजूक आकृती आमच्यापुढे उभी राहिली.

तिने चाचरत विचारले, “मिस्टर पायरो?”

पायरो आकर्षकपणे उभा राहून तिच्याकडे जाऊ लागला. “मला कळत नाही की तुम्हाला अशा तऱ्हेने त्रास द्यायला खरे तर नको होते. पण काय करणार? ही प्रकरणे --- त्यांना दया माहिती नाही.”

मिसेस मालट्रॅव्हर्स त्याने पुढे केलेल्या खुर्चीत बसली. तिचे डोळे रडून रडून लाल झाले होते. पण त्यामुळे तिचे आरस्पानी सौंदर्य लपत नव्हते. ती सत्तावीस/ अठ्ठावीस वर्षांची असावी. ती खूपच गोरी होती. डोळे निळे व मोठे होते. आणि ती खालचा ओठ चावत असल्यामुळे अधिकच छान दिसत होती.

“हे काही माझ्या नवऱ्याच्या विम्याबद्दल असावे, नाही का? पण इतक्या लवकर मला त्रास घेतलाच पाहिजे का?”

“बाईसाहेब, धीर धरा. असे बघा, तुमच्या नवऱ्याने मोठ्या रकमेचा विमा उतरवलेला आहे. आणि अशा केसमध्ये विमा कंपनीला काही बाबी स्पष्ट करून घाव्या लागतात. ते करण्यासाठी

त्यांनी मला नेमले आहे. लक्षात घ्या, हे सर्व काही मी तुम्हाला त्रास होईल, अशा पद्धतीने मुळीच हाताळणार नाही. तुम्ही मला बुधवारच्या घटनांबद्दल थोडक्यात सांगाल का?"

"मी चहासाठी कपडे बदलत होते. तेव्हा नोकराणी आली --- एक माळी घराकडे धावत आला होता. त्याला असे कळले होते --- "

तिचा आवाज कापू लागला. पायरोने तिचा हात सहानुभूतीने दाबला.

"मी समजू शकतो. बास! तुम्ही त्याआधी तुमच्या नवऱ्याला दुपारी भेटला होतात का?"

"दुपारचे जेवण झाल्यापासून नाही. मी काही स्टॅंप आणण्यासाठी गावात गेले होते. आणि माझा विश्वास आहे, तो जमिनीवर इकडे तिकडे आनंदाने फिरत होता."

"कावळे मारत का?"

"हो. तो सहसा त्याच्याबरोबर त्याची लहान बंदूक घेत असे. मी लांबून एकदोनदा गोळी उडाल्याचे आवाज ऐकले."

"आता ती बंदूक कुठे आहे?"

"मला वाटते, हॉलमध्ये."

ती खोलीबाहेर पडली व पायरोच्या हातात बंदूक आणून दिली. त्याने ती लक्ष देऊन तपासली.

"दोन बार उडवले गेले. अस्स!" त्याने निरीक्षण करत तिला बंदूक परत दिली. "आणि बाईसाहेब, आता मी हे बघू शकतो का --- "

तो नाजूकपणे थांबला.

ती तिचे डोके हलवत पुटपुटली, "नोकर तुम्हाला घेऊन जाईल."

नोकराणी त्याला घेऊन आली व तो नोकराबरोबर वरच्या मजल्यावर गेला. मी त्या सुंदर, दुर्दैवी बाईबरोबर राहिलो. तिच्याशी बोलावे, की गप्प रहावे, हे ठरवणे अवघड होते. मी सहज एकदोन विषयांवर बोललो. त्याला तिने त्यात मन नसल्यासारखी उत्तरे दिली. काही मिनिटात पायरो परत आला.

"बाईसाहेब, तुम्ही दाखवलेल्या नम्रपणाबद्दल मी तुमचा आभारी आहे. मला वाटत नाही की या प्रकरणात, पुन्हा तुम्हाला त्रास द्यायची वेळ येईल. तुमच्या नवऱ्याच्या आर्थिक व्यवहाराची तुम्हाला काही कल्पना आहे का?"

तिने मान हलवली. "काहीच नाही. मला त्यातले काही कळत नाही." "अस्स! तर मग तुम्ही आम्हाला सांगू शकणार नाही, की

त्याने अचानक विमा काढायचा विचार का केला? मला वाटते, असे त्याने पूर्वी केले नव्हते.”

“आम्ही नुकतेच एक वर्षापूर्वी लग्न केले होते. पण त्याने विमा का काढला, तर बहुतेक त्याने पक्के ठरवले होते. की तो फार जगणार नाही. त्याला त्याच्या मरणाची चांगलीच कल्पना होती. मला वाटते त्याला एकदा यापूर्वीही हॅमरेज झाले होते. आणि दुसऱ्यांदा असे झाल्यास ते जीवघेणे ठरेल, असे त्याला वाटत असावे. मी त्याची ही पुसटशी भीती दूर करायचा प्रयत्न केला. पण हाय रे देवा, शेवटी त्याचेच खरे ठरले.”

अश्रुभरल्या डोळ्यांनी तिने आमचा निरोप घेतला. आम्ही दोघे बाहेर पडतांना पायरोने त्याचे नेहमीचे हावभाव केले. “मित्रा, आता परत लंडन! अजून काही सुगावा लागत नाही. आणि तरीही --- “

“तरीही काय?”

“मला दोनतीन गोष्टींमध्ये थोडीसे अतर्क्य साम्य दिसते आहे. तुला ते जाणवले का? नाही? तरीही आयुष्य सारखेपणाच्या योगायोगाने भरलेले आहे. आणि नक्कीच त्याने स्वतःचे आयुष्य संपवले नसेल --- त्याचे तोंड रक्ताने भरणारे विष त्याने घेतले

नव्हते. नाही. नाही. मी हा विचार डोक्यातून काढून टाकला पाहिजे. सर्व काही कायदेशीर व स्पष्ट दिसते आहे --- पण हे कोण आहे?”

एक उंच माणूस आमच्याकडे चालत येत होता. आम्हाला काही खूण न करता तो आमच्या अंगावरून चालत गेला. पण तो कुणी दुष्ट दिसत नव्हता. नम्र, कडक चेहऱ्याचा व विषुववृत्तीय प्रदेशातील वाटत होता. बाग झाडणारा माळी क्षणभर थांबला. पायरो घाईने त्याच्याजवळ गेला.

“मला सांग हा कोण आहे? तुला तो माहिती आहे का?”

“सर, मी त्याचे नाव ऐकले आहे पण मला ते आठवत नाही. मागील आठवड्यात तो इथे एक रात्र राहिला होता. तो मंगळवार होता.”

“पटकन चल मित्रा, आपण त्याच्यामागोमाग जाऊ.”

आम्ही गेटपासून गॅरेजच्या रस्त्यापर्यंत त्याचा पाठलाग केला. घराच्या कडेला असलेल्या गच्चीवर काळा पायघोळ झगा घातलेली व्यक्ती दिसत होती. तो एकदम वळला व आम्हीही त्याच्यामागोमाग वळलो. तिथे आम्ही भेटलो.

ती उभी होती, तिथेच मिस्टर मालट्रॅव्हर्स डगमगत पडले होते. तिचा चेहरा लक्षात येईल इतका पांढरा पडला.

ती धापा टाकत बोलली, "तुम्ही? मला वाटले, तुम्ही पूर्व आफ्रिकेच्या वाटेवर समुद्रात असाल?"

तरुण मनुष्याने स्पष्टीकरण दिले, "मला माझ्या वकिलाकडून काही बातमी समजल्यामुळे मी इथे राहिलो. स्कॉटलंडमधील माझे वयस्क काका अचानक वारले आणि त्यांनी माझ्या नावे काही पैसे ठेवलेले मला कळले. त्यामुळे मी ठरवले की प्रवास रद्द करणे ठीक राहील. मग मी वर्तमानपत्रात ही वाईट बातमी वाचली. मग मी इथे मला काही करण्यासारखे आहे का, ते बघायला आलो. कदाचित काही गोष्टींकडे लक्ष द्यायला तुला कुणाची जरुरी असेल."

त्याच वेळी त्याना आम्ही तिथे असल्याची जाणीव झाली. पायरो पुढे झाला. आणि माफी मागत स्पष्ट केले, की त्याची काठी हॉलमध्ये राहिल्यामुळे तो परत आला. मला वाटले, थोडे कां कू करत मिसेस मालट्रॅव्हर्सने ओळख करून दिली.

"मिस्टर पायरो, मिस्टर ब्लॅक."

थोडा वेळ गप्पा झाल्या. त्यात पायरोच्या लक्षात आले की कॅप्टन ब्लॅक अँकर खानावळीत उतरला होता. हरवलेली काठी सापडली नाही [त्यात काही नवल नव्हते.] पायरोने परत माफी मागितली व आम्ही निघालो.

आम्ही भरभर चालत गावात आलो. आणि पायरोने घरापासून खानावळीपर्यंत सरळ रेषा असल्याचे दाखवले.

त्याने सांगितले, “आमचा मित्र कॅप्टन येईपर्यंत आम्ही तिथे आराम केला. आम्ही पहिल्या गाडीने लंडनला परतत असल्याचे सांगण्यावर मी जोर दिल्याचे तुझ्या लक्षात आले का? तुला वाटले असेल, की आपण खरच परतत आहोत. पण तसे नाही. या तरुण ब्लॅकला पाहिल्यावर तू मिसेस मालट्रॅव्हर्सचा चेहरा पाहिलास? तिला स्पष्टपणे धक्का बसला. आणि तो --- ठीक आहे, तो फार एकनिष्ठ आहे, असे तुला वाटत नाही का?” तो इथे मंगळवारी रात्री होता --- मिस्टर मालट्रॅव्हर्स वारले त्याच्या आधीच्या रात्री. हेस्टीग्ज, आपण कॅप्टन ब्लॅकच्या कृत्यांवर नजर ठेवली पाहिजे.”

अर्ध्या तासात आम्ही खानावळीशी पोचलो. पायरो बाहेर पडला आणि धीटपणे कॅप्टन ब्लॅकला भेटला. आणि त्याला आमच्या खोलीवर घेऊन आला.

त्याने स्पष्ट केले, “मी कॅप्टन ब्लॅकला आपला इथे येण्याचा उद्देश सांगत होतो. मिस्टर ब्लॅक, तुम्हाला समजू शकेल, की मला मरणापूर्वी थोडा काळ मिस्टर मालट्रॅव्हर्सची मानसिकता कशी होती, हे जाणून घेण्यात रस आहे. त्याचबरोबर मला मिसेस मालट्रॅव्हर्सला दुःखद प्रश्न विचारून त्रास द्यायचा नाही आहे. हा

हादसा घडण्यापूर्वी तुम्ही इथे होतात. त्यामुळे तुम्ही आम्हाला महत्वाची माहिती देऊ शकाल.”

तो तरुण सैनिक बोलला, “मला तुम्हाला मदत करायला नक्कीच आवडेल. पण मला त्याचे वर्तन सर्वसामान्यच वाटले. असे बघा, तो लोकांचा जुना मित्र होता. पण मी त्याला फारसा ओळखत नाही.”

“तू इथे केव्हा आलास?”

“मंगळवारी दुपारी. बुधवारी सकाळी लवकर मी गावात गेलो, कारण माझी बोट टिलबरीपासून १२ ला सुटणार होती. पण मला एक बातमी समजल्यामुळे मी माझा बेत बदलला. तेच मी मिसेस मालट्रॅव्हर्सला सांगताना तुम्ही ऐकले.”

“मला वाटते, तू पूर्व आफ्रिकेला परत चालला होतास, बरोबर?”

“हो. लढाईपासून मी नेहमी तिथे जातो --- तो छान देश आहे.”

“बरोबर, आता मंगळवारी रात्री जेवताना काय बोलणे झाले?”

“ओहो, मला माहिती नाही. नेहमीचे काहीही विषय! मालट्रॅव्हर्सने माझ्या लोकांची चौकशी केली. मग आम्ही जर्मन लढाईत देण्यात येणाऱ्या नुकसानभरपाईच्या प्रश्नाबद्दल चर्चा केली.

नंतर मिस्टर मालट्रॅव्हर्स यांनी पूर्व आफ्रिकेबद्दल बरेच प्रश्न विचारले. मी त्यांना एकदोन सहसा घडणाऱ्या गोष्टी सांगितल्या. मला वाटते, एवढेच.

"आभारी आहे."

पायरो क्षणभर गप्प राहिला. मग तो सभ्यपणे बोलला, "तुझ्या परवानगीने मी एक प्रयोग करू इच्छीतो. तू तुझ्या सद्सदविवेकबुद्धीला स्मरून तुला माहिती असलेले सर्व सांगितलेस. आता तुझ्या अर्धनिद्रित अवस्थेला मला विचारायचे आहे."

घाबरलेल्या ब्लॅकने विचारले, "म्हणजे मानसविश्लेषण का?"

पायरो त्याला दिलासा देत म्हणाला, "ओहो, नाही. ते असे आहे, मी तुला एक शब्द देईन. तू दुसऱ्या शब्दाने उत्तर दे. आणि असेच. तुला पहिल्यांदा जो सुचेल, तो शब्द. आपण सुरु करुया?"

"ठीक आहे." ब्लॅक बोलला. पण तो अस्वस्थ दिसत होता.

पायरो म्हणाला, "हेस्टीग्ज, कृपया आमचे शब्द लिहित जा. मग त्याने त्याच्या खिशातून एक घड्याळ काढून त्याच्याशेजारी टेबलावर ठेवले.

"आपण सुरु करू. दिवस."

क्षणभर थांबून ब्लॅक बोलला, "रात्र."

जसजसे पायरो बोलत गेला ब्लॅकची उत्तरे भरभर येऊ लागली.

पायरो म्हणाला, “नाव.”

“जागा.”

“बर्नार्ड.”

“शॉ.”

“मंगळवार.”

“रात्रीचे जेवण.”

“प्रवास.”

“जहाज.”

“देश.”

“युगांडा.”

“गोष्ट.”

“सिंह.”

“डोमकावळ्यांना मारायची बंदुक.”

“शेत.”

“ठो.”

“आत्महत्या.”

“हत्ती.”

“सुळे.”

“पैसा.”

“वकील.”

“आभारी आहे, कॅप्टन ब्लॅक. तू मला अर्ध्यातासाने थोडासा वेळ देऊ शकशील का?”

“नक्की.” त्या तरुण सैनिकाने पायरोकडे चौकसपणे पाहिले. आणि उठतांना त्याची भुवई पुसली.

पायरो हसत, दार लावत म्हणाला, “हेस्टीग्ज, आता हे सगळे पाहिलेस, नाही का?”

“तुला काय म्हणायचे आहे, मला कळत नाही.”

“हे शब्द तुला काही सुचवत नाहीत का?”

मी ते विचारपूर्वक तपासले. मी माझे डोके हलवले.

“मी तुला मदत करतो. पहिल्यांदा ब्लॅकने भरभर, न थांबता उत्तरे दिली. त्यामुळे आपण म्हणू शकतो की त्याला उघड करायची नसलेली अशी, अपराधीपणाची काही माहिती नव्हती. दिवस, रात्र, जागा, नाव हे नेहमीचे साहचर्य असलेले शब्द आहेत. मी बर्नार्ड पासून कामाला लागलो. तो शब्द असे सुचवत असावा, की

स्थानिक डॉक्टर त्याला आठवला असावा. कदाचित नसेलही. आमच्यातील अलीकडच्या बोलण्यानंतर त्याने मंगळवारला रात्रीचे जेवण असे उत्तर दिले. पण प्रवास आणि देश याला त्याने उत्तर दिले, जहाज आणि युगांडा. यावरून असे दिसते, की त्याने जहाजाने केलेला युगांडाचा प्रवास त्याच्यासाठी महत्वाचा होता. आणि त्याने इथे येण्यासाठी केलेला प्रवास नव्हे. मी गोष्ट म्हटल्यावर त्याला सिंह आठवला कारण त्याने जेवताना सिंहाची गोष्ट सांगितली होती. मी डोमकावळयांना मारायची बंदूक म्हटल्यावर त्याने शेत म्हटले. तो अगदी अनपेक्षित असा शब्द होता. मी जेव्हा ठो शब्द म्हटला, तेव्हा त्याने लगेच आत्महत्या म्हटले. कारण त्याला शेतात डोमकावळयांना मारायची बंदुकीने आत्महत्या करणारा माणूस माहिती होता. अजूनही त्याच्या मनात त्याने जेवतांना सांगितलेल्या गोष्टी होत्या. आणि मला वाटते, तू कबूल करशील, मी जेव्हा कॅप्टन ब्लॅकला आठवतो, तेव्हा त्याला त्याने जेवायच्या टेबलावर मंगळवारी जेवतांना सांगितलेली आत्महत्येची गोष्ट परत सांगायला सांगतो.”

इथपर्यंत ब्लॅक सगळ्या गोष्टींबद्दल पुरेसा सरळ असतो.

“हो. मी त्यांना जी गोष्ट सांगितली, तिचा विचार माझ्या डोक्यात आला. त्या माणसाने खरेच शेतावर डोमकावळयांना

मारायची बंदुकीने तोंडात गोळी मारून, आत्महत्या केली. डॉक्टरांना शेवटपर्यंत काही कळले नाही. ते गोंधळलेलेच राहिले --- फक्त ओठांवर थोडेसे रक्त होते. त्याशिवाय काही वेगळे असे दिसत नव्हते. पण काय --- ?“

मिस्टर मालट्रॅव्हर्सशी त्याचा काय संबंध होता? ते तुला माहिती नाही. अस्स! त्याच्याशेजारी डोमकावळ्यांना मारायची बंदुक सापडली.”

“म्हणजे तुम्हाला असे म्हणायचे आहे का, की माझ्या गोष्टीने त्याना हे सुचले? ओहो, पण हे भयानक आहे.”

“वाईट वाटून घेऊ नकोस --- हे असे झाले असेल किंवा नसेल. ठीक आहे. मला लंडनला फोन करायला पाहिजे.”

पायरो फोनवर बराच वेळ संभाषण करत होता. आणि मग विचार करत आला. दुपारी एकटाच विचार करत राहिला. शेवटी संध्याकाळी सात वाजता त्याने जाहीर केले, की आता तो हे प्रकरण दूर ठेऊ शकत नाही. पण तरुण विधवेला आता हे सर्व सांगायला हवे.

पहिल्यापासून मला तिच्याबद्दल सहानुभूती वाटत होती. ती कफल्लक होती आणि तिच्या नवऱ्याने तिच्या सुरक्षित भविष्यासाठी आत्महत्या केली होती, हे त्या बाईला सहन करायला

अवघड असे ओझे होते. तरीही मी गुप्तपणे आशा करत होतो, की तिचा दुःखाचा पहिला भर ओसरल्यावर, तरुण ब्लॅक तिला दिलासा देऊ शकेल. तो तिचे खूप कौतुक करत होता.

बाईसाहेबांबरोबरची आमची भेट दुःखदायक ठरली. पायरोने सांगितलेल्या गोष्टींवर विश्वास ठेवायला तयार नव्हती. त्यासाठी तिने ठाम नकार दिला. शेवटी तिला जेव्हा पटले, तेव्हा ती जोराने रडायला लागली. प्रेताची तपासणी केल्यावर, आमचा संशय खात्रीत बदलला. पायरोला त्या बाईबद्दल फार वाईट वाटत होते. पण शेवटी, त्याला विमा कंपनीने काम दिले होते. त्यामुळे तो काय करणार होता? तो जायला निघाला, तेव्हा तो हळूवारपणे मिसेस मालट्रॅव्हर्सला म्हणाला, “बाईसाहेब, सगळ्या लोकांसारखे तुम्हाला माहिती पाहिजे, की माणसे मरत नाहीत.”

तिने डोळे मोठे करत विचारले, “तुम्हाला काय म्हणायचे आहे?”

“तुम्ही कधी मृतात्म्यांशी संवाद साधण्यात भाग घेतला नाही का? तुम्ही मृतात्म्यांशी संवाद साधण्याच्या स्वभावाच्या वाटता.”

“मला असे सांगितले जाते. पण तुम्ही नक्कीच त्यावर विश्वास ठेवत नसाल, नाही का?”

“बाईसाहेब, मी काही विचित्र गोष्टी पाहिल्या आहेत. तुम्हाला माहिती आहे का, की गावातील लोक म्हणतात, हे घर पछाडलेले आहे.”

तिने मान हलवली. त्याच क्षणी नोकराणी सांगत आली, की जेवण तयार आहे.”

तुम्ही इथे राहून जेवत का नाही?”

आम्ही मोठ्या डौलाने तयार झालो. तिला तिच्या दुःखापासून दूर जायला त्यामुळे मदत होईल, असे आम्हाला वाटले.

आम्ही सूप संपवतो आहोत, तोच दाराबाहेरून एक किंकाळी ऐकू आली. आणि काचसामान फुटल्याचा आवाजही आला. आम्ही उडी मारून उभे राहिलो. नोकराणी आली. तिचा हात छातीवर होता.

“बाहेर पॅसेजमध्ये --- एक मनुष्य उभा होता.”

पायरो बाहेर धावला व लगेच परत आला. ”तिथे कुणी नाही.”

नोकराणी क्षीणपणे म्हणाली, “सर, कुणी नाही? ओहो, त्याने मला घाबरवले.”

“पण का?”

ती कुजबुजत्या स्वरात बोलली, “ते मालक होते. ते प्रेतात्म्या सारखे दिसत होते.”

मी मिसेस मालट्रॅव्हर्सला घाबरलेले पाहिले. माझे मन जुन्या अंधश्रद्धेकडे गेले, की आत्महत्या स्वस्थ राहू शकत नाही. माझी खात्री आहे, तिलाही तेच वाटले असावे.

कारण मिनिटाभराने, तिने किंचाळत, पायरोचा दंड धरला. “तुम्ही त्या ऐकल्या नाही का? खिडकीवरच्या तीन थापा? तो घराभोवती फिरे, तेव्हा असाच आवाज करे.”

मी ओरडलो, “ती खिडकीच्या तावदानाशेजारील वेल होती.”

पण आम्हा सगळ्यांवर भीतीचे सावट पसरले. नोकराणी अर्थातच ताणाखाली नव्हती. जेव्हा जेवण झाले, तेव्हा मिसेस मालट्रॅव्हर्सने पायरोला विनंती केली, की त्याने लगेच जाऊ नये. ती एकटी रहायला घाबरत होती. आम्ही खोलीत बसलो. वारा वाढला होता आणि घराभोवती विव्हळल्यासारख्या गूढ पद्धतीने वहात होता. दोनदा खोलीचे दार हळूच उघडले व प्रत्येक वेळी ती घाबरून मला बिलगली.

शेवटी पायरो रागाने ओरडला, “हे दार भुरळ पाडते आहे.” त्याने उठून ते परत लावले व कुलुपात किल्ली फिरवली. ”त्यामुळे मी ते कुलुपबंद करतो.”

ती धापा टाकत म्हणाली, “असे करू नका. आता ते जर उघडले, तर -- “

ती असे बोलताना अशक्य असे झाले. कुलुपबंद दार सताड उघडले. मी जिथे बसलो होतो, तिथून मला पॅसेजमधील काही दिसत नव्हते. पण तिचे आणि पायरोचे तोंड तिकडे होते. तिने त्याच्याकडे वळून जोरात एक किंकाळी मारली.

ती ओरडली, “तुम्ही त्याला पाहिले --- तिकडे पॅसेजमध्ये?”

तो तिच्याकडे कोड्यात पडल्यासारखा बघत होता. मग त्याने मान हलवली. “मी माझ्या --- नवऱ्याला पाहिले --- तुम्ही पण नक्कीच पाहिले का?”

“बाईसाहेब, मी काही पाहिले नाही. तुमची तब्येत बरी नाही --- तुम्ही भारल्या गेल्या आहात --- “

“मी एकदम ठीक आहे, अरे देवा!”

एकदम अचानक दिवे उघडमिट होऊन गेले. अंधारातून तीन जोरदार थापा आल्या. मला मिसेस मालट्रॅव्हर्सचा कण्हण्याचा आवाज आला. आणि मग --- मी बघितले!

वरती अंथरुणावर मी पाहिलेला माणूस, माझ्याकडे तोंड करून उभा होता. तो भुतासारख्या मंद प्रकाशाने चमकत होता. त्याच्या ओठांवर रक्त होते व त्याने त्याचा उजवा हात काही

दाखवत, बाहेर काढला होता. अचानक त्याच्यातून मोठा उजेड निघाला. तो पायरो आणि माझ्यावरून गेला आणि मिसेस मालट्रॅव्हर्सवर पडला. मी तिचा पांढरा पडलेला भयानक चेहरा व आणखीही काही पाहिले!

मी ओरडले, “अरे देवा, पायरो, तिच्या हाताकडे बघ. उजवा हात. तो लाल झाला आहे!”

तिचे स्वतःचे त्याकडे लक्ष गेले. ती जमिनीवर एका ढिगाऱ्यावर पडली.

ती वेड्यासारखे ओरडली, “रक्त, हो. हे रक्तच आहे. मी त्याला मारले. मी ते केले. तो मला दाखवत होता. मग मी माझा हात चापावर ठेवला व तो दाबला. मला त्याच्यापासून वाचवा --- मला वाचवा! तो परत येतो आहे!”

तिचा आवाज घोगरा होत होत ऐकू येईनासा झाला.

पायरो म्हणाला, “दिवे.”

जणू जादू झाल्याप्रमाणे दिवे लागले.

तो बोलत राहिला, “हेस्टीग्ज, तुला ऐकू येते आहे? तोच तो आवाज. आणि तुला एव्हरेट्ट? आहा, तसेही हा मिस्टर एव्हरेट्ट उत्तम व्यावसायिक रंगभूमी कलाकार आहे. मी त्याला दुपारी फोन करून बोलावून घेतले. त्याचा मेकप चांगला आहे, नाही का?”

“जवळपास मृत माणसासारखाच आहे. त्याच्या खिशात छोटी विजेरी आहे आणि जरुरीचे फॉस्फरसन्स आहे. त्यामुळे त्याने योग्य तो परिणाम घडवून आणला. हेस्टीग्ज, मी तुझ्या जागी असतो तर तिच्या उजव्या हाताला स्पर्श केला नसता. कारण तिच्या हाताला लाल रंग लावलेला आहे. जेव्हा दिवे घालवले गेले तेव्हा मी ते काम केले. हे बघ. चला आपली गाडी चुकायला नको. खिडकीबाहेर इन्स्पेक्टर जाप आहे. वाईट रात्र आहे --- पण तो खिडकीवर हाताने ठेका धरून छान वेळ घालवतो आहे.

आम्ही वाऱ्यापावसात बाहेर पडतांना, पायरो बोलत राहिला, “असे बघ, एक लहानशी विसंगती आहे. डॉक्टर समजत होता, की मिस्टर मालट्रॅव्हर्स ख्रिश्चन शास्त्रज्ञ होता. आणि त्याला तसे कोणी सांगितले असेल? मिसेस मालट्रॅव्हर्सने? पण आपल्याला तर तिने तो स्वतःच्या तब्येतीविषयी काळजीत असल्याचे सांगितले होते. शिवाय तरुण ब्लॅक परत आल्यावर, ती इतकी बेचैन का झाली होती? आणि शेवटचे म्हणजे मला जुना नियम माहिती आहे, की जेव्हा बाई अती शोक करते, तेव्हा ते नाटक असते. हेस्टीग्ज, तू त्यांचे निरीक्षण केले नाहीस? नाही? मी तुला नेहमी म्हणतो, तसे तुला काहीच दिसत नाही!

“ठीक आहे. तर असे झाले. दोन शक्यता होत्या. मिस्टर ब्लॅकच्या गोष्टीने मिस्टर मालट्रॅव्हर्सना चतुरपणे आत्महत्या करायचा मार्ग दाखवला किंवा त्यांच्या बायकोला अफलातून पद्धतीने खून कसा करावा, हे सुचवले का? मला खुनाची शक्यता वाटते. त्यांनी दाखवलेल्या पद्धतीने, त्याला बंदुकीचा चाप पायाच्या बोटांनी ओढावा लागला असता --- असे मला तरी वाटते. आता जर मालट्रॅव्हर्स एका पायात बूट नसलेल्या अवस्थेत सापडला असता, तर तसे आपल्याला नक्कीच कुणाकडून तरी ऐकायला मिळाले असते व असे काही विचित्र आपल्या लक्षातही राहिले असते.”

“नाही, मी म्हणतो त्याप्रमाणे, मला हा दृष्टीकोन जास्त पटतो की ही खुनाची केस आहे, आत्महत्येची नव्हे. पण माझ्या या म्हणण्याला दुजोरा देणारा पुरावा माझ्याकडे नाही. त्यामुळे आज रात्री तू विनोदी प्रहसन घडवून आणलेले पाहिलेस.”

मी म्हणालो, “पण आता सुद्धा मला गुन्ह्याचे सर्व धागेदोरे दिसत नाहीत.”


“आपण पहिल्यापासून सुरवात करू. इथे एक चाणाक्ष व चतुरपणे बेत आखणारी बाई आहे. तिच्या नवऱ्याचा आर्थिक बोजवारा उडालेला आहे. तिने फक्त पैशांसाठी त्याच्याशी लग्न

केलेले असते. त्यामुळे तो मोठ्या रकमेचा विमा उतरवायला उद्युक्त होतो. आणि तिला खूष करायला बघतो.

तरुण सैनिकाच्या विचित्र गोष्टीमुळे, तिला अपघाताची कल्पना सुचते. दुसऱ्या दिवशी जेव्हा सैनिक समुद्रावर गेला आहे, असे तिला वाटते, तेव्हा ती व तिचा नवरा जमिनीवर फिरत असतात. ती म्हणते, “काल रात्री आपण काय विचित्र गोष्ट ऐकली! कोणी माणूस स्वतःला अशा तऱ्हेने मारून घेऊ शकतो? हे कसे शक्य आहे, ते मला दाखव.” बिचारा मूर्ख तिला दाखवतो. एक अपघात. तो बंदुकीचे टोक त्याच्या तोंडात ठेवतो. ती खाली वाकून बंदुकीचा चापावर बोट ठेवते आणि त्याला हसत, ‘आणि आता सर, समजा मी खटका दाबला, तर’ म्हणून तो दाबते.

THE KIDNAPPED PRIME MINISTER

# पळवलेला पंतप्रधान




आता लढाई आणि लढाईतील समस्या भूतकाळात जमा झाल्या आहेत, तेव्हा आता देशाच्या आणीबाणीच्या काळात माझा मित्र, पायरोने दाखवलेले कर्तृत्व सुरक्षितपणे लोकांसमोर मांडायला काही हरकत नाही. आजमितीस हे गुप्त राखलेले होते. यातील एक कणसुद्धा छापखान्याच्या हाती लागू दिला नव्हता. पण आता गुप्ततेची गरज संपली आहे. तेव्हा माझ्या आकर्षक अशा छोट्याशा मित्राचे इंग्लंड किती देणे लागते, ते सर्वांना समजले पाहिजे. मोठा अनर्थ त्याच्या उत्कृष्ट मेंदूने कसा टाळला, हे जगापुढे आले पाहिजे.

एका संध्याकाळी जेवणानंतर --- मी तारखेचा उल्लेख करत नाही. तेव्हा ‘बोलणी करून शांतता’ हे इंग्लंडच्या शत्रूंचे घोषवाक्य असलेला तो काळ होता. मी आणि पायरो त्याच्या खोलीत बसलो होतो. मी सैन्यातून बाहेर पडलो होतो आणि मला एक नोकरी मिळाली होती. रात्रीच्या जेवणानंतर मी सहसा पायरोकडे चक्कर मारत असे आणि सध्या त्याच्याकडे असलेल्या एखाद्या रुचीपूर्ण केसबद्दल ऐकत असे. काही खळबळजनक बातम्यांची त्याच्याबरोबर चर्चा करायचा प्रयत्न करत असे.

त्या दिवशीची मोठी बातमी होती, इंग्लंडचा पंतप्रधान मिस्टर डेव्हिड मॅकअ‍ॅडम याच्या खुनाचा प्रयत्न झाल्याची बातमी! त्यावर आम्ही चर्चा करत होतो. वर्तमानपत्रातील मजकूर काळजीपूर्वक रीत्या काटछाट करून देण्यात आलेला होता. ठळक गोष्टी वगळल्या होत्या. पण पंतप्रधानांच्या गालाला गोळी चाटून गेली व ते सुखरूप निसटले, इतकेच दिले होते.

असा भयानक गुन्हा घडणे शक्य झाले, म्हणजे पोलीस लाजीरवाण्या पद्धतीने निष्काळजी असल्याचे दिसत होते. मला चांगले कळत होते, की इंग्लंडमधील जर्मन दलालांच्या दृष्टीने असा धोका घेणे, ही मोठी कामगिरी होती. ‘मॅकबरोबर मारामारी’ असे त्याचे नाव पक्षाने ठेवले होते. वाढत जाणाऱ्या पॅसिफीस्ट [

शांतीवादी ] पक्षासाठी, ताण देणारा हा गुंता म्हणजे चांगलाच हादरा होता.

डेव्हिड मॅकअॅडम इंग्लंडच्या पंतप्रधानांपेक्षा जास्त काही होता --- तो इंग्लंड होता. त्याच्या महत्तेच्या तेजोवलयातून त्याला बाहेर काढण्याचा प्रयत्न करणे, हा ब्रिटनला निःष्प्रभ करणारा आणि चिरडणारा अनुभव होता.

पायरो त्याचा करडा सूट एका लहानशा स्पंजने झकपक करण्यात गुंग होता. हर्क्युल पायरो फॅशन आणि विशिष्ट ढब दाखवणे, या बाबतीत मागे नव्हता. नीटनेटकेपणा आणि कामांचा क्रम याबाबतीत तो आग्रही होता. आता हवेत पसरलेल्या बेन्झीनच्या वासाने, तो माझ्याकडे पूर्ण लक्ष देऊ शकत नव्हता.

‘माझ्या मित्रा, एका मिनिटात मी तुझ्याकडे येतो. माझे जवळजवळ संपलेच आहे. तेलकट डाग --- तो चांगला नाही --- त्यामुळे मी तो काढला --- ” त्याने स्पंज फेकून दिला.

मी सिगरेट पेटवून हसलो.

एकदोन मिनिटांने मी विचारले, “काही रुचीपूर्ण आहे का?”

“मी एकाला मदत करतो --- त्याला तू काय म्हणशील? --- सफाई कामगार बाईला तिचा नवरा शोधायला मदत करतो आहे. हे युक्तीने करावे लागणारे कठीण काम आहे. माझ्याकडे एक

कल्पना आहे की तो जेव्हा मिळेल, तेव्हा तो खूष होणार नाही. तू होशील का? माझे म्हणशील, तर माझी सहानुभूती त्याच्या बाजूने आहे. हरवण्यासाठी त्याला वाईट वागणूक दिली गेली होती.”

मी हसलो.

“शेवटी तो तेलकट डाग गेला! आता मी तुझ्याकडे बघतो.”

“इंग्लंडच्या पंतप्रधान, मॅकॲडम यांच्यावरील हल्ल्याच्या बातमीबद्दल तुला काय वाटते, ते मी विचारत होतो.”

पायरो तत्परतेने बोलला, “पोरकट वागणूक! कोणीच ते गंभीरपणे घेणार नाही. रायफलने मारणे कधीच यशस्वी होत नाही. ते हत्यार भूतकाळात जमा झाले आहे.”

मी त्याला आठवण करून दिली, “यावेळेस, ते यशस्वी होण्याच्या जवळ होते.

पायरोने अधीरतेने डोके हलवले. तेव्हा घरमालकिणीने दरवाज्यातून डोके काढले आणि त्याला सांगितले, की दोन गृहस्थ त्याला भेटायला आले आहेत. त्यांनी त्यांचे नाव सांगितले नाही. सर, ते म्हणाले त्यांचे काम फार महत्वाचे आहे.”

पायरो त्याची करडी पँट दुमडत बोलला, “त्यांना वर येऊ दे.”

काही मिनिटात, दोन पाहुणे खोलीत आले. माझे हृदय धडधडू लागले, कारण त्यातील एकजण उमराव इस्टेआर होता.

विधानसभेचा पुढारी. तर त्याच्या बरोबर आलेला, बर्नार्ड डॉज होता. तो लढाई मंडळाचा सभासद होता. आणि माझ्या माहितीप्रमाणे पंतप्रधानांचा जवळचा मित्र होता.

उमराव इस्टेआर प्रश्नार्थकतेने बोलला, “मिस्टर पायरो?” माझा मित्र वाकला. त्या थोर उमरावाने माझ्याकडे पाहिले व कां कू करू लागला. “माझे काम खासगी स्वरूपाचे आहे.”

माझा मित्र म्हणाला, “कॅप्टन हेस्टीग्जसमोर तुम्ही मोकळेपणे बोलू शकता. तो इतका बुद्धिमान नाही, पण त्याचा अंदाज चांगला आहे.”

तरीही उमराव इस्टेआर बोलायला तयार होईना. पण मिस्टर डॉज अचानक बोलू लागले, “ओहो, चला सांगा --- उगीचच घुमेपणा करू नका. मला दिसते आहे त्याप्रमाणे, सगळ्या इंग्लंडला माहिती होईल, की आपण कशासाठी इथे आलो आहोत. वेळ महत्वाचा आहे.

पायरो नम्रपणे बोलला, “बसा. महाशय, तुम्ही ती मोठी खुर्ची घ्याल का?”

उमराव इस्टेआरने हळू हळू बोलायला सुरवात केली, “तुम्ही मला ओळखता का?”

पायरो हसला. “नक्कीच. मी वर्तमानपत्र वाचतो व फोटोही बघतो. मी तुम्हाला कसा काय ओळखत नसेन?”

“मिस्टर पायरो, मी तुमच्याकडे मोठ्या घाईने मदत मागण्यासाठी आलो आहे. मला यात पूर्ण गुप्तता हवी आहे.”

माझा मित्र भारदस्त आवाजात बोलला, “मी हर्क्युल पायरो, तुम्हाला शब्द देतो. मी कुणालाही काही सांगणार नाही.”

“ते पंतप्रधानांसंबंधी आहे. आम्ही खूप अडचणीत आहोत.”

मिस्टर डॉज म्हणाले, “आम्ही कठीण परिस्थितीत आहोत.

मी म्हटले, “जखम मोठी दिसते आहे.”

“कसली जखम?”

“गोळी लागल्याची जखम.”

मिस्टर डॉज तिरस्काराने म्हणाले, ओहो, तो --- जुना इतिहास आहे.”

उमराव इस्टेआर म्हणाले. “माझा मित्र म्हणतो आहे त्याप्रमाणे, ते प्रकरण संपले. नशीबाने ते यशस्वी झाले नाही. पण मला दुसऱ्या प्रयत्नाबद्दल बोलायचे आहे.”

“दुसरा प्रयत्न झाला का?”

“हो, मिस्टर पायरो, तसाच नाही. पंतप्रधान नाहीसे झाले आहेत.”

“काय?’

“त्यांचे अपहरण करण्यात आले आहे!”

मी धक्का बसून ओरडलो, “अशक्य!”

पायरोने माझ्याकडे एक लज्जित करणारा कटाक्ष टाकला. तो मला तोंड बंद ठेवण्याचे सुचवत असल्याचे मला कळले.

उमराव म्हणाला, “जरी हे विश्वास ठेवण्यास कठीण असले, तरी ते तसे आहे.”

पायरोने मिस्टर डॉजकडे बघितले. “तुम्ही आताच म्हणालात, मिस्टर की, वेळाचा प्रश्न अती महत्वाचा आहे. त्याचा अर्थ काय?”

दोन माणसांनी एकमेकांकडे बघितले. मग उमराव इस्टेआर म्हणाले, “. मिस्टर पायरो, तुम्ही येणाऱ्या आंतर्देशीय सहकारी परिषदेबद्दल ऐकले आहे का?”

माझ्या मित्राने मान हलवली.

“अर्थातच पहिले कारण, ती कुठे आणि कधी होणार, हे अजून माहिती नाही. वर्तमानपत्रांपासून पण ते लांब ठेवले आहे. अर्थात ही तारीख मुत्सद्दी लोकांना माहिती आहे. ती परिषद उद्या आहे --

- गुरुवारी --- व्हर्सायलीसमध्ये संध्याकाळी आहे. आता तुम्हाला परिस्थितीचे गांभीर्य लक्षात येईल. मी तुमच्यापासून हे लपवणार नाही, की त्यात पंतप्रधानांची उत्स्थिती अनिवार्य आहे. शांतीवादी पक्षाचा प्रचार सुरु झाला आहे आणि जर्मन दलालांनी तो चालू ठेवला आहे. हे वैश्विक मत आहे, की परिषदेचा कळीचा मुद्दा पंतप्रधानांचे उत्तुंग व्यक्तिमत्व हा असेल. त्यांच्या गैरहजेरीमुळे मोठे गंभीर परिणाम घडतील. त्यांच्याऐवजी पाठवायला आपल्याकडे कुणी नाही. तेच एकमेव इंग्लंडचे प्रतिनिधित्व करू शकतात.

पायरोचा चेहरा फार कडक झाला. म्हणजे पंतप्रधानांचे अपहरण त्याना परिषदेला हजर रहाण्यापासून रोकते आहे का?"

"अगदी खात्रीने. नक्कीच. खरे तर ते वेळेवर फ्रान्सच्या वाटेवर होते."

"आणि परिषदेची वेळ होती --- ?"

"उद्या रात्री नऊ वाजता."

पायरोने त्याच्या खिशातून मोठे घड्याळ काढले.

"आता पावणेनऊ वाजले आहेत."

मिस्टर डॉज विचारपूर्वक म्हणाले, "चोवीस तास."

पायरोने दुरुस्ती केली, “आणि पाव तास. तो विसरू नका. तो उपयोगी ठरू शकेल. आता मुख्य गोष्टी --- अपहरण, ते इंग्लंडमध्ये झाले की फ्रान्समध्ये?

“फ्रान्समध्ये. मिस्टर मॅकअॅडम यांनी आज सकाळी फ्रान्समध्ये प्रवेश केला. कमांडर-इन-चीफचे पाहुणे म्हणून ते आजची रात्र तिथे रहाणार होते. उद्या पॅरीसला जाणार होते. त्याना खाडीवरून विनाशिकेने नेले. बोलोनियाला त्याना जनरल हेडक्वार्टरहून आलेली एका कमांडर-इन-चीफची गाडी भेटली.”

“ठीक आहे, पुढे?”

“ते बोलोनियापासून निघाले --- पण कधीच पोचले नाहीत.”

“काय?”

“मिस्टर पायरो, ती एक खोटी गाडी होती व खोटा कमांडर-इन-चीफ होता. बाजूच्या रस्त्यावर चालकासकट व तोंड बांधलेल्या कमांडर-इन-चीफसकट खरी गाडी सापडली.”

“आणि खोटी गाडी?”

“ती अजून पकडली गेली नाही.”

पायरोने अधीरतेचे हावभाव केले. “अविश्वसनीय! नक्कीच फार काळ ते निसटू शकणार नाहीत, नाही का?”

आम्हालाही असेच वाटते. फक्त कसून शोध घ्यावा लागेल. फ्रान्सचा तो भाग सैन्याच्या अंमलाखाली आहे. आमची खात्री झाली आहे, की ती गाडी बराच काळ कुणाच्या लक्षात न येता तिथे राहू शकत नाही. फ्रेंच पोलीस आणि आमची स्कॉटलंड यार्डची माणसे प्रयत्नांची पराकाष्ठा करत आहेत --- पण अजून काही हाती लागले नाही."

त्याच वेळेस दारावर थाप पडली आणि एक तरुण ऑफिसर आत आला व लाखेने बंद केलेले एक पाकीट उमराव इस्टेआरच्या हातात दिले.

"सर हे आताच फ्रान्सहून आले. तुम्ही सांगितल्याप्रमाणे, मी ते इथे आणले.

उमराव इस्टेआरने ते लगेच उघडले. आणि काही उद्गार काढले. ऑफिसर निघून गेला.

"शेवटी एकदाची बातमी आली. ही तार आताच आलेली आहे. त्यांना दुसरी गाडी सापडली आहे. सचिव, डॅनिएलला एका ओसाड शेतात क्लोरोफॉर्मने बेशुद्ध केले गेले व त्याच्या तोंडाला फडके बांधले गेले --- त्याला काहीच आठवत नाही. फक्त त्याच्या तोंडावर व नाकावर मागील बाजूने काही दाबले गेले आणि तो

त्यातून सुटायची धडपड करत होता, एवढेच. पोलिसांना त्याची जबानी खरी वाटते आहे.”

“आणि अजून काहीच त्यांना सापडले नाही का?”

“नाही.”

“पंतप्रधानांचे मृत शरीर नाही का? मग आशेला जागा आहे. पण हे विचित्र आहे. आज सकाळी त्याना गोळी मारायचा प्रयत्न फसल्यावर, आता ते त्याना जिवंत ठेवायचा कसोशीचा प्रयत्न करत आहेत का?” डॉजने डोके हलवले. “एक गोष्ट नक्की आहे. काही झाले तरी ते त्यांना परिषदेला हजेरी लावून देणार नाहीत.”

“जर त्यांनी मानवता दाखवली, तर पंतप्रधान परिषदेला असतील. देव करो आणि फार उशीर न होवो. मिस्टर, आता पहिल्यापासून सर्व काही माझ्यावर सोपवा --- मला या बंदुकीने मारायच्या केलेल्या प्रयत्नाबद्दल देखील सर्व माहिती पाहिजे.”

“काल रात्री पंतप्रधान कॅप्टन डॅनिएल नावाच्या त्यांच्या सचिवाला भेटले --- “

“तोच तो का, जो त्यांच्याबरोबर फ्रान्सला जातांना होता?”

“हो. मी हे सांगतो आहे, तेव्हा ते मोटारीने विंडसरला निघाले आहेत. तिथे त्यांची एक सभा आहे. आज सकाळी लवकर ते

गावात परतले आणि तेव्हा वाटेत त्यांच्यावर गोळी झाडून त्याना मारायचा प्रयत्न केला गेला.”

“एक मिनिट. हा कॅप्टन डॅनिएल कोण आहे? त्याच्यासंबंधी काही कागदपत्रे आहेत का?”

उमराव इस्टेआर म्हणाला, “मी असा विचार केला होता, की तुम्ही मला हा प्रश्न विचारणार. आम्हाला त्याची फारशी माहिती नाही. तो कुठल्या विशिष्ट कुटुंबातील असा नाही आहे. त्याने इंग्लिश सैन्यात काम केले आहे. आणि एकदम कार्यक्षम सचिव आहे. त्याला खूप भाषा येतात मला वाटते, तो सात भाषांमध्ये बोलू शकतो. त्यामुळे फ्रान्सला जाण्यासाठी “पंतप्रधानांनी त्याची निवड केली.”

“त्याचे कुणी नातेवाईक इंग्लंडमध्ये आहेत का?”

“दोन आत्या आहेत. हॅम्पस्टेडमध्ये रहाणारी मिसेस एव्हेरार्ड आणि ॲसकॉटजवळ रहाणारी मिस डॅनिएल.”

“ॲसकॉट? म्हणजे विंडसरजवळ, नाही का?”

“त्या मुद्द्याकडे दुर्लक्ष केलेले नाही. पण त्याने काही नवीन माहिती मिळाली नाही.”

“तुम्हाला कॅप्टन डॅनिएलबद्दल संशय वाटतो आहे का?”

उत्तर देताना, उमराव इस्टेआरच्या आवाजात कटुपणाची छाया तरळून गेली.

“नाही, मिस्टर पायरो, हल्लीच्या दिवसात, कुणावर संशय घेण्यापूर्वी मी दहादा विचार करेन.”

“छान. महाशय, आता मला समजले, की पंतप्रधान नेहमीची पद्धत म्हणून, धोका टाळण्यासाठी पोलिसांच्या संरक्षणाखाली हवेत. ज्यामुळे कुणीही त्यांच्यावर हल्ला करू शकणार नाही.

उमराव इस्टेआरने डोके झुकवले. “तर असे आहे. पंतप्रधानांच्या गाडीमागे जवळून साध्या वेषातील गुप्तहेरांची गाडी धावत होती. मिस्टर मॅकअॅडमना याबद्दल काही माहिती नव्हते. ते व्यक्तिशः भीती न वाटणारे, निधड्या छातीचे आहेत. आणि त्याना अशी काही व्यवस्था केल्याचे समजले, तर ते त्यांच्या अधिकारात, त्यांना हाकलून देतील. पण नैसर्गिकपणे, पोलिसांनी त्याची व्यवस्था केली होती. खरे तर पंतप्रधानांच्या गाडीचा चालक, ओ’ मर्फी हा गुन्हा अन्वेक्षण विभागाचा, CID चा मनुष्य आहे.”

“ओ’ मर्फी? ते आयर्लंडमधील नाव आहे, नाही का?”

“हो. तो आयरिश आहे.”

“आयर्लंडच्या कुठल्या भागातील?”

“मला वाटते, काउंटी क्लेअर.”

"थांबा. पण ठीक आहे, उमरावसाहेब, पुढे बोला."

"पंतप्रधानांची गाडी लंडनहून निघाली. गाडी बंदिस्त होती. पंतप्रधान आणि कॅप्टन डॅनिएल आत बसले होते. नेहमीप्रमाणे दुसरी गाडी मागून येत होती. पण कुठल्यातरी वाईट नशीबाने, पंतप्रधानांची गाडी मुख्य रस्त्यापासून आत वळली --- "

पायरोने मध्येच विचारले. "जिथे रस्ता वळतो तिथे का?"

"पण तुम्हाला कसे माहिती?"

"आहा, ते सोपे आहे. पुढे सांगा."

"काही माहिती नसलेल्या कारणाने पंतप्रधानांच्या गाडीने मुख्य रस्ता सोडला. पोलिसांच्या गाडीला हे वळण माहिती नसल्याने, मुख्य रस्त्याने जात राहिली. थोड्या अंतरावर अनोळखी गल्लीशी, पंतप्रधानांची गाडी तोंडाला फडके बांधलेल्या जमावाने अडवली. चालक --- "

पायरो विचारपूर्वक पुटपुटला, "तो हुशार ओ' मर्फी!"

क्षणभर चालक घाबरला. ब्रेक लावले. पंतप्रधानांनी डोके खिडकीबाहेर काढले. लगेच एक गोळी उडाली --- मग दुसरी. पहिली त्यांच्या गालाला चाटून गेली. मग दुसरीचा नेम नशीबाने चुकला. आता चालकाच्या धोका लक्षात आला. मग तो क्षणार्धात जमावातून, सरळ गेला.

मी शहारा देत ओरडलो, “जवळजवळ सुटका!”

मिस्टर मॅकअॅडमना झालेल्या लहानशा जखमेकडे त्यांनी लक्ष दिले नाही. त्यांनी तो फक्त ओरखडा असल्याचे सांगितले. ते एका स्थानिक हॉस्पिटलपाशी थांबले. तिथे जखमेला मलमपट्टी केली गेली --- अर्थात ते कोण आहेत, ते सांगितले गेले नाही. मग ठरल्याप्रमाणे गाडी चेरिंग क्रॉसकडे गेली. तिथे डोव्हरला जाणारी खास गाडी त्यांच्यासाठी थांबलेली होती. तिथे कॅप्टन डॅनिएलने उत्सुक पोलिसांना काय झाले, त्याचा अहवाल दिल्यावर, ते फ्रान्सला जाण्यासाठी निघाले. डोव्हरला तो त्यांच्यासाठी थांबलेल्या विनाशकात चढला. तुम्हाला माहिती असल्याप्रमाणे, बोनोनियाला खोटी गाडी त्यांच्यासाठी थांबलेली होती. त्यावर युनियन जॅक फडकत होता आणि इतर बाबीही योग्य वाटत होत्या.”

“तुम्हाला मला एवढेच सांगायचे होते का?”

“हो.”

“उमरावसाहेब, इतर कुठलीही परिस्थिती सांगायची राहिली नाही ना?”

“हो, एक विशेष गोष्ट सांगायची राहिली.”

“कुठली?’

“पंतप्रधानांना चेरिंग क्रॉसशी सोडल्यावर, गाडी घरी परतली नाही. पोलिस ओ’ मर्फीची मुलाखत घेण्यासाठी उत्सुक होते. म्हणजे शोध लगेच घेतल्यासारखे झाले असते. सोहो येथील एका फालतू हॉटेलसमोर गाडी उभी असलेली आढळली. ती जागा जर्मन दलालांची भेटायची जागा म्हणून प्रसिद्ध होती.”

“आणि चालक?”

“चालक कुठे सापडला नाही. तो देखील नाहीसा झाला.”

पायरो विचारपूर्वक बोलला, “दोनजण नाहीसे झाले. फ्रान्समध्ये पंतप्रधान आणि लंडनमध्ये ओ’ मर्फी.”

त्याने उमराव इस्टेआरकडे निरखून पाहिले. त्याचे हावभाव दुःखाचे होते.

“मिस्टर पायरो, मी तुम्हाला एवढेच सांगू शकतो, की जर मला काल कोणी सुचवले असते, की ओ’ मर्फी लबाड आहे, तर मी त्याच्या तोंडावर हसलो असतो.”

“आणि आज?”

“आज काय विचार करावा, हे मला समजत नाही.”

पायरोने कोरडेपणे मान हलवली. त्याने परत त्याच्या कांद्यासारख्या आकाराच्या मोठ्या घड्याळात पाहिले.

"मिस्टर, मला माहिती आहे, की माझ्याकडे पांढरे कार्ड आहे. मी जसे ठरवेन, तसे प्रत्येक प्रकाराने कुठेही जाण्याचे स्वातंत्र्य मला आहे."

"बरोबर. तासाभरात डोव्हरपासून निघणारी खास गाडी आहे. आणि तिथून पुढे स्कॉटलंड यार्डपासून निघणारी देखील आहे. तुमच्याबरोबर सैन्यातील ऑफिसर व CID चा माणूस असेल. जे तुमच्या संरक्षणाची काळजी घेतील. हे ठीक आहे ना?"

"अगदी. मिस्टर इथून निघण्यापूर्वी अजून एक प्रश्न. तुम्ही माझ्याकडे कसे आलात? मी इथे तुमच्या लंडनमध्ये फारसा प्रसिद्ध नाही."

"आम्ही तुम्हाला जलद शिफारसीवरून निवडले. आणि तुमच्या देशातील एका महान माणसाच्या इच्छेने."

"माझ्या जुन्या मित्राच्या, महान माणसाच्या? शिफारसीवरून? --- "

उमराव इस्टेआरने डोके हलवले. "व्यवस्थापकीय अधिकाऱ्याच्या देखील वरचा. एके काळी बेल्जियममध्ये ज्याचा शब्द म्हणजे कायदा मानला जात असे --- आणि परतही तसेच असेल. इंग्लंडने देखील ते मान्य केले आहे!"

पायरोचा हात आपोआप नाटकीपणे सलाम करता झाला. “त्याला सलाम असो! आहा, माझा महान गुरु मला विसरला नाही --- हर्क्युल पायरो एकनिष्ठतेने तुमची सेवा करेल. देवच त्याला वेळेवर परत पाठवेल. पण सध्या तरी माझ्या डोळ्यांसमोर अंधारच अंधार आहे. मला काही दिसत नाही.”

ते दोघे मंत्री जाऊन दार लागल्यावर, मी अधीरतेने ओरडलो, “पायरो, तुला काय वाटते?”

माझा मित्र मिनिटभर चपळपणे बॅग भरण्यात दंग होता. त्याने विचारपूर्वक मान हलवली. “मला कळत नाही, काय विचार करावा. माझे डोके चालत नाही.”

मी चालना देत म्हटले, “का, तू म्हटल्याप्रमाणे, कपाळावर गुद्दे मारून घेतांना, त्याला पळव.”

“अरे मित्रा, माझे ऐक. मी अगदी असेच म्हणालो नाही. त्याचे अपहरण करणे, हे संशयातीतपणे काही प्रकरणापेक्षा जास्त होते.”

“पण का?”

“कारण अनिश्चितता काळजी आणि दुःख निर्माण करते. हे एक कारण आहे. जर पंतप्रधानांचा खून झाला असेल, तर ते फार मोठे संकट आहे. पण आल्या परिस्थितीला तोंड द्यावे लागेल. आता तू बधीर झाला आहेस. पंतप्रधान परत येतील की नाही? ते

जिवंत आहेत की नाही? कोणालाच माहिती नाही. आणि ते माहिती झाल्याशिवाय नक्की काहीच करता येणार नाही. आणि मी तुला म्हटल्याप्रमाणे, अनिश्चितता काळजी निर्माण करते. त्यामुळे जर्मन लोक डाव साधत आहेत. आणि शिवाय, जे अपहरणकर्ते त्याना कुठे गुप्तपणे ठेवत असतील, तर त्याना दोन्ही बाजूने अटी घालणे सोपे आहे. नियमाप्रमाणे, जर्मन सरकार काही उदारमतवादी नाही. पण या केसमध्ये, त्यांना महत्वपूर्ण असा पैसा द्यायला लावणे शक्य आहे. तिसरे म्हणजे, ते फाशीचा धोका घेत नाही आहेत. ओहो, नक्कीच अपहरण हे त्यांचे कृत्य आहे.''

''मग असे जर असेल, तर त्यांनी प्रथम त्याला मारायचा प्रयत्न का केला?''

पायरोला राग आला. ''तेच तर मला समजत नाही. याचे स्पष्टीकरण अवघड आहे. मूर्ख! त्यांनी अपहरणाचा सर्व बेत केलेला आहे. [ आणि तो फार चांगला आहे. ] आणि तरीही ते पूर्ण प्रकरणात, खरे वाटणार नाही असा, सिनेमातील क्षोभनाट्याप्रमाणे हल्ला करून, धोका घेत आहेत. तोंडाला फडके बांधलेल्या जमावाने लंडनपासून वीस मैलही नसलेल्या जागी हे केले, यावर विश्वास ठेवणे कठीण आहे.''

मी सुचवले, “कदाचित ते एकमेकांशी काही संबंध नसलेले, दोन अगदी वेगळे प्रयत्न असतील.”

“ओहो, नाही. हे फारच योगायोग असल्यासारखे झाले! पण मग फसव्या कोण आहे? कोणीतरी लबाड माणूस असणारच --- पहिल्या प्रकरणात, तसेही तो कोण असेल? डॅनिएल की ओ' मर्फी? या दोघांपैकीच कुणीतरी असणार. नाहीतर गाडीने मुख्य रस्ता का सोडला असता? आपण असे तर म्हणू शकत नाही, की पंतप्रधानांनी गुप्तपणे स्वतःच्या खुनाचा बनाव रचला! ओ' मर्फीने त्याच्या स्वतःच्या मर्जीने वळण घेतले? की डॅनिएलने त्याला तसे करण्यास सांगितले?”

“नक्कीच यात ओ' मर्फीचा हात असावा.”

‘हो. कारण जर डॅनिएलचा हात असता, तर पंतप्रधानांनी त्याला तसे सांगताना ऐकले असते व कारण विचारले असते. पण या प्रकरणात फारच ‘का?’ आहेत आणि सगळे एकमेकांशी विरोधाभास दाखवत आहेत. जर ओ' मर्फी प्रामाणिक माणूस असेल, तर त्याने मुख्य रस्ता का सोडला? पण जर तो अप्रामाणिक असेल, तर त्याने फक्त दोनदा गोळी मारायचा प्रयत्न झाल्यावर, परत गाडी का सुरु केली --- त्यामुळे, सर्व शक्यतांमध्ये, पंतप्रधानांना वाचवायचा प्रयत्न दिसतो का? आणि जर तो

प्रामाणिक माणूस असेल, तर त्याने चेरिंग क्रॉस सोडल्याबरोबर गाडी जर्मन हेरांच्या अड्ड्याकडे का नेली?"

मी म्हणालो, "त्याने हे वाईट केले."

"आपण या केसकडे पद्धतशीरपणे बघू. या दोन माणसांच्या विरुद्ध आणि बाजूने कायकाय आहे? प्रथम ओ' मर्फी घेऊ.

विरुद्धः मुख्य रस्त्यापासून गाडी आत वळवण्याचे त्याचे वर्तन संशयास्पद होते, तो आयरिश असून तो तेथील काउंटी क्लेअरचा आहे, तो मोठ्या सूचक रीतीने गायब झाला आहे,

बाजूनेः पंतप्रधानांवर दोन गोळया मारण्यात आल्यावर त्याने गाडी सरळ पुढे नेऊन, त्यांचे महत्वाचे आयुष्य वाचवले, तो स्कॉटलंड यार्डचा माणूस आहे आणि त्याअर्थी तो विश्वासू गुप्तहेर आहे."

आता डॅनिएलचे काय ते बघू. त्याच्याविरुद्ध फार काही नाही. फक्त त्याची काही कौटुंबिक माहिती नाही. तो चांगला इंग्लिशमन असल्यासारख्या त्याला खूप भाषा बोलता येतात. [ पण माझ्या मित्रा, भाषातज्ञ म्हणून मान्य करण्यासारखा तू नाहीस. ] आता, त्याच्यासाठी आपल्याकडे अशी गोष्ट आहे, की तो क्लोरोफॉर्म दिलेल्या व तोंडाला फडके बांधलेल्या अवस्थेत सापडला. परंतु त्याला याच्याशी काही कर्तव्य असेल, असे दिसत नव्हते."

“त्याने त्याच्यावर संशय घेतला जाऊ नये म्हणून, कदाचित स्वतःच हे करून घेतले असेल.”

पायरोने डोके हलवले. “फ्रेंच पोलीस अशी चूक करणार नाहीत. शिवाय एकदा त्याचा हेतू साध्य झाला आणि पंतप्रधानांचे सुरक्षितपणे अपहरण झाले, की मग त्याचे काही काम उरत नाही. गुन्हा करतांना त्याला क्लोरोफॉर्म दिला गेला किंवा तोंडाला फडके बांधले गेले, तरी अर्थात, काही बिघडत नाही. पण मला हे समजत नाही, की त्यामुळे त्यांचे कोणते उद्दिष्ट सफल झाले? आता त्याना त्याचा काय उपयोग आहे? कारण जोपर्यंत पंतप्रधानांसंबंधीची परिस्थिती स्पष्ट होत नाही, तोपर्यंत त्याच्यावर पहारा रहाणारच.”

“कदाचित त्याला पोलीसांना चुकीच्या मागावर पाठवायचे असेल का?”

“मग तो तसे करत का नाही? तो फक्त म्हणतो आहे की त्याच्या नाकातोंडावर काहीतरी दाबले गेले. बाकी काहीही त्याला आठवत नाही. त्याने चुकीचा मार्ग दाखवलेला नाही. त्यामुळे ते उल्लेखनीय रीत्या खरे वाटते.”

मी घड्याळाकडे नजर टाकून म्हटले, “चला आपण स्टेशनकडे जायला निघावे, ते बरे. तुला जास्त पुरावे फ्रान्समध्ये मिळतील.”

“अरे मित्रा, तशी शक्यता आहे, पण तरी मला संशय आहे. अजून माझा यावर विश्वास बसत नाही, की पंतप्रधान त्या मर्यादित भागात अजून सापडले नाहीत. तिथे त्याना लपवायला खूपच समस्या असणार. जर दोन्ही देशांचे सैन्य आणि पोलीस यांना जर ते सापडले नाहीत, तर मला कसे सापडणार?”

चेरिंग क्रॉसला आम्हाला मिस्टर डॉज भेटले.

“हे स्कॉटलंड यार्डचे गुप्तहेर बार्नेज आणि मेजर नॉर्मन. ते तुम्हाला मदत करतील. तुम्हाला शुभेच्छा. हे वाईट काम आहे. पण मी आशा सोडलेली नाही. आता मला गेले पाहिजे.” एवढे बोलून मंत्रीमहाशय घाईने गेले.

आम्ही मेजर नॉर्मनबरोबर उत्साहरहित चर्चा केली. फलाटावरील माणसांच्या गटाच्या मध्यभागी मी चेहरा वेडावाकडा झालेल्या, माणसाला एका उंच, गोऱ्या माणसाशी बोलतांना ओळखले. तो पायरोचा मित्र असलेल्या गुप्तहेर इन्स्पेक्टर जापच्या जुन्या ओळखीचा होता. जाप स्कॉटलंड यार्डच्या चतुर ऑफिसर्सपैकी एक म्हणून ओळखला जाई. तो आला आणि माझ्या मित्राला आनंदाने अभिवादन केले.

“मी असे ऐकले, की तुम्ही या कामावर आहात. हे चातुर्याची परीक्षा घेणारे काम आहे. आतापर्यंत त्यांनी त्यांना मालासकट

बाहेर काढले आहे. पण मला नाही वाटत की ते फार काळ त्याना लपवून ठेऊ शकतील. आमचे लोक, तसेच फ्रेंचदेखील सगळा फ्रान्स विंचरून काढत आहेत. आता फक्त काही तासांचा प्रश्न आहे, असे मला वाटल्याशिवाय रहात नाही."

उंच गुप्तहेर उदास होऊन म्हणाला, "पण हे केव्हा, जर तो जिवंत असेल, तर!"

जापचा चेहरा पडला. "हो --- कसे कुणास ठाऊक, पण मला वाटते, की तो जिवंत असून सुखरूप आहे."

पायरोने मान डोलावली. "हो. हो. तो जिवंत आहे. पण तो वेळेवर सापडेल का? तुमच्यासारखेच मला वाटते, की ते त्याला फार काळ दडवून ठेऊ शकणार नाहीत."

शिट्टी वाजली आणि सगळे त्यांच्या आरामशीर डब्यात चढले. मग हळू, नकोशा धक्क्याने गाडी स्टेशनबाहेर पडली.

तो चौकस प्रवास होता. स्कॉटलंड यार्डच्या माणसांनी गर्दी केली होती. उत्तर फ्रान्सचे नकाशे पसरले गेले. बोटे नकाशातील रस्त्यांवरून व गावांमधून फिरू लागली. प्रत्येकाचे स्वतःचे असे काही म्हणणे होते. पायरोने त्याचा नेहमीचा युक्तीबाजपणा दाखवला नाही. पण नुसता बघत बसला. त्याच्या चेहऱ्यावरील भाव बघून, मला गोंधळलेल्या मुलाची आठवण झाली. मी

नॉर्मनशी बोललो. तो मला मनोरंजक माणूस वाटला. डोव्हर आल्यावर, पायरोच्या वर्तनाने मला हसू येऊ लागले. छोटा माणूस. बोटीच्या बोर्डावर गेल्यावर तो माझ्या हाताला काळजीने चिकटला. वारा लालसेने वहात होता.

तो पुटपुटला, “अरे देवा, हे भयानक आहे.”

मी ओरडलो, “पायरो, धीर धर. तू यशस्वी होशील. तुला तो सापडेल. माझी खात्री आहे.”

आहा, माझ्या मित्रा, तू माझ्या भावना ओळखायला चुकतो आहेस. हा अक्राळ विक्राळ समुद्र आहे. तो मला त्रास देतो आहे. मला समुद्र लागतो आहे. हे फार त्रासदायक आहे!”

मी घाबरून म्हणालो, “ओहो!”

इंजिनचे पहिले गुरगुरणे ऐकू आले. पायरो ओरडला व डोळे बंद केले.

“मेजर नॉर्मनकडे फ्रान्सचा नकाशा आहे. तुला त्याचा अभ्यास करायचा आहे का?”

पायरोने अधीरपणे डोके हलवले. “पण नको. पण नको. माझ्या मित्रा, मला एकट्याला राहू दे. तू असे बघ, विचार करण्यासाठी पोट व डोके सुरळीत पाहिजे. समुद्र लागण्यावर, मी

उपाय करतो. श्वास घ्या व सोडा. सावकाश –-- डोके डावीकडून उजवीकडे हलवा. प्रत्येक श्वासामध्ये सहा आकडे मोजा.”

मी त्याला त्याच्या व्यायामावर सोडून दिले व डेकवर आलो.

आम्ही हळूहळू बोनोनिया बंदराजवळ आलो, तेव्हा पायरो आला. तो चांगला हसरा दिसत होता. तो मला कुजबुजत्या स्वरात बोलला की शेवटी त्याचा उपाय यशस्वी होऊन मळमळ थांबली.

जापचे बोट नकाशावरील काल्पनिक मार्गाने फिरत होते. “काय मूर्खपणा आहे! मोटार बोनोनियापासून निघाली --- इथे फाटे फुटले आहेत. आता माझी अशी कल्पना आहे, की त्यांनी पंतप्रधानांची गाडी बदलली असेल.”

उंच गुप्तहेर म्हणाला, “ठीक आहे. “मी एक ते दहा बंदरे तपासायची जबाबदारी घेतो. बोटीवरून उतरतांना त्यांनी त्याला पळवले आहे.”

जापने डोके हलवले. “नक्कीच”. लगेच आज्ञा दिली गेली, की सगळी बंदरे बंद करा.”

आम्ही जमिनीला लागलो, तेव्हा आता कुठे उजाडत होते. मेजर नॉर्मनने पायरोच्या दंडाला स्पर्श केला. “सर, सैन्याची गाडी इथे तुमच्यासाठी उभी आहे.”

“मिस्टर, आभारी आहे.पण एक मिनिट. मी बोनोनिया सोडायचे ठरवलेले नाही.”

“काय?”

“आपण या धक्क्याशेजारील हॉटेलमध्ये शिरू.”

त्याने बोलल्याप्रमाणे केले आणि एक खासगी खोली घेतली. गोंधळलेले व काही न समजलेले आम्ही तिघे त्याच्या मागे गेलो.

त्याने आमच्याकडे एक झटपट नजर टाकली. “चांगल्या गुप्तहेराने असे वागू नये. मला तुमच्या मनातील कळते आहे. काय? तो खूप उत्साही दिसत होता. तो मागेपुढे फिरत होता. त्याने धुळीच्या रस्त्यांवर तोंड खाली करून झोपून, भिंगाने टायरच्या खुणा शोधायला हव्यात. त्याने सिगरेटची थोटके आणि काडेपेटीच्या काड्या जमवायला हव्यात. अशी तुमची कल्पना असणार, नाही का?”

तो डोळ्यांनी आम्हाला आव्हान देत होता. “पण मी --- हर्क्युल पायरो --- ते तसे नाही. खरे पुरावे इथे आत असतात.” त्याने त्याच्या कपाळाकडे निर्देश केला. असे बघा, मी लंडन सोडायला नको होते. माझ्यासाठी माझ्या तेथील खोलीत शांतपणे बसणे पुरेसे होते. सगळे मेंदूच्या करड्या पेशींवर अवलंबून आहे. मी अचानक नकाशाची मागणी करेपर्यंत व एखाद्या ठिकाणावर बोट ठेवेपर्यंत,

त्या करड्या पेशी शांतपणे व गुप्तपणे भाग घेत नाहीत --- म्हणून --- मी म्हणतो, पंतप्रधान तिथे आहेत. आणि ते तसेच आहे. पद्धतशीरपणे तर्क करून, एखाद्याला काहीही हासील करता येते. घाबरून घाई करून फ्रान्सला जाणे चूक आहे --- हे मुलांचे लपाछपी खेळणे आहे. पण आता उशीर झाला असला तरी, आता मी माझे मन मला सांगते आहे, त्याप्रमाणे कामाची योग्य पद्धत सुरु करतो. मित्रानो, मी तुम्हाला विनंती करतो, शांत रहा."

आणि पाच तास तो छोटा माणूस मांजरासारखा त्याच्या पापण्या फडफडवत, स्वस्थ बसला. त्याचे हिरवे डोळे चमकून अधिक हिरवे होत होते. स्कॉटलंड यार्डचा माणूस तुच्छता दर्शवत होता. मेजर नॉर्मन कंटाळून अधीर झाला होता. आणि मी दमलो होतो, तरी दिखाऊपणे वेळ घालवत होतो.

शेवटी मी उठलो, आणि आवाज न करता इकडे तिकडे खिडकीजवळ फिरू लागलो. या प्रकरणाचे नाटक होत चालले होते. मला माझ्या मित्राची काळजी वाटत होती. जर तो अयशस्वी झाला, तर निदान त्याने कमी विचित्र पद्धतीने तसे व्हावे. खिडकीतून मी धक्क्याशेजारून रोज सुटणाऱ्या व हवेत धूर सोडणाऱ्या बोटी बघत होतो.

अचानक माझ्या कोपराजवळ मी पायरोचा चढा आवाज ऐकला.

“माझ्या मित्रानो, चला सुरवात करू या.”

मी वळलो. माझ्या मित्रात आमूलाग्र बदल झाला होता. त्याचे डोळे उद्दीपित होऊन चकाकत होते. त्याची छाती जास्तीत जास्त फुगली होती.

“माझ्या मित्रांनो, मी मूर्खपणा करत होतो. पण शेवटी माझ्या डोक्यात प्रकाश पडला.”

मेजर नॉर्मन घाईघाईने दाराकडे गेला. “मी गाडी मागवतो.”

“त्याची काही गरज नाही. मी ती वापरणार नाही. वारा पडला आहे, हे चांगले आहे.”

“सर, तुम्हाला असे म्हणायचे आहे का, की तुम्ही चालायला जात आहात?”

“नाही, माझ्या तरुण मित्रा. मी काही सेंट पीटर नाही. समुद्र बोटीने ओलांडणे, मी पसंत करतो.”

“समुद्र ओलांडणे?”

"हो. पद्धतशीर काम करण्यासाठी सुरवातीपासून सुरवात करायला पाहिजे. आणि या प्रकरणाची सुरवात इंग्लंडमध्ये झाली. त्यामुळे आपण इंग्लंडला परत आलो."

## दोन

तीन वाजता, आम्ही परत एकदा चेरिंग क्रॉसच्या फलाटावर उभे होतो. आमच्या सर्व चर्चेकडे पायरोने दुर्लक्ष केले.तो परतपरत सांगत राहिला की परत सुरवात करणे हे वेळ फुकट घालवणे नाही. तर तोच एकमेव मार्ग आहे. हा सर्व वेळ तो नॉर्मनशी हळू आवाजात बोलत होता. आणि नॉर्मनने डोव्हरपासून तारांचे ढीग पाठवले.

नॉर्मनकडील पासेसमुळे आम्ही चुटकीसरशी सगळीकडे अल्प वेळात जाऊ शकत होतो. लंडनमध्ये मोठी साध्या वेषातील पोलिसांची गाडी आमच्यासाठी थांबली होती. त्यातील एकाने माझ्या मित्राच्या हातात एक छापील कागद दिला. त्याने माझ्या चौकस नजरेला उत्तर दिले.

पश्चिम लंडनमधील विशिष्ट वर्तुळातील हॉस्पिटल्सना मी डोव्हरहून तारा पाठवल्या."

आपण लंडनच्या रस्त्यांवरून जोराने गोलगोल फिरत होतो. आपण बाथ रस्त्यावर होतो. पुढे पुढे जात होतो. हॅमरस्मिथ,

चिस्विक आणि ब्रेंटफोर्ड. मला आपले उद्दिष्ट जवळ आलेले दिसू लागले. विंडसरमधून व ॲसकॉटमधून आपण जात होतो. माझे हृदय उसळी घेत होते. ॲसकॉट मध्ये डॅनिएलची आत्या रहाते. आपण त्याच्यामागे होतो. ओ' मर्फीच्या नव्हे.

आपण ठरवून एका बारीकशा घरासमोर थांबलो. पायरो उडी मारून उतरला आणि घराची घंटी वाजवली. मी सरळपणे त्याचा एक गोंधळलेला, चकचकीत व भरभर बदलणारा चेहरा पाहिला. तो समाधानी नव्हता. घंटीला उत्तर मिळाले. त्याला आत घेतले गेले. काही क्षणात, तो बाहेर आला व त्याचे डोके जोराने हलवत, गाडीत बसला. माझ्या आशा मावळू लागल्या. आता चार वाजून गेले होते. जरी त्याला डॅनिएलचा गुन्हा शाबित होईल असा पुरावा मिळाला, तरी जोपर्यंत त्याला फ्रान्समधील पंतप्रधानांना डांबून ठेवलेली जागा सापडत नाही, तोपर्यंत, त्याचा काय उपयोग होता? आम्ही मध्ये मध्ये अडथळे येत, लंडनच्या जवळ येत चाललो होतो. आम्ही मुख्य रस्त्यापासून एकपेक्षा जास्त वेळा वळलो. प्रसंगानुरूप एका लहान इमारतीपाशी थांबलो. ती ओळखण्यात मला काही अडचण आली नाही. ते हॉस्पिटल होते. पायरोने प्रत्येक ठिकाणी फक्त काही मिनिटे घालवली. पण प्रत्येक वेळी थांबल्यावर, त्याची चमकदार खात्री वाढत गेली.

तो नॉर्मनच्या कानात काही पुटपुटला. त्याला नॉर्मनने उत्तर दिले, “हो. जर तुम्ही डावीकडे वळलात, तर तुम्हाला ते पुलाशी थांबलेले सापडतील.”

आम्ही एका गल्लीत वळलो. साधारण उजेडात मी रस्त्याच्या कडेला उभी असलेली एक दुसरी गाडी ओळखली. त्यात साध्या कपड्यातील दोन माणसे होती. पायरो खाली उतरून त्यांच्याशी बोलला. मग आम्ही उत्तर दिशेने निघालो. दुसरी गाडी आमच्या मागोमाग येत होती.

आम्ही काही वेळ तसेच गेलो. आम्हाला अर्थात लंडनच्या उत्तरेकडील एका उपनगरात जायचे होते. शेवटी आम्ही एका उंच घराच्या दारासमोर आलो. रस्त्याच्या थोडे मागे गाडी उभी केली.

मी आणि नॉर्मन गाडीत राहिलो. पायरो आणि दुसरा गुप्तहेर दाराशी गेले व घंटी वाजवली. एका व्यवस्थित नोकराणीने दार उघडले. गुप्तहेर बोलला, “मी पोलीस ऑफिसर आहे. आणि माझ्याकडे या घराची झडती घेण्याचे परवानापत्र आहे. ती बाई हळू किंचाळली. एक सुंदर मध्यमवयीन बाई हॉलमध्ये तिच्यामागे अवतीर्ण झाली. “एडिथ, दार लाऊन टाक. मला वाटते, ते चोर आहेत.”

पण पायरोने हळूच त्याचा पाय दारात घातला आणि त्याच वेळी, एक शिट्टी वाजली. लगेच इतर गुप्तहेर धावले आणि घरात शिरले. त्यांच्यामागे त्यांनी दार लावले.

नॉर्मन आणि मी आमच्या बळजबरीच्या निष्क्रीयतेला बोल लावत पाच मिनिटे थांबलो. शेवटी परत दार उघडले आणि माणसे बाहेर पडली. त्यात तीन कैदी होते. एक बाई आणि दोन पुरुष, यांना दुसऱ्या गाडीत बसवण्यात आले आणि एका माणसाला पायरोने आमच्या गाडीत बसवले.

"मित्रांनो, मला त्या इतरांबरोबर गेले पाहिजे. पण या गृहस्थाची नीट काळजी घ्या. तुम्हाला तो माहिती नाही. मला तुमची मिस्टर ओ' मर्फीशी ओळख करून देऊ दे."

"ओ' मर्फी! गाडी सुरु झाल्यावर, मी त्याच्याकडे तोंड उघडे टाकून बघत राहिलो. त्याच्या हातात बेड्या ठोकलेल्या नव्हत्या. पण तो पळून जायचा प्रयत्न करेल, असे मला वाटत नव्हते. तो जणू डुलकी काढत असल्यासारखा समोर बघत होता. काही झाले तरी, नॉर्मन आणि मी त्या एकट्यासाठी भारी होतो.

आम्ही अजून उत्तर दिशेनेच जात असल्यामुळे मला आश्चर्य वाटत होते. आम्ही आता लंडनला परतत नव्हतो. मी कोड्यात पडलो होतो. अचानक गाडीचा वेग मंदावला. मी ओळखले, की

आम्ही हेनडॉन विमानतळाजवळ होतो. लगेच मला पायरोची कल्पना लक्षात आली. फ्रान्सला विमानाने जायचे होते .ही वरवर दिसायला मस्त कल्पना होती. पण अव्यवहार्य होती. त्यापेक्षा तार लवकर पोचली असती. वेळ महत्वाचा होता. पंतप्रधानांची सुटका करण्यामुळे मिळणारी व्यक्तिगत कीर्ती त्याने दुसऱ्याला द्यायला हवी होती. जसे आम्ही बसलो, तसे नॉर्मनने बाहेर उडी मारली आणि साध्या कपड्यातील माणसाने त्याची जागा घेतली. तो पायरोबरोबर काही मिनिटे बोलला आणि नंतर भरभर निघून गेला.

मी पण उडी मारली आणि पायरोचा दंड धरला.

“अरे माणसा, मी तुझे आभार मानतो. मी तुला लपायची जागा सांगितली होती ना? पण इकडे बघ. तू फ्रान्सला ताबडतोब तार केली पाहिजेस. जर तुझा तू गेलास, तर फार उशीर होईल.”

पायरोने माझ्याकडे एकदोन मिनिटे पाहिले. “माझ्या मित्रा, दुर्दैवाने काही गोष्टी तारेने पाठवता येणार नाहीत.”

## तीन

त्याच क्षणी मेजर नॉर्मन परत आला. त्याच्याबरोबर वायुसेनेतील एक गणवेषधारी तरुण ऑफिसर होता. “हा कॅप्टन

लायल आहे. तो तुम्हाला फ्रान्सला पोचवेल. तो लगेच उड्डाण करेल.”

तो तरुण विमानचालक म्हणाला, “थंडी वाजणार नाही, अशा तऱ्हेने गुंडाळून घ्या. तुम्हाला हवा असेल, तर मी कोट देऊ शकतो.”

पायरो त्याच्या मोठ्या घड्याळाकडे बघत होता. तो स्वतःशी पुटपुटला, “हो. अजून वेळ आहे अगदी नेमका वेळ आहे.” मग तो वर बघून नम्रपणे त्या तरुण ऑफिसरसमोर वाकला. “मिस्टर, मी तुमचा आभारी आहे. पण तुमचा उतारू म्हणून नव्हे, तर एक सभ्य गृहस्थ म्हणून आभारी आहे.

बोलतांना तो एका बाजूला झाला आणि एक आकृती अंधारातून पुढे आली. तो दुसऱ्या गाडीत गेलेला कैदी होता. त्याच्यावर उजेड पडल्यावर, मला नवल वाटले. ते, पंतप्रधान होते!

## चार

पायरो, नॉर्मन आणि मी मोटारीने लंडनला परत जाताना, मी अधीरतेने ओरडलो, “कृपा करून, मला याबद्दल सर्व काही सांग. त्याला बेकायदेशीरपणे कसे काय परत इंग्लंडला आणले गेले?”

पायरो कोरडेपणे बोलला, “त्याला बेकायदेशीरपणा करून परत आणायची काही गरज नव्हती. पंतप्रधान कधीच इंग्लंडबाहेर गेले नव्हते. विंडसरहून लंडनला जातांना त्यांचे अपहरण झाले होते.”

“काय?”

“मी सर्व काही स्पष्ट करतो. पंतप्रधान गाडीत होते. त्यांचा सचिव त्यांच्या बाजूला होता. अचानक त्यांच्या चेहऱ्यावर क्लोरोफॉर्मचा बोळा दाबला गेला --- “

“पण कोणी हे केले?”

“हुशार भाषातज्ञ कॅप्टन डॅनिएलने केले. पंतप्रधान बेशुद्ध झाल्यावर, डॅनिएलने बोलायची वायर उचलली व ओ’ मर्फीला गाडी उजवीकडे घेण्यास सांगितली. चालकाला काही संशय आला नाही. त्या सुनसान रस्त्यावर थोडेसे गेल्यावर, एक मोठी गाडी उभी होती. ती मोडकी दिसत होती. त्याच्या चालकाने ओ’ मर्फीला थांबण्याची खूण केली. ओ’ मर्फीने गाडी हळू केली. तो परका इसम जवळ आला. डॅनिएल खिडकीतून बाहेर वाकला. आणि बहुधा झटपट तिथे आलेल्या एका भूलतज्ञाच्या मदतीने ताबडतोब पंतप्रधानांना इथाइलअल्कोहोल आणि क्लोरोफॉर्म परत दिले गेले. काही सेकंदात, दोन निराधार लोकांना बाहेर ओढून,

दुसऱ्या गाडीत ठेवण्यात आले. आणि तोतया लोकांनी त्यांची जागा घेतली.”

अशक्य!”

“मुळीच नाही. तुम्ही संगीत हॉलमध्ये तोतया व्यक्तींना फार नेमकेपणे ओळखून काढलेले पाहिलेले नाही का? एखादी समाजप्रिय व्यक्तीचा तोतया असल्याचे भासवणे अगदी सोपे आहे. इंग्लंडचे पंतप्रधान उभे करणे हे क्लॅफॅमचे मिस्टर जॉन स्मिथ उभे करण्यापेक्षा फार सोपे आहे. ओ' मर्फीचा तोतया उभा करणे सोपे होते, कारण एकदा पंतप्रधान निघून गेल्यावर, कोणी त्याची दखल घेण्याचे काही कारण नव्हते. त्यानंतर त्याने स्वतःला तो आधी होता, तसे करून पळ काढला. मग तो चेरिंग क्रॉसपासून, गाडी चालवत, त्याच्या मित्रांना भेटायच्या जागेपर्यंत ओ' मर्फी म्हणून गेला. आणि मग कोणी वेगळाच माणूस म्हणून अवतीर्ण झाला. अशा तऱ्हेने त्याच्यामागे सोयीस्करपणे संशयाचे जाळे सोडून ओ' मर्फी नाहीसा झाला.”

पण पंतप्रधानांचे सोंग घेणाऱ्या माणसाला सगळ्यांनी बघितलेले असते!”

त्याना जवळून किंवा खासगीपणे ओळखणाऱ्या कुणी पाहिलेले नसते. आणि डॅनिएलने शक्यतो कुणी त्याना पाहू नये,

अशी काळजी घेतलेली असते. शिवाय त्यांचा चेहरा मलमपट्टी केलेला असतो. आणि त्यांच्यावर हल्ला करायच्या झालेल्या प्रयत्नामुळे त्यांना धक्का बसलेला आहे, या नावाखाली त्यांच्या वागण्यात काही वेगळे दिसले तर ते झाकायचा प्रयत्न केला जातो. मिस्टर मॅकअॅडम यांचा घसा कमकुवत होता. त्यामुळे ते त्यांच्या मोठ्या भाषणापूर्वी कमीत कमी बोलत असत. फ्रान्सपर्यंत फसवणे फारच सोपे होते. तिथे ते अव्यवहार्य आणि अशक्य होते --- त्यामुळे पंतप्रधान नाहीसे झाले. या देशाच्या पोलिसांनी घाईने खाडीत शोध घेतला. आणि पहिला हल्ला झाला, त्यासंबंधी कोणीच काही केले नाही.

फ्रान्समध्ये अपहरण झाले, असे भासवण्यासाठी डॅनिएलने खरे वाटेल अशा तऱ्हेने, स्वतःवर क्लोरोफॉर्म शिंपडून व तोंड कापडाने आवळून घेतले."

"आणि पंतप्रधानांचे सोंग घेणारा माणूस?"

"त्याने ते सोंग काढून टाकले. तो आणि बोगस चालक यांना कदाचित संशयावरून, अटक होईल. पण कोणालाही त्यांचा या नाटकात खरा सहभाग होता, याचा स्वप्नातही संशय येणार नाही. आणि पुरावा नसल्यामुळे, शेवटी त्यांना सोडून देण्यात येईल."

"आणि खरे पंतप्रधान?"

“ते आणि ओ’ मर्फी यांना सरळ डॅनिएलची तथाकथित आत्या, मिसेस एव्हरार्ड यांच्या घरी मोटारीने नेले जाते. खरे पहाता, ती फ्राऊ बर्था इबेनथाल आहे आणि पोलीस काही काळ तिच्या शोधात आहेत. ही एक मूल्यवान गोष्ट मी तेव्हा केली --- आणि डॅनिएलबद्दल काही बोलूच नका. आहा, तो फार हुशारीने केलेला बेत होता. पण हर्क्युल पायरोच्या हुशारीपुढे तो निःप्रभ ठरला!”

मला वाटते माझ्या मित्राला त्याच्या बढाई मारण्यासाठी माफ करायला हवे.

“पहिल्यांदा तुला या प्रकरणातील खऱ्याचा संशय केव्हा आला?”

“जेव्हा मी नीट काम करायला सुरवात केली --- आतून, मनापासून! मला हल्ला झाला ते यात नीट बसत नाही, असे वाटले. पण जेव्हा याचा एकंदर परिणाम मला मुसक्या बांधलेले व बेशुद्ध केले गेलेले पंतप्रधान फ्रान्सला जाण्यात झालेला दिसला, तेव्हा मला या प्रकरणाचे आकलन होऊ लागले. आणि जेव्हा मी विंडसर व लंडन मधील सर्व हॉस्पीटल्स पालथी घातली, आणि काही हाती लागले नाही, कारण माझी खात्री आहे, की, त्या सकाळी त्यांचा चेहरा मलमपट्टी करुन बांधून ठेवलेला होता. त्यानंतर माझ्यासारख्यासाठी तो मुलांचा खेळ होता!”

दुसऱ्या दिवशी सकाळी पायरोने मला त्याला नुकतीच आलेली एक तार दाखवली. ती कुठून आली, तो काही उल्लेख नव्हता व त्यावर सहीसुद्धा नव्हती. ती अशी होतीः "वेळेवर"

त्यादिवशी नंतर संध्याकाळच्या वर्तमानपत्रात, संबंधित लोकांच्या त्या परिषदेचा वृत्तांत प्रसिद्ध झाला होता. त्यात त्यांनी मिस्टर डेव्हिड मॅकॲडम याना श्रोत्यांकडून मोठ्या प्रमाणात, विशेष वाहवा मिळाल्याच्या बातमीवर मोठा भर दिलेला होता. त्यांच्या स्फूर्तीदायक भाषणाने खोल व टिकणारा परिणाम घडवून आणल्याचे म्हटले होते.

THE JEWEL ROBBERY AT THE GRAND METROPOLITAN

# महानगरातील हिऱ्यांची चोरी



मी म्हणालो, पायरो, हवाबदल चांगला राहील."

"माझ्या मित्रा, तुला असे का वाटते?"

"माझी तशी खात्री आहे."

माझा मित्र हसत बोलला, "अस्स! सगळी तयारी झाली आहे, तर मग?"

“तू येशील ना?”

“तू मला कुठे न्यायचे ठरवले आहेस?”

“ब्रिघटन. खरे तर माझ्या शहरातील मित्राने मला चांगली गोष्ट सांगितली. --- आणि ठीक आहे, माझ्याकडे उडवायला पैसे आहेत. मोठ्या शहरात शनिवार रविवार काढणे, आपल्यासाठी जगातील भली गोष्ट ठरेल.”

“आभारी आहे. मी हे ऋणाइत होऊन मान्य करतो. माझ्यासारख्या म्हाताऱ्याबद्दल असा विचार करणारे तुझे हृदय मोठे आहे. मेंदूतील छोट्या सगळ्या करड्या पेशींइतक्या किमतीचे ते आहे. हो. हो. हे बोलणारा मी, कधीकधी ते विसरायच्या धोक्यात असतो.”

तू सांगतो आहेस, तशी ती चैनच दिसते आहे. मला वाटते कधीकधी पायरो माझी मानसिक क्षमता कमी समजायच्या विचारात असतो. पण त्याचा आनंद इतका स्पष्ट दिसत होता, की मी माझा राग बाजूला सारला.

मी घाईने बोललो, “मग ठीक आहे.”

शनिवारी संध्याकाळी आम्ही मोठ्या शहरातील आमोद्पूर्ण गर्दीत जेवत होतो. सगळे जग आणि त्यांच्या बायका ब्रिघटनमध्ये असल्यासारखे दिसत होते. छान छान कपडे व रत्नांचे दागिने ---

उच्च अभिरुचीपेक्षा मिरवण्याची हौस दाखवत होते. हे फार भव्य दृष्य होते.

पायरो पुटपुटला, “अरे, हे सर्व खूप मस्त आहे. हेस्टीग्ज, हे बेकायदेशीरपणे नफा मिळवणाऱ्यांचे घर दिसते आहे, नाही का?”

मी उत्तरलो, “ते तसेच असणार. पण आपण आशा करू, की ते सगळे नफा मिळवायच्या मागे नसणार.”

पायरोने उद्दीपित होत आजूबाजूला नजर टाकली.

जिकडे तिकडे एवढी रत्ने बघून, मला ती ओळखण्यापेक्षा, गुन्हा करावासा वाटू लागला आहे. एखाद्या निष्णात चोराला केवढी मोठी संधी आहे! हेस्टीग्ज, ती खांबाजवळील दणकट बाई बघ. तू म्हणशील, ती हिऱ्यांनी मढ़ली आहे.”

मी त्याच्या नजरेच्या दिशेने बघितले.

मी ओरडलो, “काय, ती तर मिसेस ओपाल्सेन आहे.”

“तुला ती माहिती आहे?”

“थोडीशी. तिचा नवरा श्रीमंत शेअरदलाल आहे आणि आताच्या तेलाचे भाव चढलेल्या काळात त्याने खूप पैसा कमावला आहे.”

जेवणानंतर स्वागतकक्षामध्ये आम्हाला ओपाल्सेन भेटले. मी पायरोची त्यांच्याशी ओळख करून दिली. आम्ही काही मिनिटे गप्पा मारल्या आणि शेवटी कॉफी घेतली.

मिसेस ओपाल्सेनच्या मोठ्या छातीवर झळकणाऱ्या महाग हिऱ्यांचे पायरोने कौतुक केले. त्यामुळे, ती खूष झाली.

"मिस्टर पायरो, मला दागिने खूप आवडतात. तो माझा छंद आहे. एडला माझी ही आवड माहिती असल्याने, जेव्हा जेव्हा त्याला चांगली प्राप्ती होते, तेव्हा तो मला काही नवीन हिरे आणतो. तुम्हाला सुंदर हिऱ्यामध्ये रस आहे का?"

"बाईसाहेब, मी कधीकधी त्यांचे चांगले व्यवहार करतो. माझ्या व्यवसायाने मला जगातील उत्तम प्रसिद्ध हिऱ्यांच्या संपर्कात आणले आहे."

त्याने काळजीपूर्वक काही हिऱ्यांची टोपण नावे सांगून, राजघराण्यातील ऐतिहासिक हिऱ्यांच्या गोष्टी सांगितल्या. आणि मिसेस ओपाल्सेनने त्या श्वास रोधून ऐकल्या.

त्याचे संपल्यावर, ती उद्गारली, "आता ते सर्व एखाद्या नाटकासारखे वाटते आहे. माझ्याकडे असे ऐतिहासिक गोष्टी जोडले गेलेले मोती आहेत. माझ्या अंदाजाप्रमाणे ते जगातील उत्तम नेकलेसपैकी एक असेल --- मोती इतके चपखलपणे बसवले

आहेत व इतके तेजस्वी आहेत, की मला ते मिळाले, हे माझे भाग्यच मी समजते.”

पायरो म्हणाला, “ओहो, बाईसाहेब, तुम्ही फारच मैत्रीपूर्ण आहात. हे बदलू नका.”

“पण मला तुम्हाला ते दाखवायला आवडेल.”

ती फुगलेली बाई कशीबशी लहान पाऊले टाकत तिच्या मानाने भरभर चालत लिफ्टपाशी गेली. माझ्याशी बोलणाऱ्या तिच्या नवऱ्याने पायरोकडे प्रश्नार्थक नजरेने पाहिले.

पायरो स्पष्टीकरण देत बोलला, “मिस्टर ओपाल्सेन, तुमची बायको इतकी मनमोकळी आहे, की तिला मला ते मोत्याचे नेकलेस दाखवायचेच आहे.”

मिस्टर ओपाल्सेन समाधानाने उद्गारले, “ओहो, मोती! हो, ते बघण्यासारखे आहेत. महागही पडले होते. पण ती किंमत बरोबर होती. मला माझ्या पैशांचा पुरेपूर मोबदला मिळाला, कदाचित जास्तच मिळाला. पण हल्ली जशा वस्तू मिळतात, त्यामानाने एखादे वेळेस ती किंमत जास्त असेल. कर भरायला लागतो, त्यामुळे आश्चर्यकारक रीत्या शहरांमधील लोकांकडे खिशात तुटपुंजा पैसा असतो. हा सर्व भयंकर प्रकार आहे.” तो तांत्रिक बाबींबद्दल बोलत राहिला. ते मला काही कळेना.

एका निरोप्या मुलाने त्याला थांबवले व त्याच्या कानात काही सांगितले.

“आं --– काय? मी लगेच येतो. ती ठीक आहे ना? मला माफ करा.”

त्याने आम्हाला वाऱ्यावर सोडून दिले. पायरोने त्याची एक रशियन सिगरेट शिलगावली. मग त्याने कॉफीचे रिकामे कप नीट ओळीने लावले

आणि ते कसे दिसतात, ते पाहू लागला.

काही मिनिटे गेली. ओपाल्सेन परत आला नाही.

काही वेळाने मी म्हणालो, “हे विचित्र झाले. ते कधी परत येतील?”

पायरो खाली जाणारी धूम्रवलये बघत विचारपूर्वक बोलला, “ते परत येणार नाहीत.”

“का?’

“कारण माझ्या मित्रा, काहीतरी झाले आहे.”

मी चौकसपणे विचारले, “काय झाले असेल? तुला कसे ते माहिती?”

पायरो हसला.

काही मिनिटात व्यवस्थापक घाईने त्याच्या कार्यालयातून बाहेर आला आणि वर धावला. तो फार रागावलेला दिसत होता. निरोप सांगणारा मुलगा तशाच एका दुसऱ्या मुलाशी अगदी तन्मय होऊन काही बोलत होता. लिफ्टची बेल तीन वेळा वाजली पण त्याने तिकडे लक्ष दिले नाही. तिसरे म्हणजे, वेटर मंडळीदेखील गोंधळली होती आणि त्याना गोंधळवणे --- "

पायरोने काही निश्चयाने डोके हलवले. "काहीतरी भलतेच घडलेले दिसते. आहा, मी म्हणतो तसेच काही आहे. हे बघ, पोलीस आले आहेत."

दोन माणसे हॉटेलमध्ये नुकतीच शिरत होती --- एक गणवेषात होता आणि दुसरा नेहमीच्या कपड्यात होता. ते एका मुलाबरोबर बोलले आणि ताबडतोब वरती गेले. काही मिनिटांनी, तोच मुलगा आम्ही बसलो होतो, तिथे खाली आला.

पायरो झटकन उठून उभा राहिला. तो जणू त्याला बोलावण्याची वाट बघत होता. मी पण आनंदाने भरभर त्याला साथ द्यायला तयार झालो.

ओपाल्सेन यांची सदनिका पहिल्या मजल्यावर होती. दारावर टकटक केल्यावर एका मुलाने दार उघडले. "आत या." तिथे आम्हाला विचित्र दृष्य दिसले. ती मिसेस ओपाल्सेन यांची

झोपायची खोली होती. आणि तिथे मध्यभागी एका खुर्चीवर ती मोठ्याने विलाप करत, पहुडली होती. तिच्या चेहऱ्यावर थापलेल्या पावडरचा थर वाहून जाऊन, तिथे अश्रूंनी मोठी सुरकुती निर्माण केली होती. मिस्टर ओपाल्सेन रागाने खालीवर फेऱ्या मारत होते. दोन पोलीस खोलीच्या मध्यभागी उभे होते. त्यापैकी एकाच्या हातात वही होती. शेकोटीजवळ उभी असलेली खोलीची व्यवस्था बघणाऱी हॉटेलची बाई, मरणांतिक घाबरलेली दिसत होती. खोलीच्या दुसऱ्या बाजूला एक फ्रेन्च बाई, मिसेस ओपाल्सेन यांची नोकराणी हात जोरजोराने वेडेवाकडे हलवत, तिच्या मालकीणीशी स्पर्धा करत रडत होती

या गोंधळात व्यवस्थित व हसरा पायरो शिरला. लगेच नवल वाटेल अशा उत्साहाने, मिसेस ओपाल्सेन तिच्या खुर्चीतून तिचे मोठे धूड सांभाळत उडी मारून उठली व त्याच्याकडे जाऊ लागली.

“आता तिथे, एड त्याला काय हवे ते म्हणो, पण माझा नशीबावर भरवसा होता, नक्की होता. माझे नशीब चांगले, म्हणून आज संध्याकाळीच मी तुम्हाला भेटले. मला वाटते, तुम्ही सोडून इतर कुणीच माझे मोती मला परत मिळवून देऊ शकणार नाही.”

पायरो तिच्या हातावर थोपटत म्हणाला, “शांत व्हा. बाईसाहेब, मी तुमच्यासाठी प्रार्थना करतो. तुम्ही खात्री बाळगा. सर्व काही ठीक होईल. हर्क्युल पायरो तुम्हाला मदत करेल.”

मिस्टर ओपाल्सेन पोलीस इन्स्पेक्टरकडे वळले.

“या सभ्य गृहस्थाला हाक मारण्यात माझी काही --- चूक होणार नाही, असे मला वाटते, बरोबर?”

त्या माणसाने बेफिकीरपणे उत्तर दिले “अजिबात नाही, सर. आता कदाचित तुमच्या बायकोला जरा बरे वाटले असेल. त्यामुळे ती आम्हाला कायकाय झाले, ते सांगू शकेल, नाही का?”

मिसेस ओपाल्सेन निराधार असल्यासारखे, पायरोकडे बघत होती. त्याने तिला परत खुर्चीत बसण्यास सांगितले. “बसा बाईसाहेब, आणि स्वतःला त्रास करून न घेता, जे घडले ते सगळे आम्हाला सांगा.”

अशा तऱ्हेने समजूत घातल्यावर, मिसेस ओपाल्सेनने तिचे डोळे पुसून, सांगायला सुरवात केली. “मी जेवणानंतर मिस्टर पायरोना माझे मोत्याचे नेकलेस दाखवण्यासाठी वर आले. नेहमीप्रमाणे, खोलीची व्यवस्थापिका व नोकराणी खोलीत होते --- “

“माफ करा बाईसाहेब, पण ‘नेहमीप्रमाणे’ म्हणजे काय?”

मिसेस ओपाल्सेनने स्पष्ट केले. “मी असा नियम घालून दिला होता, की नोकराणी तिथे असल्याशिवाय कुणी खोलीत यायचे नाही. सकाळी नोकराणी तिथे हजर असतांना खोलीची व्यवस्थापिका खोली स्वच्छ करून घेत असे. आणि जेवणानंतर येऊन त्याच अटीवर पलंगपोस बदलून जात असे. नाहीतर कोणी खोलीत येत नसे.”

मिसेस ओपाल्सेनने पुढे चालू ठेवले, “मी वर आले. मी येथील खण उघडला.” --- तिने टेबलाचा तळाचा उजवीकडील खण दाखवला --- “मी माझी हिऱ्याची पेटी बाहेर काढली व परत तो कुलुपबंद केला. सर्व नेहमीसारखेच वाटत होते. पण त्यात मोती नव्हते!”

इन्स्पेक्टर त्याच्या वहीत लिहित होता. त्याने विचारले, “तुम्ही ते शेवटी केव्हा पाहिलेत?”

“मी जेवणासाठी खाली गेले, तेव्हा ते होते.”

“तुमची खात्री आहे?

“अगदी नक्की. ते घालावेत की नाही याबद्दल माझ्या मनात संभ्रम होता. पण शेवटी मी पाचूचे नेकलेस घातले व मोती परत पेटीत ठेऊन दिले.”

“पेटी कुलुपबंद कोणी केली?”

ती किल्ली हातात धरून म्हणाली, “मी केली आणि मी ती माझ्या गळ्यातील चेनमध्ये घातली.

इन्स्पेक्टरने ती तपासली व खांदे शहारवले.

“चोराकडे दुसरी किल्ली असली पाहिजे. त्यात काही कठीण नाही. कुलूप अगदी साधे आहे. तुम्ही पेटी कुलुपबंद केल्यावर काय केले?”

“मी ती नेहमीप्रमाणे खालच्या खणामध्ये ठेवली.”

“तुम्ही खण कुलुपबंद केला नाही का?”

“नाही, मी कधीच करत नाही. माझी नोकराणी मी वर येईपर्यंत खोलीतच असते. त्यामुळे तशी काही गरज नसते.”

इन्स्पेक्टरचा चेहरा करडा झाला.

“म्हणजे मी असे समजू का, की तुम्ही जेवणासाठी खाली गेलात तेव्हा मोती तिथे होते. आणि तेव्हा सर्व वेळ नोकराणी खोलीतच होती?”

अचानक तिच्या स्वतःवरील परिस्थितीचे गांभीर्य जाणवून, नोकराणीने पहिल्यांदाच एक भेदक किंकाळी मारली. आणि पायरोकडे बघून ती गोंधळून जाऊन फ्रेन्चमध्ये भरभर काही बोलू लागली.

तिची सूचकता कोणाच्या लक्षात आली नसती, की तिने बाईसाहेबांची चोरी केल्याचा तिच्यावर संशय घ्यावा. पोलीसही अशक्य मूर्खपणाबद्दल प्रसिद्ध होते. पण फ्रेन्च असलेला मिस्टर-"

पायरो मध्येच म्हणाला, "बेल्जियन" पण नोकराणीने चुकीच्या दुरुस्तीकडे काही लक्ष दिले नाही.

तिला फुकट शिव्या बसलेल्या मिस्टर पायरोला सहन झाले नाही. तिला सोडून देण्यात आले. तिला ती खोलीची व्यवस्थापिका असलेली, धीट, लाल तोंडाची, जन्मजात चोर कधीच आवडली नव्हती. ती पहिल्यापासून म्हणत होती, की ती प्रामाणिक नाही. आणि तिने तिच्यावर करडी नजरही ठेवली होती. जेव्हा बाईसाहेबांच्या खोलीची स्वच्छता चालू होती, तेव्हाही मी तिच्यावर लक्ष ठेऊन होते. त्या मूर्ख पोलिसांना तिची झडती घेऊ दे. आणि जर त्यांना बाईसाहेबांचे मोती तिच्याकडे सापडले नाहीत, तर ते फार नवलपूर्ण असेल."

जरी हे आक्रमक व लांबण लावलेले विखारी बोलणे फ्रेन्चमध्ये भरभर म्हटले गेले असले, तरी नोकराणीने ते हावभावांनी संपत्तीशी संबंधित असल्याचे सुचवले होते आणि खोलीच्या व्यवस्थापिकेला त्यातला थोडा तरी अर्थ समजला होता. ती रागाने लाल झाली होती.

ती गरम होत बोलली, “जर त्या परदेशी बाईने मी मोती घेतल्याचे सांगितले असले, तरी ते खोटे आहे! ते म्हणतात, तशी मी कधीच नव्हते.”

नोकराणी ओरडली, “तिचा शोध घ्या. मी म्हटल्याप्रमाणे ते सापडतील.”

व्यवस्थापिका तिच्या अंगावर चालून जात म्हणाली, “तू खोटारडी आहेस. ऐकते आहेस ना? तूच ते चोरलेस. आणि माझ्यावर आळ घेते आहेस. मी तर बाईसाहेब परतण्यापूर्वी खोलीत फक्त तीन मिनिटे होते. तू तर मांजराने उंदराच्या मागे असावे, तशी नेहमीप्रमाणे सर्व वेळ इथे बसलेली होतीस.”

इन्स्पेक्टरने सेलेस्टीन नावाच्या त्या नोकराणीकडे प्रश्नार्थक नजरेने पाहिले. “हे खरे आहे का? तू खोली सोडून कधी बाहेर पडत नाहीस का?”

नोकराणीने हो नाही करत कबूल केले, “खरे तर मी बाईसाहेबांना कधीच एकटे सोडत नाही. पण इथे असलेल्या दारातून दोन वेळा मी गेले --- एकदा दोऱ्याचे रीळ आणण्यासाठी आणि एकदा माझी कात्री आणण्यासाठी. तेव्हा तिने चोरी केली असेल.”

व्यवस्थापिका रागाने ओरडली, “तू एकदाही गेली नव्हतीस. फक्त आतबाहेर डोकावत होतीस. पोलिसांनी माझी झडती घेतली, तर मला बरेच वाटेल. मला भीतीचे काहीच कारण नाही.”

त्याच वेळी दारावर टकटक झाली. इन्स्पेक्टर पुढे सरसावला. कोण आहे, ते बघितल्यावर, त्याचा चेहरा उजळला.

तो म्हणाला, “आहा! हे चांगले नशीब आहे. मी आमच्यापैकी एका झडती घेणाऱ्या बाईला बोलावले होते. आणि ती आली आहे. तुम्ही शेजारील खोलीत जाल का?”

त्याने मानेला झटका देत शेजारील खोलीकडे निघालेल्या व्यवस्थापिकेकडे बघितले. झडती घेणारी बाई तिच्या मागोमाग जाऊ लागली.

फ्रेंच मुलगी हुंदके देत खुर्चीत बसली. पायरो खोलीत आजूबाजूला ठळक गोष्टी बघत होता. मी माझ्या मनात त्याचे चित्र स्पष्टपणे तयार केले.

खिडकीजवळील एकाकडे मान हलवत त्याने विचारले, “हे दार कुठे जाते?

इन्स्पेक्टर म्हणाला, “मला वाटते, पुढच्या खोलीत. त्या बाजूने त्या खोलीला कडी लावलेली आहे.” पायरो तिथे चालत गेला व

ते त्याने पुन्हा खात्री करून पाहिले. ”दुसरी बाजू पण कडी लाऊन बंद आहे. त्यामुळे तिथून चोरीची शक्यता फेटाळली गेली आहे.

तो खिडकीशी चालत गेला व पत्येक खिडकी परतपरत तपासली.

“आणि पुन्हा --- काही नाही. बाहेरील गॅलरीतही काही नाही.”

इन्स्पेक्टर अधीरपणे म्हणाला, “तिथे काही सापडले, तरी त्याने आपल्याला मदत कशी होईल आणि नोकराणी जरी बाहेर गेली नसली, तरी आपल्याला मदत कशी होईल, हे मला कळत नाही.”

न गोंधळता पायरो बोलला, “जर नोकराणी ठाम आहे, की ती खोलीबाहेर गेली नाही, तर मग पुरावा?”

त्याचे बोलणे तोडत, व्यवस्थापिका व शोधणारी पोलीस बाई परत आले.

पोलीस बाई कमीत कमी शब्दात म्हणाली, “काही नाही.”

व्यवस्थापिका नीतीमत्तापूर्वक म्हणाली, “मी खरच अशी आशा करत नाही. आणि ती फ्रेंच बया! एका प्रामणिक मुलीवर गलीच्छ आरोप करतांना तिला लाज वाटली पाहिजे.”

दार उघडत इन्स्पेक्टर बोलला, “अग मुली, ठीक आहे. कुणीही तुझ्यावर आळ घेत नाही आहे. तू जा आणि तुझ्या कामाला लाग.”

जायचे नसतांना व्यवस्थापिका गेली.

तिने नोकराणीकडे निर्देश करून विचारले, “तिची झडती घेणार का?”

“हो. हो.” ती गेल्यांनंतर त्याने दार लावून किल्ली फिरवली.

नोकरांणी स्त्री पोलिसाबरोबर तिच्या लहानशा खोलीत गेली. काही मिनिटांनी ती बाहेर आली. तिच्याकडे काही सापडले नाही.

इन्स्पेटरचा चेहरा विदीर्ण झाला.

तो मिसेस ओपाल्सेनकडे बघून म्हणाला, “तुम्हाला माझ्याबरोबर यावे लागेल. पण सगळे पुरावे तसेच निर्देश करत आहेत. जर ते तिच्याकडे नाहीत, तर मग ते खोलीतच कुठेतरी लपवून ठेवले असणार.”

नोकराणीने एक भेदक किंकाळी मारली आणि पायरोच्या दंडाला जाऊन चिकटली. पायरोने वाकून तिच्या कानात काही सांगितले. तिने त्याच्याकडे वरती संशयास्पद रीतीने पाहिले.

“अग अग माझ्या मुली --- मी तुला खात्रीने सांगतो, की तू विरोध न केलेला बरे राहील.” मग इन्स्पेक्टरकडे वळून, तो

बोलला, मिस्टर, तुम्ही परवानगी देता का? एक लहानसा प्रयोग --
- फक्त माझ्या समाधानासाठी.”

एकदम कबुली न देता पोलीस ऑफिसर बोलला, “तो काय आहे, त्यावर ते अवलंबून राहील.”

पायरोने परत नोकराणीला हाक मारली.

“तू आम्हाला सांगितलेस, की तू रीळ आणायला तुझ्या खोलीत गेलीस. ते कुठे होते?”

“मिस्टर, सर्व खणांच्या वरती.”

“आणि कात्री?”

“तिथेच.”

“मी तुम्हाला असे विचारले की त्या कृती परत करून दाखवा, तर तुम्हाला किती त्रास होईल? तुम्ही इथे तुमचे काम करत बसला होतात, बरोबर?”

नोकराणी तिथे बसली व मग पायरोने खूण केल्यावर, उठून शेजारच्या खोलीत गेली. सर्व खणांच्या वरती असलेल्या त्या दोन वस्तू घेतल्या आणि परत आली.

पायरोने तिची हालचाल व त्याच्या हातातील मोठे घड्याळ यावर लक्ष केंद्रित केले.

"परत एकदा करता आले तर बघा."

आणि लागलेल्या काही सेकंदांच्या वेळावरून, त्याने त्याच्या खिशातील वहीत काही नोंद केली आणि घड्याळ परत खिशात ठेऊन दिले.

त्याने पोलीस ऑफिसरचे व नोकराणीचे आभार मानले.

नोकराणी रडत रडत साध्या वेषातील पोलीसाबरोबर बाहेर गेली.

मग मिसेस ओपाल्सेनची क्षमा मागत, इन्स्पेक्टर खोली धुंडाळायच्या कामाला लागला. त्याने खण ओढून बाहेर काढले. कपाटे उघडली. अंथरुणे पूर्णपणे विस्कटून शोधले. जमीन धोपटून बघितली. मिस्टर ओपाल्सेन थोड्या संशयाने बघत होते.

"तुम्हाला खरेच असे वाटते का, की तुम्हाला मोती सापडतील?"

"हो सर, हे असे शोधणे बरोबर आहे. तिला ते बाहेर घेऊन जाण्याइतका वेळ मिळालेला नाही. चोरी शोधायला आलेल्या बाईचे बेत थोड्याच वेळात कोलमडून पडले. नाही, ते इथेच आहेत. त्या दोघींपैकी कुणीतरी ते लपवले असणार. आणि नोकराणीने ते केलेले असेल, हे शक्य वाटत नाही. "

पायरो शांतपणे बोलला, "अशक्य! निव्वळ अशक्य!"

इन्स्पेक्टर उद्गारला, “आं --- “

पायरो नम्रपणे हसला. “मी दाखवतो. हेस्टीग्ज, माझ्या चांगल्या मित्रा, माझे घड्याळ काळजीपूर्वक तुझ्या हातात घे --- हे माझ्याकडे वंशपरंपरेने आलेले आहे. आत्ताच मी त्यावर नोकराणीच्या हालचालींची नोंद घेतली --- खोलीतून पहिल्यांदा तिचे जाणे, बारा सेकंदांचे होते व दुसरे पंधरा सेकंदांचे होते. आता माझ्या हालचालींची वेळ बघ. बाईसाहेबांनी मला हिऱ्यांच्या पेटीची किल्ली दिली आहे. त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. माझा मित्र हेस्टीग्ज मला जा म्हणेल, तेव्हा मी सुरवात करेन.

“मी म्हणालो, “जा.”

जवळजवळ अशक्य चपळपणे, पायरोने तो खण उघडला. हिऱ्यांची पेटी बाहेर काढली. त्या पेटीला किल्ली लाऊन ती उघडली. त्यातील एक दागिना निवडला. पेटी बंद करून कुलूप लावले आणि परत ती खणात ठेवून दिली. खण मागे सारला. विजेच्या चपळाईने त्याने हे केले.

त्याने दम टाकत मला विचारले, “कसे काय मित्रा?”

मी उत्तरलो, “सेहेचाळीस सेकंद.”त्याने आजूबाजूला पहात म्हटले, “बघितलेस? व्यवस्थापिकेला नेकलेस बाहेर काढायलाही पुरेसा वेळ नव्हता. मग लपवायची गोष्ट दूरच राहिली.”

इन्स्पेक्टर समाधानाने बोलला, “मग आता नोकराणीचाच प्रश्न राहिला.” आणि तो त्याच्या तपासाकडे वळला. तो बाहेरील दाराने नोकराणीच्या खोलीत शिरला.

पायरोने नाराजीने विचारपूर्वक भुवया उंचावल्या. अचानक त्याने मिस्टर ओपाल्सेनला प्रश्न केला. “या नेकलेसचा नक्कीच विमा उतरवलेला असणार, नाही का?”

या प्रश्नाचे मिस्टर ओपाल्सेन यांना आश्चर्य वाटलेले दिसले.

ते गुळमुळीतपणे बोलले, “हो. तो उतरवलेला आहे.”

मिसेस ओपाल्सेन रडतांना मध्येच म्हणाली, “पण त्याचे काय एवढे? ते माझे नेकलेस आहे आणि मला ते परत पाहिजे. ते एकमेवाद्वितीय होते. त्याबद्दल मला पैसे नको.”

पायरो समजूत घातल्यासारख्या आवाजात म्हणाला, “बाईसाहेब, मी समजू शकतो. एखाद्या बाईच्या भावना म्हणजे सर्वस्व आहे --- खरे की नाही? पण मिस्टर कुणाला असा संशय येणार नाही, की यात काही दिलासा देणारे तथ्य आहे.”

मिस्टर ओपाल्सेन खात्री नसल्यासारखे बोलले, “अर्थात, अर्थात पण तरीही --- “

एका बळकट इन्स्पेक्टरने मारलेल्या विजयाच्या आरोळीने त्याना थांबवले गेले. त्याने त्याच्या हातात धरून काही आणले होते.

मिसेस ओपाल्सेन तिच्या खुर्चीतून एक किंकाळी मारत उठली. ती पूर्णपणे बदलली होती.

“ओहो, माझे नेकलेस!”

तिने ते दोन्ही हातांनी तिच्या छातीशी लावले. ती गोल फिरली.

मिस्टर ओपाल्सेन विचारते झाले, “हे कुठे होते?”

“नोकराणीच्या पलंगाखाली. गादीच्या स्प्रिंगच्या वायरमध्ये! व्यवस्थापिका येण्यापूर्वीच, तिने नक्कीच ते चोरून, तिथे ठेवले असणार.”

पायरो हळूवारपणे बोलला, “बाईसाहेब, मी ते बघू शकतो का?” त्याने तिच्याकडून ते घेतले व जवळून त्याचे निरीक्षण केले. नंतर थोडे वाकून, ते परत केले.

इन्स्पेक्टर म्हणाला, “बाईसाहेब आता काही वेळ ते तुम्हाला आमच्याकडे द्यावे लागेल. आम्हाला ते किंमत लावण्यासाठी लागेल. पण आम्ही ते लवकरात लवकर तुम्हाला परत करू.”

मिस्टर ओपाल्सेनच्या कपाळावर आठी आली. “ते जरुरीचे आहे का?”

“हो, सर. ते आवश्यक आहे.”

त्यांची बायको ओरडली, “एड, त्याना ते घेऊ दे. त्याने नेलेले मला सुरक्षित वाटेल. दुसऱ्या कोणी ते पळवले आहे, या विचाराने माझा डोळ्याला डोळा लागत नव्हता. ती अवदसा! मला तिचा कधीच संशय आला नव्हता.”

“हे बघ प्रिये, इतके मनावर घेऊ नकोस.”

मला माझ्या खांद्यावर दाब जाणवला. तो पायरो होता.

“माझ्या मित्रा, आपण सटकायचे का? आपली इथे आता गरज नाही.”

एकदा बाहेर पडल्यावर, मात्र तो अस्वस्थ झाला. मला नवल वाटले. त्याने शेरा मारला, “मला ती नोकराणीची खोली बघायला आवडेल.

ती खोली उघडीच होती. आम्ही आत शिरलो. तो दोन खोल्यांचा ऐवज होता आणि रिकामी होती. जिकडे तिकडे धूळ दिसत होती. खिडकी जवळील टेबलावरील चौकोनी खुणेवर बोट फिरवल्यावर, माझ्या संवेदनशील मित्राने चेहरा वेडावाकडा केला.

त्याने कोरडेपणे निरीक्षण केले, “ही खोली स्वच्छ करण्याची गरज आहे.”

तो विचारपूर्वक खिडकीबाहेर पहात होता. आणि पार गुंग होऊन गेला होता.

मी अधीरतेने विचारले, “आपण इथे का आलो आहोत?”

त्याने सुरु केले, “मित्रा, मला क्षमा कर. मला खात्री करायची होती, की दार या बाजूने देखील लावलेले होते का?”

आम्ही आताच सोडलेल्या खोलीच्या दाराकडे बघत मी म्हटले, “हे इथून बंद आहे.”

पायरोने मान हलवली. तो अजूनही विचार करत होता.

मी चालू ठेवले, “आणि काही झाले तरी, त्याचे काय मोठेसे? केस संपली आहे. तुला हे शोधून काढायची संधी होती. पण इन्स्पेक्टरसारखा मूर्ख माणूसदेखील चुकू शकणार नाही, अशी ही केस होती.”

पायरोने डोके हलवले. “अजून केस संपली नाही. मोती कोणी चोरले, हे शोधून काढेपर्यंत ती संपणार नाही.”

“पण नोकराणीने चोरले!”

तू हे कशावरून म्हणतोस?”

मी चाचरत बोललो, “ते तिच्या खोलीतील गादीखाली --- सापडले.”

पायरो अधीरपणे म्हणाला, “अरेरे! ते खरे मोती नव्हते.”

“काय?”

“माझ्या मित्रा, ते खोटे / नकली मोती होते.”

ते ऐकून, मी गार पडलो. पायरो खट्टू वा उद्दीपित न होता, हसत होता.

त्या भल्या इन्स्पेक्टरला अर्थातच मोत्यातले काही कळत नाही. पण लवकरच गोंधळ सुरु होईल!”

मी त्याचा दंड खेचत बोललो, “चल, ये.”

“कुठे?”

“आपण ओपाल्सेन यांना लगेच सांगायला पाहिजे.”

“मला वाटते नको.”

“पण ती बिचारी बाई --- “

“अरे मित्रा, तू तिला बिचारी म्हणतो आहेस. पण आपली रात्र सुखाने घालवायची असेल, तर तसे न केलेले बरे. तिला वाटते आहे की मोती सुरक्षित आहेत, तर तसे!”

“पण चोर निसटतील.”

‘माझ्या मित्रा, नेहमीप्रमाणे तू विचार न करता बोलतोस. तुला कसे काय माहिती, की मिसेस ओपाल्सेनने आज रात्री एवढ्या काळजीपूर्वक कुलुपबंद केलेले मोती नकली नव्हते आणि खरी चोरी कधीतरी आधीच झाली नसेल?”

मी घाबरून बोललो, “ओहो!”

पायरो तत्परतेने बोलला, “आपण परत पहिल्यापासून सुरु करू.”

तो खोलीतून बाहेर पडला. क्षणभर थांबला. आणि मग खालील पॅसेजमध्ये शेवटपर्यंत गेला. तिथे व्यवस्थापिका आणि त्या त्या मजल्याचे वेटर्स जमत असत. आमची ती व्यवस्थापिका तिथे एक सभा घेत होती. आणि तिला आलेले अनुभव उत्सुक श्रोत्यांना सांगत होती. ती मध्येच बोलायची थांबली. पायरो त्याच्या नेहमीच्या पद्धतीने नम्रपणा दाखवत वाकला.

“मी मध्येच आलो, म्हणून मला माफ करा. पण तुम्ही मला मिस्टर ओपाल्सेनचे दार उघडून दिलेत, तर बरे होईल.”

ती बाई आनंदाने उठली आणि आम्ही तिच्याबरोबर परत पॅसेज ओलांडून, दुसऱ्या बाजूला असलेल्या मिस्टर ओपाल्सेन यांच्या खोलीशी आलो. त्याची खोली त्याच्या बायकोच्या

खोलीकडे तोंड करून होती. तिने दार उघडले व आम्ही आत शिरलो.

ती जायला निघणार, तेवढ्यात पायरोने तिला थांबवले.

“एक मिनिट; मिस्टर ओपाल्सेनच्या सामानात तुम्ही असले कार्ड पाहिले आहे का?”

त्याने कोरे पांढरे वेगळेच दिसणारे चकचकीत कार्ड हातात धरले. तिने ते घेऊन निरखून पाहिले.

“नाही, सर. मी पाहिलेले नाही. बहुतेक पुरुषांच्या खोलीचे काम पुरुष वेटर्स करतात.”

“अस्स, आभारी आहे.”

पायरोने कार्ड परत घेतले. ती बाई गेली. पायरोने थोडा विचार केला. मग त्याने झटकन मान थोडीशी वळवली.

“हेस्टीग्ज, कृपया वेटरसाठी तीनदा घंटी वाजव.”

मी तसे केले. पण मला खूप कुतूहल वाटत होते. पायरोने कचऱ्याची बादली जमिनीवर उपडी केली आणि त्यातील एकेक वस्तू तपासू लागला.

काही मिनिटात वेटर आला. पायरोने त्याला कार्ड देऊन, तोच प्रश्न विचारला. त्याला तेच उत्तर मिळाले. पायरोने त्याचे आभार

मानले. तो नाखुषीने, उपड्या कचऱ्याच्या बादलीकडे व जमिनीकडे बघत गेला. फाटके कागद गोळा करुन ते बांधून ठेवतांना, त्याने पायरोचा विचारपूर्वक केलेला शेरा जेमतेम ऐकला असेलः नेकलेसचा खूप मोठ्या किमतीचा विमा होता --"

मी ओरडलो, "पायरो, मला दिसते आहे --- "

त्याने लगेच उत्तर दिले, "तू काही पाहिले नाहीस. नेहमीप्रमाणे, काही नाही. यावर विश्वास ठेवणे अशक्य आहे --- पण ते तसेच आहे. चला. आपण आपल्या खोलीवर जाऊ."

आम्ही शांतपणे तिथे गेलो. तिथे पायरोने भरभर कपडे बदलून, मला आश्चर्यचकित केले

त्याने स्पष्ट केले, "मी आज रात्री लंडनला जातो. ते महत्वाचे आहे."

"काय?"

"खरच! मला खरच काम आहे. आणि ते सुद्धा डोक्याचे [ त्या छोट्या करड्या पेशींचे ] ते झाले, की मी त्याची खात्री करेन. ती होईलच. हर्क्युल पायरोला फसवणे अवघड आहे."

त्याच्या बढायांनी कंटाळून, मी विचार केला, 'एखादे दिवशी तू कापला जाणार आहेस.'

“अरे मित्रा, रागाऊ नकोस. आपल्या मैत्रीखातर मी एका कामासाठी तुझ्यावर अवलंबून आहे.”

माझ्या मनातील वाईट विचारांची लाज वाटून, मी उत्सुकतेने बोललो, “अर्थात, ते काय आहे?”

“माझ्या कोटाची बाही मी काढून ठेवली आहे --- ती तू ब्रश करशील का? त्याला थोडी पांढरी पावडर चिकटली आहे. तू मला टेबलाच्या खणावर बोट फिरवतांना पाहिले होतेस, नाही का?”

“नाही, मी नाही पाहिले.”

“मित्रा, तू माझी हालचाल बघितली पाहिजेस. अशा तऱ्हेने माझ्या बोटावर पावडर आली आणि मी थोडा उद्दीपित झालो होतो, त्यामुळे मी ती माझ्या बाहीवर चोळली. ते कसेही केलेले कृत्य मला आवडले नाही --- माझी सगळी तत्वे धुडकावली गेली.”

पायरोच्या तत्वात रुची न घेता, मी विचारले, “पण ती पावडर कसली होती?

पायरो चमकदारपणे बोलला, “बोर्गियाजचे विष नव्हे. तुझी कल्पनाशक्ती धावते आहे. ती फ्रेन्च खडूची पावडर होती.”

“फ्रेन्च खडूची?”

“हो. टेबलाचे खण बनवणारे तो नीट पुढेमागे होण्यासाठी ती वापरतात.”

मी हसलो.

“तू डँबिस! मला वाटले की तू काहीतरी भलताच उद्दीपित करणारा विचार करतो आहेस.”

“माझ्या मित्रा, मी निघतो तर!”

त्याच्या मागे दार लागले. थोड्या प्रेमाने व थोड्या विचित्रपणे, मी कोटाच्या बाहीला ब्रश करू लागलो.

## दोन

दुसऱ्या दिवशी सकाळी पायरोकडून काही न समजल्याने, मी फिरायला बाहेर पडलो. मला काही जुने मित्र भेटले. त्यांच्याबरोबर त्यांच्या हॉटेलमध्ये मी दुपारचे जेवण घेतले. मग आम्ही गाडीने सहलीला गेलो. गाडीचा टायर पंक्चर झाल्याने आम्हाला उशीर झाला. मला परत ग्रँड मेट्रोपॉलिटनला यायला आठ वाजून गेले.

माझ्या डोळ्याला पहिल्यांदा काय दिसले असेल, तर पायरोचा चेहरा नेहमीपेक्षा फारच उतरलेला होता. ओपाल्सेन नवराबायकोमध्ये तो चेपटला गेला होता. पण शांत समाधानाने चकाकत होता.

मला भेटायला धाऊन तो ओरडला, “अरे मित्रा हेस्टीग्ज, मला मिठी मार. सर्व काही आश्चर्यकारक घडले.”

नशीबाने, मिठी फक्त वरवरची ठरली --- नेहमी पायरोबद्दल मी जशी खात्री बाळगतो तसे काही नव्हते.

मी सुरवात केली, “म्हणजे तुला असे म्हणायचे आहे का --“

मिसेस ओपाल्सेन तिच्या थुलथुलीत चेहऱ्याने हसत म्हणाली, “फक्त नवलपूर्ण, असेच मी म्हणेन. एड, जर त्याला माझे मोती मिळाले नसते, तर कुणालाच मिळाले नसते, नाही का?”

“तू केलेस, प्रिय पायरो, तू करून दाखवलेस. आणि तुझे बरोबर होते.”

मी असहाय्यपणे पायरोकडे बघितले. आणि त्याने नजरेने उत्तर दिले.

“माझ्या मित्रा हेस्टीग्ज, तू इंग्लंडला समुद्रकाठी म्हणत होतास, तसेच झाले. बस. शेवट गोड झालेले सर्व काही मी तुला सांगतो.”

“शेवट?”

“हो. त्याना अटक झाली.”

“कोणाला अटक झाली?”

“व्यवस्थापिका आणि वेटर. भिकारडे! तुला त्यांचा संशय आला नव्हता का?” मी फ्रेंच खडूबद्दल तुला सुचवूनही नाही?”

“तू म्हणालास टेबलाचे खण तयार करणारे ते नीट सरकावेत म्हणून वापरतात.”

“ते नक्कीच वापरतात. खण सरकवताना आवाज होऊ नये म्हणून वापरतात. ते कोण असेल? अर्थातच फक्त व्यवस्थापिका! बेत इतका हुशारीने केला होता की तो एकदम डोळ्यात खुपत नव्हता --- हर्क्युल पायरोच्या डोळ्यानाही नाही.

“ते कसे केले गेले, ते ऐक. वेटर पुढील रिकाम्या खोलीत थांबलेला होता. फ्रेन्च नोकराणी खोली सोडते. व्यवस्थापिका एका झटक्यासरशी खण उघडते. हिऱ्यांची पेटी बाहेर काढते आणि कडी काढून, ती दारातून सरकवते. वेटर सावकाशीने त्याच्याकडे असलेल्या नकली किल्लीने ती उघडतो. नेकलेस बाहेर काढतो आणि थांबतो. नोकराणी परत खोली सोडते आणि ताबडतोब --- क्षणार्धात पेटी परत केली जाते व खणात ठेवली जाते.“

बाईसाहेब येतात. चोरी उघडकीला येते. व्यवस्थापिका रागारागाने न्याय्य रीतीने शोध घेण्याची मागणी करते. तिच्यावर काही आळ न घेता ती खोलीबाहेर पडते. त्या सकाळी खऱ्यासारखे नकली नेकलेस फ्रेन्च नोकराणीच्या गादीखाली व्यवस्थापिका ठेवते --- एकदम सही शक्कल!”

”पण तू लंडनला कशासाठी गेला होतास?

“तुला कार्ड आठवते का?”

“नक्कीच. त्याने मला गोंधळवले --- आणि अजूनही गोंधळवत आहे. मला वाटते --- “

मी मिस्टर ओपाल्सेनकडे बघून नाजूकपणे कां कू करू लागलो.

पायरो मनापासून हसला.

‘तुला असे वाटते का की हे वेटरच्या फायद्यासाठी होते? कार्डाचा पृष्ठभाग मुद्दाम विशेष प्रकारे हाताच्या बोटांच्या ठशांकरता बनवण्यात आला होता. मी सरळ स्कॉटलंड यार्डकडे गेलो. आपला जुना मित्र जापला भेटलो. त्याला सर्व हकीगत सांगितली. मला संशय होता ते ठसे दोन प्रसिद्ध हिरेचोरांचे होते. त्याना काही काळ शोधले जात होते. माझ्याबरोबर जाप आला. हिरेचोरांना पकडले. त्या वेटरकडे ते नेकलेस सापडले. हुशार जोडी! पण त्यांची पद्धत चुकली. हेस्टीग्ज, मी तुला छत्तीस वेळा तरी सांगितले नव्हते का की पद्धतीशिवाय --- “

मी मध्येच बोललो, “छत्तीस हजार वेळा तरी! पण त्यांच्या पद्धतीने कुठे मार खाल्ला?”

“अरे मित्रा, व्यवस्थापिका व वेटर यांचा बेत चांगला होता --- पण तुम्ही तुमच्या कामात तुम्ही टाळाटाळ करता कामा नये.

त्यांनी रिकामी खोली स्वच्छ केली नाही आणि त्यामुळे त्या माणसाने जेव्हा हिऱ्यांची पेटी दाराजवळील लहान टेबलावर ठेवली, तिथे चौकोनी छप्पा उठला -- “

मी ओरडलो, “मला आठवते आहे.

आधी मी काही ठरवले नव्हते. पण --- मला समजले.”

तिथे क्षणभर शांतता पसरली.

मिसेस ओपाल्सेन म्हणाली, “आणि मला माझे मोती मिळाले.”

मी बोललो, “छान! मला भूक लागली आहे.”

पायरो माझ्याबरोबर आला.

मी म्हणालो, “तुझ्यावर स्तुतीचा वर्षाव झाला असेल.”

“मुळीच नाही. जाप आणि स्थानिक इन्स्पेक्टर त्याचे श्रेय वाटून घेतील. पण --- “ त्याने खिसा चाचपला. मला मिस्टर ओपाल्सेनकडून चेक मिळाला आहे. आता काय म्हणतोस, मित्रा? हा शनिवार रविवार काही आपण ठरवले तसा गेला नाही. आपण पुढच्या शनिवार रविवार इथे माझ्या खर्चाने यायचे का?

# THE ADVENTURE OF THE CHEAP FLAT

# स्वस्त सदनिकेचे साहस



मी जतन केलेल्या आतापर्यंतच्या केसेसमध्ये, खून किंवा चोरी असो, पायरोचा विजयापर्यंतचा तपास मध्यवर्ती गोष्टीपासून सुरु होऊन, गूढ उकलेपर्यंत तर्कशास्त्रीय उद्गामी पद्धतीनेच झालेला होता.

आता मी ज्याचा लेखाजोखा मांडणार आहे, ती क्षुल्लक गोष्टींपासून बनलेली घटनांची एक उल्लेखनीय साखळी आहे, जिने काही वाईट घडण्याच्या आशंकेने पायरोचे लक्ष वेधून घेतले आणि शेवटी त्याने ती असामान्य केस सोडवली.

गेराल्ड पार्कर नावाच्या माझ्या जुन्या मित्राबरोबर मी संध्याकाळ घालवत होतो. कदाचित तिथे तो आणि मी सोडून पाच सहा लोक असावेत. आणि बोलताना जेव्हा पार्कर लंडनमध्ये घर शोधायच्या मुद्द्यावर आला, तेव्हा ते लवकर वा उशीरा होणारच होते. घरे आणि सदनिका ही पार्करची विशेष आवड होती. लढाई संपल्यापासून, त्याने निदान सहा तरी सदनिका व चाळवजा खोल्या विकत घेतल्या होत्या. तो कुठेही स्थिरस्थावर होतो आहे, असे वाटले की तो पुन्हा नवीन जागा शोधू लागे. आणि बाडबिस्तरा घेऊन चालू पडे. थोड्या पैशाच्या प्राप्तीसाठी तो हे करत असे. कारण त्याचे डोके अहंमन्य व्यापाऱ्याचे डोके होते. पण खरे तर हे या खेळाचे प्रेम होते, आणि पैशांचे नव्हे. अननुभवी माणसाला तज्ञ माणसाबद्दल जसा आदर वाटेल, तसे आम्ही पार्करचे बोलणे कधीकधी ऐकून घेत असू. मग आमची पाळी येई. आणि मग जिभांचा कोलाहल सुरु होऊन जिभा सैल सुटत. शेवटी एक मजला मिसेस रॉबिनसन यांच्या ताब्यात देण्यात आला. ती एक नवऱ्याबरोबर आलेली छोटीशी नववधू होती. मी त्यांना आधी

कधी भेटलो नव्हतो. कारण रॉबिनसन आणि पार्कर यांची ओळख अलीकडील होती.

ती म्हणाली, “सदनिका घेतांना, तुम्ही आमचे नशीब कसे चांगले होते, ते ऐकले का? शेवटी आम्हाला मॉन्टेग्यू इमारतीमध्ये सदनिका मिळाली.”

पार्कर बोलला, “ठीक आहे, मी नेहमी म्हणतो, की एका विशिष्ट किमतीला अनेक सदनिका असतात!”

“पण या सदनिकेची ही किंमत नाही. ही फारच स्वस्त पडली. वर्षाला ऐंशी डॉलर्स!”

पण मॉन्टेग्यू इमारत नाईट्स पुलाच्या बाजूलाच आहे, नाही का? छान मोठी इमारत आहे. की तुम्ही त्याच नावाची झोपडपट्टीतील कुठली इमारत म्हणत आहात का?”

“नाही. मी तीच नाईट्स पुलाच्या बाजूचीच म्हणतो आहे. त्यामुळेच ती चांगलीच स्वस्त पडली आहे.”

“चांगली हाच शब्द त्यासाठी योग्य आहे. तो चमचमता चमत्कार आहे. पण त्यात काहीतरी गोम असली पाहिजे. मला वाटते, हप्ता मोठा आहे का?”

“हप्ता नाही आहे.”

पार्कर ओरडला, “काय, हप्ता नाही? कोणीतरी मला धरा.”

मिस्टर रॉबिनसन्सनी चालू ठेवले. “पण आम्हाला फर्निचर विकत घ्यावे लागले.”

पार्कर शहारत बोलले, “आहा, मला माहिती होते, की त्यात काहीतरी गोम आहे.”

“पन्नास पौंडात ते मिळाले. आणि ते छान आहे.”

पार्कर बोलला, “मी ते सोडून देतो. आता तिथे रहाणारे वेडेच असले पाहिजेत. दुसऱ्यांच्या भल्याची इच्छा धरणारे!”

मिसेस रॉबिनसन्स थोडी त्रासलेली वाटत होती. तिच्या नाजूक भुवयांमध्ये आठी दिसत होती. “हे विचित्र आहे, नाही का? तुम्हाला असे तर वाटत नाही ना, की --- ती जागा --- पछाडलेली आहे?”

पार्कर निर्णायक सुरात बोलला, “मी आजपर्यंत कधी पछाडलेल्या सदनिकेबद्दल ऐकलेले नाही.”

मिसेस रॉबिनसन्सची खात्री पटलेली वाटली नाही. “पण त्याच्याशी संबंधित बऱ्याच विचित्र गोष्टी ऐकून, मी अस्वस्थ झाले होते.”

मी म्हटले, “उदाहरणार्थ?”

पार्कर बोलला, “आहा, आमच्या गुन्हेगारीत माहीर असलेल्याचे लक्ष वेधले गेले. मिसेस रॉबिनसन्स, त्याचे ओझे कमी करा. हेस्टीग्ज गूढ गोष्टी उकलणारा आहे.”

मी लाज वाटून हसलो. पण माझ्याबद्दल जे म्हटले गेले, त्याने मी नाखूष झालो नाही.

“कॅप्टन हेस्टीग्ज, ओहो, हे खरे तर विचित्र नाही. पण आपण जेव्हा दलालाकडे जातो, स्टॉसर आणि पॉल --- आपण पूर्वी त्यांच्याकडे गेलेलो नाही, कारण ते फक्त महाग सदनिका दाखवतात. पण त्यामुळे काही नुकसान होत नाही --- ते आपल्याला दाखवतात, ती प्रत्येक गोष्ट वर्षाला चारशे ते पाचशे रुपयांची असते. किंवा भरमसाठ हप्ता असतो. आणि आपण जाऊ लागलो, की ते म्हणतील, की त्यांच्याकडे ऐशीची सदनिका आहे. पण त्यात रहायला तुम्हाला आवडेल, की नाही ते आम्ही सांगू शकत नाही. कारण ती त्यांच्या विकायच्या यादीत कधी काळी होती, खूप लोकांना दाखवली गेली आणि कोणीतरी ती घेणार, हे नक्की होते. कारकुनाने म्हटले तसे ती ‘हिसकावून घेतला गेली’ --- फक्त लोकांची समजूत पटेना. त्यामुळे त्यांनी लोकांना तिथे पाठवायला सुरवात केली. पण ती जागा आधीच गेलेली

असल्यामुळे किंवा त्यांना आधी काही काळ लोक राहिलेली जागा दाखवली गेल्याने लोक चिडले"

मिसेस रॉबिनसन्सला दम लागल्याने, ती थांबली व मग परत बोलू लागली, "आम्ही त्याचे आभार मानले व म्हणालो की आम्हाला चांगलेच समजले की यात बहुधा काही खोट असणार --- पण आम्हाला काही झाले तरी एवढ्या कमी किमतीत जागा मिळालेली आवडेल. त्यामुळे आम्ही ती घ्यायची ठरवले व टॅक्सी करून सरळ तिथे गेलो. कारण शेवटी, तुम्हाला काय कधी होईल, हे माहिती नसते. ४ क्रमांक दुसऱ्या मजल्यावर होता. आम्ही लिफ्टकरता थांबलो होतो तेव्हा माझी मैत्रिण, एल्सी फर्ग्युसन, कॅप्टन हेस्टीग्ज हे देखील सदनिका शोधत होते व घाईने खाली आले. मिसेस रॉबिनसन्स बोलली, "माझ्या प्रिय मैत्रिणी, एकदा आम्ही तुमच्या पुढे होतो. पण ही सदनिका चांगली नाही. आणि ती आधीच विकली गेली आहे." हे म्हणजे तो विषय संपल्यासारखे झाले. पण --- ठीक आहे. जॉन म्हणाल्याप्रमाणे, ती जागा फारच स्वस्त होती. जर हप्ते दिले, तर आम्ही अजून महाग जागा घेऊ शकतो. अर्थात, ही गोष्ट करायला भयंकर आहे आणि मला तुम्हाला हे सांगायला लाजही वाटते. पण सदनिका शोधणे म्हणजे किती त्रास आहे, हे तुम्हाला माहिती आहे."

मी तिला दिलासा दिला, की हा घर शोधायचा झगडा ही मानवी स्वभावाची पायाभूत बाजू आहे. ती बहुधा जास्त महाग जागेकडे झुकते आणि ही मोठी अहमहमिकेची बाब आहे.

ती पुढे बोलत राहिली, “म्हणून मग आम्ही वर गेलो आणि तुमचा विश्वास बसणार नाही, की ती सदनिका गेलेली नव्हती. आम्हाला ती नोकराणीने दाखवली. मग आम्ही मालकिणीला भेटलो. मग तिथल्या तिथे ती जागा घेण्याची बाब पक्की झाली. लगेच ताबा मिळाला आणि फर्निचरसाठी आम्ही पन्नास पौंड भरले. दुसऱ्या दिवशी आम्ही करारपत्रावर सह्या केल्या आणि उद्या आम्ही तिथे रहायला जात आहोत.” मिसेस रॉबिनसन्स विजय झाल्याचे दाखवत थांबली.

पार्करने विचारले, “आणि मिसेस फर्ग्युसनचे काय? हेस्टीग्ज, तुला काय वाटते?”

मी सहज बोललो, “माझ्या प्रिय वॉटसन, ती चुकीच्या सदनिकेत गेली.”

मिसेस रॉबिनसन्स कौतुकाने ओरडली, “ओहो, कॅप्टन हेस्टीग्ज, तुम्ही किती हुशार आहात!

मला वाटले पायरो तिथे असायला हवा होता. मला कधीकधी वाटते, की तो माझ्या क्षमता कमी लेखतो.

## दोन

हे सर्व फार करमणूक करणारे होते. दुसऱ्या दिवशी सकाळी मी पायरोसमोर सर्व परिस्थिती फसवी समस्या असल्यासारखी ठेवली. त्याला त्यात स्वारस्य असल्यासारखे वाटले. त्याने विविध भागातील सदनिकांच्या भाड्याबद्दल माझ्याकडे खोलात जाऊन चौकशी केली.

तो विचारपूर्वक बोलला, "मोठी चौकस गोष्ट आहे. हेस्टीग्ज, मला माफ कर. मला जरा हिंडून बघितले पाहिजे."

जेव्हा तासाभराने तो परत आला, त्याचे डोळे उद्दीपित होऊन चकाकत होते. त्याने त्याची काठी टेबलावर ठेवली आणि बोलण्यापूर्वी त्याने त्याच्या टोपीची कडा नेहमीच्या नाजूक काळजीने झटकली.

माझ्या मित्रा, आता आपल्या हातात काही काम नाही. आपण आजच्या शोधावर आपले पूर्ण लक्ष केंद्रित करू शकतो."

"तू कुठल्या शोधाबद्दल बोलत आहेस?"

"तुझी मैत्रिण मिसेस रॉबिनसन्सच्या सदनिकेची उल्लेखनीय स्वस्ताई."

"पायरो, तू गंभीरपणे बोलत नाही आहेस."

“मी खूप गंभीर आहे. माझ्या मित्रा, तू स्वतः त्याबद्दल विचार करून बघ. या सदनिकांचे घरभाडे ३५० पौंड आहे. मी हे मालकांच्या दलालांकडून शोधून काढले आहे. आणि तरीही ही सदनिका फक्त ऐंशी पौंड भाडे लावत आहे. असे कसे?”

त्यात नक्कीच काहीतरी खोट असली पाहिजे. मिसेस रॉबिनसन्सने सुचवल्याप्रमाणे, तो पछाडलेला असेल.”

पायरोने असमाधानाने डोके हलवले.

“तर मग हे किती नवलपूर्ण आहे, की ती सदनिका कोणीतरी घेतली असल्याचे कळते आणि जेव्हा ती जाऊन बघते तेव्हा ती गेली नसल्याचे लक्षात येते.”

“पण तू नक्कीच माझ्याशी सहमत असशील, की ती दुसरी बाई नक्कीच चुकीच्या सदनिकेत गेली असणार. हे एवढेच शक्य आहे.”

“हेस्टीग्ज, तू या मुद्द्यावर बरोबर असशील किंवा नाही परंतु प्रश्न तसाच रहातो, की इतर अनेक इच्छुकांना ती सदनिका दाखवली होती. आणि तरीही त्याचे खूप स्वस्त भाडे असूनही ती मिसेस रॉबिनसन्स येईपर्यंत गेली नव्हती.”

“यावरून असे दिसते की त्यात काही गोम असली पाहिजे.”

“पण मिसेस रॉबिनसन्सला त्यात काही खोट आढळली नाही. हे असे कसे काय, नाही का? हेस्टीग्ज, तुला ती बाई खरे बोलणारी वाटली का?”

“ती आनंदी बाई होती.”

“ज्याअर्थी ती तुला माझ्या प्रश्नाचे उत्तर द्यायला निरुत्तर करते, त्याअर्थी ती नक्कीच तशी असली पाहिजे. ती कशी होती, जरा वर्णन कर.”

“ती उंच व गोरी होती. तिचे केस लालसर तपकिरी झाक असलेले होते --- “

पायरो पुटपुटला, “तुला नेहमीच अशा केसांचे मनापासून आकर्षण आहे! ठीक आहे. चालू ठेव.”

मी असहाय्यपणे पुरे केले, “निळे डोळे आणि खूप नितळ त्वचा! आणि --- मला वाटते, एवढेच.”

“आणि तिचा नवरा?”

“ओहो, तो चांगला माणूस आहे --- विचित्र वाटण्यासारखे काही नाही.”

“गोरा की काळा?”

“मला माहिती नाही. दोन्हीच्या मध्ये, आणि अगदी सर्वसामान्य चेहरा.”

पायरोने मान हलवली. “हो. असे शेकडो लोक आहेत --- आणि तसेही तू त्या बाईबद्दल जास्त सहानुभूती व कौतुकाची भावना निर्माण करत आहेस. तुला या लोकांबद्दल काही माहिती आहे का? पार्करला ते लोक चांगले माहिती आहेत का?”

“मला वाटते, त्यांची ओळख अलीकडील आहे. पायरो, पण तू क्षणभर विचार करू नकोस --- “

पायरोने हात वर केला.

“अरे मित्रा, संशय घेणे सोड. मी काही विचार केला, असे म्हणालो का? मी एवढेच म्हणालो --- ही स्वारस्य वाटेल, अशी गोष्ट आहे. आणि हेस्टीग्ज, कदाचित फक्त बाईचे नाव सोडून त्यावर प्रकाश पाडायला काही नाही, नाही का?”

मी कडकपणे बोललो, “तिचे नाव स्टेला आहे. पण मला वाटत नाही की --- “

पायरोने आतल्या आत हसत माझ्या बोलण्यात विघ्न आणले. त्याला कसली तरी भलतीच मजा वाटत होती.

“स्टेला म्हणजे प्रसिद्ध तारा, नाही का?”

“काय सांगतोस?”

“आणि तारे प्रकाश देतात. तेच तर! शांत हो, हेस्टीग्ज, संयत वागणुकीला गालबोट लावू नको. चल, आपण मॉन्टेग्यू इमारतीत जाऊ आणि काही चौकशा करू.”

मी त्याच्याबरोबर गेलो, माझी काही हरकत नव्हती. ती एक छान इमारत होती. पण फारशा चांगल्या अवस्थेत नव्हती. गणवेष घातलेला हमाल उन्ह खात होता. पायरो त्याच्याशी बोलला, “तू मला हे सांगशील का, की मिस्टर आणि मिसेस रॉबिनसन्स इथे रहातात का?” तो हमाल कमी बोलणारा व संशयी होता. त्याने आमच्याकडे जेमतेम बघितले व बोलला, “४ क्रमांक, दुसरा मजला.”

“आभारी आहे. ते इथे किती काळ रहात आहेत, ते तू सांगू शकशील का?”

“सहा महिने.”

मी आश्चर्याने पुढे झालो. पायरोला राग आल्याचे मला कळत होते.

मी ओरडलो, “अशक्य, तू चूक करतो आहेस.”

“सहा महिने.”

“तुझी खात्री आहे का? मी म्हणतो आहे ती बाई, उंच, गोरी आणि लालसर सोनेरी केसांची आहे --- “

“हो, तीच ती. २९ सप्टेंबरला, म्हणजे फक्त सहा महिन्यांपूर्वी आली.“

त्याचा आमच्यातील रस संपल्यासारखे वाटले. आणि तो हळूहळू हॉलकडे निघून गेला. मी बाहेर येऊन पायरोच्या मागे गेलो.

माझा मित्र लबाडीने बोलला, “हेस्टीग्ज, माझ्या मित्रा, तुला अजून खात्री आहे का, की ती बाई खरे बोलत आहे?”

मी काही उत्तर दिले नाही.

आपण कुठे चाललो आहोत आणि तू काय करणार आहेस, हे विचारण्यापूर्वीच पायरो ब्रॉम्प्टन रस्त्याने चालू लागला.

“हेस्टीग्ज, आपण जागेच्या दलालाकडे जात आहोत. मॉन्टेग्यू इमारतीत सदनिका घेण्याची माझी इच्छा आहे. माझ्या अंदाजाप्रमाणे लवकरच तिथे खूप रुचीपूर्ण गोष्टी घडणार आहेत.”

आम्ही आमच्या कामात नशीबवान ठरलो. चौथ्या मजल्यावरील ८ क्रमांकाची सदनिका आठवड्याला १० गिनीज या हिशेबाने पायरोने महिन्याभरासाठी भाड्याने घेतली. बाहेर रस्त्यावर आल्यावर त्याने शांतपणे माझे बोलणे ऐकून घेतले. “पण हल्ली मी चांगले पैसे मिळवतो. मग मी माझी हौस का फेडून घेऊ नये? हेस्टीग्ज, तुझ्याकडे पिस्तुल आहे का?”

मी उत्तेजित होत उत्तरलो, “हो --- कुठेतरी, तुला असे वाटते का --- “

“की ते लागेल? तशी शक्यता आहे. मला दिसते आहे की तू यामुळे खूष झाला आहेस. काही प्रेक्षणीय व अद्भुतरम्य तुला आवडते.”

दुसऱ्या दिवशी आम्ही नवीन घरात राहिलो. सदनिकेत बऱ्यापैकी फर्निचर होते. इमारतीत आम्ही रॉबिनसन्स यांच्याच जागी बरोबर दोन मजले वर होतो.

दुसऱ्या दिवशी रविवार होता. दुपारी पायरोने पुढचे दार थोडेसे उघडे टाकले आणि खालून काही प्रतिध्वनीसारखा आवाज जोरात वारंवार आल्याने, मला घाईघाईने बोलावले.

“जिन्याकडे बघ. ते तुझे मित्र आहेत का? तू त्याना स्वतःला दिसून देऊ नकोस.”

मी माझी मान जिन्याकडे वळवली व कुजबुजत बोललो, “तेच ते आहेत.”

“छान, जरा थांब.”

अर्ध्या तासाने गडद रंगाचे कपडे घातलेली एक तरुण बाई दारातून बाहेर आली. समाधानाने सुस्कारा टाकत, पायरो दबक्या पाऊलांनी सदनिकेत शिरला.

“ते बघ. आता मिस्टर आणि मिसेस नंतर नोकराणी. आता सदनिका रिकामी असणार.”

मी अस्वस्थपणे विचारले, “आपण तिथे जाऊन काय करणार आहोत?”

पायरो भरभर चालत मागील बाजूस असलेल्या भांडी घासायच्या मोरीत गेला आणि तिथून दोरीने कचऱ्याच्या बादल्या खाली सोडायच्या मार्गाने कोल लिफ्टच्या दोरीला लोंबकळत होता.

त्याने मोठ्या आनंदाने स्पष्ट केले. “आपण कचऱ्याच्या बादल्या खाली सोडायच्या मार्गाने खाली येणार आहोत. आपल्याला कोणीच बघू शकणार नाही. रविवारची मैफील, मग ‘दुपारी बाहेर’ आणि शेवटी इंग्लंडच्या गाईच्या भाजलेल्या मासाच्या रात्रीच्या जेवणानंतर झोप --- हे सर्व हर्क्युल पायरोच्या कृत्यांकडे लक्ष जाणार नाही, म्हणून! चल, माझ्या मित्रा.”

तो लाकडी तक्तपोशीवरुन चालू लागला आणि मी जागरूकपणे त्याच्यामागून चालू लागलो.

मी संशयाने विचारले, “आपण त्यांच्या सदनिकेत शिरणार आहोत का?”

पायरोचे उत्तर फार समाधानकारक नव्हते.

तो उत्तरला, “आजच असे नाही.”

दोरी ओढत, त्याला लोंबकळत आम्ही दुसऱ्या मजल्यापर्यंत आलो. भांडी घासायच्या मोरीचे दार उघडे होते. ते बघून पायरो समाधानाने काही बोलला. “तू पाहिलेस? दिवसा कधी ते त्याला कडी लावत नाहीत. कुणीही येथून वरखाली करू शकेल. हो आपण काही तरतूद करणार आहोत असे नाही. पण जरी नेहमी नाही तरी --- रात्री --- केव्हातरी.”

त्याने त्याच्या खिशातून काही हत्यारे काढली आणि चपळपणे झटपट कामाला लागला. त्याचे काम होते, कडी अशी लावायची की ती लिफ्टमधून ओढता आली पाहिजे. तीन मिनिटात त्याने हे काम केले. मग त्याने हत्यारे परत खिशात ठेवून दिली. मग आम्ही आमच्या सदनिकेत परतलो.

## तीन

सोमवारी पायरो दिवसभर बाहेर होता. पण जेव्हा तो संध्याकाळी परतला, तेव्हा त्याने समाधानाने स्वतःला खुर्चीत लोटून दिले.

“हेस्टीग्ज, मी तुला थोडा वृत्तांत कथन करू का? तुझ्या मनातली आणि तुझ्या आवडत्या सिनेमाची आठवण करून देणारी गोष्ट!

मी हसत बोललो, “सांग. मी असे धरून चालतो, की ही खरी गोष्ट आहे. तुझ्या कल्पनाशक्तीने तयार केलेली नव्हे.”

“हे खरे आहे. स्कॉटलंडचा इन्स्पेक्टर जाप याच्या खरेपणाबद्दल पुरावा देईल. कारण याबद्दल मला त्याच्या कार्यालयाकडूनच कानावर आले आहे. हेस्टीग्ज, सहा महिन्यांपूर्वी, नौसेनेशी संबंधित काही कागदपत्रे अमेरिकेच्या सरकारी कार्यालयातून गहाळ झाली होती. त्यात महत्वाच्या काही बंदरांच्या संरक्षणासंबंधीची माहिती होती. आणि ती माहिती कुठल्याही परदेशी सरकारच्या दृष्टीने फारच उपयोगाची होती. उदाहरणार्थ, जपान. लुइगी व्हॅलडॅर्नो नावाच्या एका इटालियन तरुणावर त्याबद्दल संशय होता. तो त्या विभागात एका कनिष्ठ पदावर रुजू होता व कागदांबरोबर तोही हरवला होता. तो चोर होता, की नाही कोणास ठाऊक! पण दोन दिवसांनी न्यूयॉर्कच्या पूर्व बाजूला त्याला गोळ्या घालून ठार करण्यात आले. हरवलेले कागद त्याच्याकडे नव्हते. आता काही वेळापूर्वी लुइगी व्हॅलडॅर्नो, अलीकडेच गायिका म्हणून सुरवात केलेल्या व वॉशिंग्टन इथे

तिच्या भावाबरोबर एका सदनिकेत रहाणाऱ्या मिस एल्सा हट हिच्याबरोबर जाताना आढळला होता. कोणालाही मिस एल्सा हटच्या परिस्थितीबद्दल काहीही माहिती नव्हते आणि आणि व्हॅलडॅर्नो मेला, तेव्हा ती अचानक नाहीशी झाली. ती खरे तर प्रसिद्ध आंतरराष्ट्रीय हेर होती, यावर विश्वास ठेवायला जागा आहे. तिने वेगवेगळ्या नावाखाली बरेच दुष्टपणाचे काम केले होते. अमेरिकन गुप्तचर संस्था तिला शोधायचे कसून प्रयत्न करत होती. तेव्हा वॉशिंग्टनमधील काही सामान्य जपानी लोकांवरदेखील त्यांचा डोळा होता. त्यांची खात्री होती, की जेव्हा मिस एल्सा हटने तिचे मार्ग पुरेसे लपवले, तेव्हा ती या लोकांना भेटत असे. पंधरा दिवसांपूर्वी, त्यातील एकजण अचानक इंग्लडला निघाला. हे लक्षात घेता, असे दिसत होते, की एल्सा हट इंग्लडमध्ये असावी." पायरो थांबला आणि नंतर हळूच पुढे बोलला, "एल्साचे वर्णनः उंची ५' ७", डोळे निळे, केस लालसर तपकिरी, वर्ण उजळ, नाक सरळ व काही विशिष्ट जन्मखुणा नाहीत."

मी श्वास रोधून म्हणालो, "मिसेस रॉबिनसन्स!"

पायरोने दुरुस्ती सुचवली, "तसेही, तशी शक्यता आहेच. शिवाय मला समजले आहे की एक परदेशी काळा माणूस आज सकाळी ४ क्रमांकाच्या सदनिकेची चौकशी करत होता. माझ्या

मित्रा, त्यामुळे मला भीती वाटते, की आज रात्री तुझी सुंदर झोप सोडून, तुला माझ्याबरोबर त्या खालच्या सदनिकेत यावे लागेल --- तुझे पिस्तुलही बरोबर लागेल, समजले का?"

मी उत्साहाने म्हटले, "आपण कधी सुरवात करायची?"

"मला वाटते, मध्यरात्रीची वेळ सोयीची आणि शांत/ गंभीर असते. तेव्हा, त्यापूर्वी काही होईल, असे वाटत नाही.

बरोबर बारा वाजता, आम्ही काळजीपूर्वक त्या कचऱ्याच्या बादल्या खाली सोडायच्या मार्गाने दोरीला धरून दुसऱ्या मजल्यावर गेलो. पायरोच्या अंदाजाप्रमाणे, भांडी घासायच्या मोरीचे लाकडी दार आत उघडून हलत राहिले आणि आम्ही सदनिकेत प्रवेश केला. त्या भुयारासारख्या मार्गाने, आम्ही स्वयंपाकघरात शिरलो. तिथे दोन खुर्च्यांवर आम्ही आरामात बसलो. हॉलचे दार थोडेसे उघडे टाकलेले होते.

पायरो समाधानाने डोळे मिटत म्हणाला, "आता आपल्याला थांबावे लागेल."

मला ते थांबणे, शेवट नसलेले वाटले. मला झोपायची भीती वाटत होती. तेव्हाच मला असे वाटू लागले, मी तिथे आठ तास आहे --- आणि जसे माझ्या नंतर लक्षात आले, की खरे तर फक्त एक तास वीस मिनिटे झाली होती --- एक पुसटसा

खरवडल्यासारखा आवाज माझ्या कानावर आला. मला पायरोचा हात लागला. मी उठलो व आम्ही दोघे काळजीपूर्वक हॉलच्या दिशेने जाऊ लागलो. तिथूनच आवाज येत होता. पायरोने त्याचे ओठ माझ्या कानांजवळ आणले.

"पुढील दाराच्या बाहेर, ते कुलूप कापत आहेत. मी जेव्हा बोलतो आहे, तेव्हा लगेच त्याच्यावर मागील बाजूने घट्ट पकड बसव. काळजी घे. त्याच्याकडे चाकू असेल."

आता कापल्यासारखा आवाज आला. दारातून थोडा उजेड दिसला. तो लगेच विझला आणि हळूच दार उघडले. पायरो आणि मी भिंतीला लागून झोपल्यासारखे झालो. एक माणूस आमच्या अंगावरून गेला. त्याचा श्वासाचा आवाज मी ऐकला. मग त्याने विजेरीचा उजेड पाडला. तेव्हा पायरो माझ्या कानात कुजबुजला, "जा."

आम्ही एकदम उडी मारली. पायरोने चपळ हालचाल करून, त्याच्यावर हल्ला करणाऱ्याचे डोके हलक्याशा लोकरीच्या रुमालाने पकडले. आणि मी त्याचे हात पकडले. हे सगळे आवाज न करता, झटपट केले. पायरोने त्याच्या डोळ्यांवरून रुमाल खाली आणला व त्याचे तोंड घट्ट बांधले. मी त्याच्या हातातील चाकू ओढून घेतला. मी पिस्तुल काढून त्याला दिसेल असे, हातात

धरले. तेव्हा त्याला कळून चुकले, की विरोध करणे अशक्य आहे. त्याने त्याचा आवेश सोडला तेव्हा पायरोने त्याचे तोंड मुसक्या बांधलेल्याच्या कानाजवळ आणून कुजबुज सुरु केली. मिनिटाभराने आमच्या शत्रूने मान हलवली. मग पायरोने शांतपणे हातांच्या हालचालीने, सदनिकेबाहेर पडून जिन्याकडे जाऊ लागल्याचे दाखवले. आमचा कैदी मुकाट्याने आमच्या मागून आला. मी त्याच्यावर पिस्तुल रोखलेले होते. आम्ही रस्त्यावर आल्यावर पायरो माझ्याकडे वळला.

“तिथे कोपऱ्यावर एक टॅक्सी उभी आहे. मला पिस्तुल दे. आता आपल्याला त्याची गरज नाही.”

“पण याने पळून जायचा प्रयत्न केला तर?”

पायरो हसला. “तो असे करणार नाही.”

मिनिटाभरात मी टॅक्सी घेऊन आलो. त्या कैद्याच्या तोंडावरील रुमाल काढला गेला. आणि मी आश्चर्यचकित झालो.

मी कुजबुजत पायरोला म्हणालो, “तो जपानी नाही.”

“हेस्टीग्ज, निरीक्षण हे तुझे बलस्थान आहे. तुझ्या दृष्टीतून काही सुटत नाही. नाही तो मनुष्य जपानी नाही. तो इटालियन आहे.”

आम्ही टॅक्सीत शिरलो. पायरोने चालकाला सेंट जॉन वूडचा पत्ता दिला. मी आता पार धुक्यात गेलो. आमच्या कैद्यासमोर पायरोला आपण कुठे चाललो आहोत, हे विचारणे मला प्रशस्त वाटले नाही. मी फक्त अंदाज करत राहिलो.

आम्ही एका लहानशा घरासमोर थांबलो. मुख्य रस्त्यापासून घर आत होते. परतणारा व थोडा प्यायलेला एक पादचारी कसातरी वेडावाकडा चालतांना पायरोच्या अंगावर आपटला. तो पायरोला काहीतरी कडकपणे बोलला. काय बोलला, ते मला नीट ऐकू आले नाही. आम्ही तिघे घराच्या पायऱ्या चढलो. पायरोने घंटी वाजवली व आम्हाला थोडे बाजूला उभे केले. काही उत्तर मिळाले नाही. तो परत परत घंटी वाजवत राहिला आणि मग त्याने जोराने घंटी दाबून ठेवली.

अचानक दारावरील शटरमधून थोडासा उजेड दिसला. आणि दार काळजीपूर्वक थोडेसे उघडले गेले.

एका माणसाचा चिडलेला आवाज आला, “तुम्हाला काय हवे आहे तरी काय?

“मला डॉक्टर हवे आहेत. माझी बायको आजारी झाली आहे.”

इथे डॉक्टर नाहीत.”

तो माणूस दार लाऊ लागला, पण पायरोने दारात पाय घातला. तो अचानक रागावलेल्या फ्रेन्च माणसासारखा आक्रमक झाला.

“तू काय सांगतोस, की इथे डॉक्टर नाहीत? मी कायदा कोळून प्यायलो आहे. तुला आलेच पाहिजे. मी इथे रात्रभर उभा राहून, घंटी व दार वाजवत राहीन.”

परत दार उघडले गेले. गाउन व स्लीपर्स घातलेला माणूस पायरोला शांत करायला, आजूबाजूला एक अस्वस्थ कटाक्ष टाकत, पुढे आला.

“मी पोलिसाला बोलावतो.”

पायरोने पायऱ्या उतरायची तयारी केली. “नको. कृपया असे करू नका.”

तो माणूस त्याच्यामागे धावला.

पायरोने त्याला जोराने ढकलले. तो जिन्यावरून गडगडत गेला. दुसऱ्या मिनिटाला आम्ही तिघे दाराच्या आत होतो. दार ढकलून बंद झाले.

“चला, लवकर आत व्हा.” पायरोने आम्हाला जवळच्या खोलीत ढकलले व दिवा लावला. “आणि पडद्यामागील --- तू.”

खिडकीवर झळकणाऱ्या गुलाबी रंगाच्या मखमली पडद्याच्या चुण्यांमागे घाईने सरकत, इटालियन बोलला, “सर.”

तो पडद्यामागे जातो न जातो तोच एक बाई खोलीत घुसली. ती उंच व लालसर केसांची होती. आणि तिच्या शेलाट्या बांध्यावर तिने शेंदरी किमोनो घातला होता.

ती घाबरलेल्या नजरेने ओरडली, “माझा नवरा कुठे आहे?”

पायरो झुकत पुढे झाला. “अशी आशा आहे, की तो त्रासाने किंचाळणार नाही. त्याच्या पायात स्लीपर आहेत आणि त्याचा गाउन उबदार आहे.”

“तू कोण आहेस? माझ्या घरात तू काय करत आहेस?”

“हे खरे आहे बाईसाहेब, की आमच्यापैकी कोणाचीच तुमच्याशी ओळख नाही. मला खेद होतो, की आमच्यापैकी एकजण तर तुम्हाला भेटायला, न्यूयॉर्कहून आला आहे.”

पडद्यामागून इटालियन अवतरला. टॅक्सीमध्ये बहुधा पायरोच्या हातून माझे पिस्तुल खाली ठेवले गेले असणार. ते त्याच्या हातात होते.

त्या बाईने एक भेदक किंकाळी मारली आणि ती पळू लागली. पण पायरो बंद दारासमोर उभा होता.

ती ओरडत म्हणाली, “मला जाऊ दे. तो मला ठार मारेल.”

त्याचे शस्त्र मागेपुढे करुन आमच्यावर उगारल्यासारखे करत, इटालियनने विचारले, “तो घोगऱ्या आवाजात बोलणारा लुइगी व्हॅलर्डर्नो कोण होता?” आम्ही हलायचे धाडस केले नाही.

मी ओरडलो, “अरे देवा पायरो, हे भीतीदायक आहे. आपण काय करायचे?”

“परत तेच तेच बोलून मला त्रास देऊ नकोस. हेस्टीग्ज, मी तुला खात्री देतो, आपला मित्र मी सांगेपर्यंत गोळी चालवणार नाही.”

रागाने इटालियन म्हणाला, “तुमची तशी खात्री आहे का?”

“तुला काय हवे आहे?”

पायरो वाकला. “मला वाटते एल्सा हटला सांगून, तिच्या बुद्धीमत्तेचा अपमान करण्याची गरज नाही.”

चपळ हालचाल करून, त्या बाईने टेलिफोन झाकणारे, मोठे काळे मखमली मांजर हिसकावून घेतले.

“ते त्याच्या अस्तरात शिवलेले आहे.”

पायरो कौतुकाने पुटपुटला, “किती हुशारी! तो दाराशेजारी उभा राहिला.

“बाईसाहेब, शुभ सकाळ. तुम्ही जायची तयारी करा. तोपर्यंत मी तुमच्या न्यूयॉर्कच्या मित्राला थांबवून ठेवतो.”

महाकाय इटालियनने गर्जना केली, “काय मूर्खपणा आहे!” आणि त्याचे पिस्तुल उंचावून, त्या बाईच्या मागे जाणाऱ्या आकृतीवर, जवळून गोळी झाडली. त्याच वेळी मी त्याच्यावर तुटून पडलो.

पण गोळी काही त्रास न देता, नुसती चाटून गेली आणि पायरोचा सौम्य टीकेचा आवाज उठला.

“हेस्टीग्ज, तुझ्या जुन्या मित्रावर कधी विश्वास ठेऊ नकोस. भरलेले पिस्तुल माझ्या मित्रांनी जवळ बाळगले, तरी मला भीती वाटत नाही. माझ्या मित्रा, पण निव्वळ ओळखीच्या लोकांना मी अशी परवानगी देणार नाही. नाही. नाही.”

घोगऱ्या आवाजात मोठ्याने शपथ घेणाऱ्या इटालियनसाठी हे होते. पायरो त्याच्याशी सौम्य टीकात्मक आवाजात बोलत राहिला. “आता मी तुझ्यासाठी काय केले आहे पहा. मी तुला फाशी जाण्यापासून वाचवले आहे. आणि असे समजू नकोस की आपली रूपवान बाई पळून जाईल. नाही, नाही. घरावर मागून व पुढून नजर ठेवली जाते आहे. ते सरळ पोलिसांच्या हातात पडतील. तो शांत करणारा, सुंदर विचार नाही का? हो, तू आता खोली सोडू

शकतोस. पण काळजी घे. खूप काळजी घे. मी --- आहा, तो गेला! आणि माझा मित्र हेस्टीग्ज माझ्याकडे नापसंतीदर्शक डोळ्यांनी बघतो आहे. पण हे सर्व अगदी साधे आहे. पहिल्यापासून हे स्पष्ट होते, की बहुधा मॉन्टेग्यू इमारतीतील ४ क्रमांकाच्या सदनिकेच्या शेकडो अर्जदारांपैकी फक्त रॉबिनसन्स यांनाच योग्य ठरवण्यात आले. का? त्याना इतरांपासून अलग करणारे असे काय होते --- व्यावहारिक दृष्टीकोनावर नजर टाकणे. त्यांचे दिसणे? शक्य आहे. पण हे काही जगावेगळे नव्हते. त्यांचे नाव, मग!"

मी ओरडलो, "पण रॉबिनसन्स या नावात असामान्य काही नाही. हे सर्वसाधारण नाव आहे."

"आहा! अरे देवा, पण बरोबर! हा मुद्दा बरोबर आहे. एल्सा हट व तिचा नवरा किंवा भाऊ, जो कुणी आहे तो, न्यूयॉर्कहून आलेला आहे. आणि त्यांनी मिस्टर आणि मिसेस रॉबिनसन्स या नावाने सदनिका घेतली आहे. अचानक त्यांना कळले, की निःसंशय लुइगी व्हॅलर्डर्नो ज्यात होता ती माफिया किंवा कॅमोरा नावाची एक गुप्त संस्था त्यांच्या मागे आहे. मग त्यांनी काय केले? त्यांनी एका प्रवासी कंपनीबरोबर पळ काढला. त्यांना माहिती होते, की त्यांचा पाठलाग करणारे लोक त्यांना चेहऱ्याने ओळखत

नाहीत. तर मग काय करणे सोपे ठरेल? त्यांनी त्यांची लंडनमधील सदनिका अगदी अल्प भाड्याने द्यायचे ठरवले.

सदनिका शोधणाऱ्या हजारो तरुण दांपत्यांपैकी अनेकजण रॉबिनसन्स नावाचे होते. फक्त थांबायचा प्रश्न होता. तुम्ही फोन डिरेक्टरीमध्ये रॉबिनसन्स हे नाव पाहिले, तर तसे खूपजण असतील. पण छान केस असलेल्या मिसेस रॉबिनसन्सला ती आज ना उद्या निवडली जाण्याची खात्री होती. मग काय होईल? सूड घेणारा येतो. त्याला नाव माहिती असते. त्याला पत्ता माहिती असतो. त्याला नवल वाटते. सर्व संपते. सूड घेणाऱ्याचे समाधान होते आणि मिस एल्सा हट अजून एकदा यशस्वीपणे निसटते. हेस्टीग्ज, तसेही तू मला खरी मिसेस रॉबिनसन्स दाखवली पाहिजेस --- त्याना जेव्हा त्यांच्या सदनिकेची मोडतोड केलेली आढळेल, तेव्हा त्यांना काय वाटेल? आपण घाईने परत गेले पाहिजे. आहा, जाप आणि त्याचे मित्र येत असल्यासारखे वाटते आहे."

दारावर जोराने टकटक झाली.

पायरोच्यामागे हॉलमध्ये जातांना, मी विचारले, "तुला हा पत्ता कसा कळला? "ओहो, अर्थात मिसेस रॉबिनसन्सने पहिली सदनिका सोडली, तेव्हा तू तिच्यामागे गेला होतास."

“हेस्टीग्ज, योग्य वेळी तू हे केलेस, तुझ्या मेंदूतील करड्या पेशींचा शेवटी तू वापर केलास तर! आता जापसाठी एक लहानसे आश्चर्य.”

त्याने हळूवारपणे दार उघडले व मांजराचे डोके कडेला लावले. एक म्याव असा आवाज निघाला.

स्कॉटलंड यार्डचा इन्स्पेक्टर दुसऱ्या एका माणसाबरोबर बाहेर उभा होता. त्याने स्वतःहून उडी मारली.

पायरोने वळून मांजराकडे पाहिले, तेव्हा मिस्टर पायरोने एक विनोद केला. तो उद्गारला. “ओहो, चल रे लबाडा, आपण आत जाऊ.”

“तुमच्याकडे आमचे मित्र ठीकठाक आणि सुरक्षित आहेत का?”

“हो सर्व पक्षी चांगले आहेत. पण त्यांच्याजवळ माल नाही आहे.”

“अस्स! म्हणून तुम्ही तो शोधायला आलात. ठीक आहे. मी आता हेस्टीग्जपासून लांब जातो आहे. पण मला तुमच्यासमोर पाळीव मांजराचा इतिहास व सवयी याबद्दल भाषण द्यायला आवडेल.”

“अरे देवा, तू ठार वेडाच झाला आहेस का?”

भाषणाचा आव आणून पायरो बोलला, “प्राचीन इजिप्शियन लोक मांजराची पूजा करत असत. अजूनही जर काळे मांजर तुम्हाला ओलांडून गेले, तर तो चांगला शकून म्हणून समजला जातो. जाप, अशा काळ्या मांजराने आज तू येत असलेला रस्ता ओलांडला. मला वाटते, कुठल्याही माणसाच्या किंवा प्राण्याच्या अंतर्भागाबद्दल बोलणे, इंग्लंडमध्ये चांगले समजले जात नाही. पण या मांजराचा अंतर्भाग खूप नाजूक आहे. म्हणजे मी कातडीबद्दल बोलतो आहे.”

अचानक खर्जात गुरगुरून, दुसऱ्या माणसाने पायरोच्या हातातील मांजर हिसकावून घेतले.

जाप म्हणाला, “ओहो, मी तुमची ओळख करून द्यायचे विसरून गेलो. मिस्टर पायरो, हे अमेरिकेच्या गुप्तहेर विभागाचे मिस्टर बर्ट आहेत.”

तो अमेरिकन जे शोधत होता, ते त्याच्या निष्णात बोटांना जाणवले. त्याने लगेच हात मागे घेतला आणि क्षणभर त्याला काही ऐकू येईना. मग तो आल्या प्रसंगाला तोंड द्यायला तयार झाला.

मिस्टर बर्ट म्हणाले, “तुम्हाला भेटून आनंद झाला.”

# THE MYSTERY OF HUNTER'S LODGE

# शिकाऱ्याच्या लॉजमधील गूढ



पायरो पुटपुटला, "शेवटी अशी शक्यता आहे, की यावेळी मी मरणार नाही."

फ्ल्यूच्या बऱ्या होत आलेल्या रोग्याकडून येतांना मी फायदेशीर सकारात्मता दाखवत, शेरा मारला. प्रथम मला तो रोग झाला होता. पायरोलाही मग तो झाला. मी त्याच्या सूचनांप्रमाणे औषधी वनस्पतींपासून बनवलेल्या कडू पेयाचे घुटके घेत, आता

तो उशा लावलेल्या अंथरुणावर उठून बसला होता. त्याचे डोके लोकरी शालीत गुंडाळलेले होते. शेकोटीच्या कट्ट्यावरील नीट खुणा केलेल्या औषधांच्या बाटल्यांच्या रांगेकडे तो बघत होता.

माझा छोटासा मित्र पुढे बोलला, “हो. हो. आता परत मी, पापी लोकांचा कर्दनकाळ, थोर हर्क्युल पायरो बरा होईन! माझ्या मित्रा, हे जाणून अस, की समाजाच्या गावगप्पांमध्ये एक परिच्छेद माझा असतो. पण हो! तो असा असतो, ”सर्व गुन्हेगारांनो, चालते व्हा. हर्क्युल पायरोकडे बघा --- आणि विश्वास ठेवा, मुलींनो, तो काही अंशी हर्क्युलस आहे! --- आपल्या स्वतःच्या समाजातील गुप्तहेर तुमच्यावर पकड बसवू शकत नाही. ‘कारण काय?’ कारण त्याला स्वतःलाच फ्ल्यू झाला आहे.”

मी हसलो.

“पायरो, तुझ्यासाठी हे चांगले आहे. तू दिवसेंदिवस लोकनेता होत आहेस. आणि या काळात, तू विशेष स्वारस्यपूर्ण असे काही चुकवले नाही आहेस.”

“ते खरे आहे. काही केसेस, ज्या मी सोडल्या, त्याबद्दल मला खंत वाटत नाही.”

आमच्या मालकीणबाईंनी दारात डोके दाखवले. “खाली एक गृहस्थ आले आहेत. तो म्हणतो आहे की त्याला मिस्टर पायरोंना

किंवा कॅप्टनला भेटायचे आहे. तो घाईत दिसतो आहे. सभ्य गृहस्थ दिसतो आहे --- मी त्याचे कार्ड आणले आहे.”

तिने ते माझ्या हातात दिले. “मिस्टर रॉजर हॅव्हेरिंग” मी वाचले.

पायरोने त्याचे डोके पुस्तकांच्या कपाटात घातले. मी आज्ञाधारकपणे ‘कोणाचे कोण’ पुस्तक ओढून बाहेर काढले. पायरोने ते माझ्याकडून घेतले व भराभर पाने चाळू लागला.

उमरावाच्या सैन्यातील पाचव्या क्रमांकाच्या विंडसरचा दुसरा मुलगा व त्याची १९१३ मध्ये लग्न केलेली बायको झोई, विल्यम क्रॅब यांची चौथी मुलगी

मी म्हणालो, “हं --- मला वाटते, ती अभिनय करणारी, मूर्खासारखी वागणारी मुलगी असावी --- ती फक्त स्वतःला झोई कॅरीसब्रुक म्हणवते. मला आठवते, तिने लढाईपूर्वी थोडे दिवस डीवर गावातील एका तरुणाशी लग्न केले होते.”

“हेस्टीग्ज, तुला हे उत्कंठावर्धक वाटत असेल तर खाली जाऊन, आपल्या पाहुण्याला काय त्रास आहे, हे ऐकून घेतोस का? त्याला सांग की मी खाली येऊ शकत नाही.”

रॉजर हॅव्हेरिंग साधारण चाळीशीचा मनुष्य होता. व्यवस्थित दिसत होता आणि चलाख वाटत होता. पण त्याचा चेहरा उदास वाटत होता. त्याला फार काळजी लागून राहिल्याचे जाणवत होते.

“कॅप्टन हेस्टीग्ज? मला वाटते, तुम्ही मिस्टर पायरोंबरोबर काम करता. माझ्या माहितीप्रमाणे त्याने आज माझ्याबरोबर डर्बीशायरला येणे गरजेचे आहे.”

मी उत्तरलो, हे अशक्य वाटते. तो फ्ल्यूने आजारी असून अंथरुणात आहे.”

त्याचा चेहरा पडला. “अरेरे, हा माझ्यासाठी मोठाच धक्का आहे.”

“तुम्हाला त्याचा सल्ला हवे असलेले प्रकरण फार गंभीर आहे का?”

“अरे देवा, हो. जगातील माझा सर्वात उत्तम मित्र असलेले माझे काका यांचा दुष्ट, लाजीरवाण्या पद्धतीने काल खून झाला आहे.”

“इथे लंडनमध्ये?”

“नाही, डर्बीशायरमध्ये. मी गावाला गेलो होतो. आज सकाळी मला माझ्या बायकोची तार मिळाली. ती मिळाल्याबरोबर मी इथे

येऊन, मिस्टर पायरो यांना ही केस घेण्यासाठी विनंती करायचे ठरवले.”

माझ्या डोक्यात एक भन्नाट कल्पना आली. मी त्याना म्हटले, “तुम्ही एक मिनिटभर थांबाल का?”

मी धावत वरती गेलो. मी थोडक्या शब्दात पायरोला परिस्थितीची कल्पना दिली. त्याने मला पुढे काही बोलू दिले नाही.

“अस्स. अस्स. तुला जायचे आहे, असेच ना? ठीक आहे, का नाही? तुला माझ्या पद्धती आतापर्यंत माहिती झाल्या असतील. फक्त तू मला रोज काय काय झाले ते सविस्तर सांगितले पाहिजेस. आणि मी सांगेन त्या सूचनांचे काही न बोलता पालन केले पाहिजेस.”

हे सर्व मी मान्य केले.

## दोन

तासाभराने मी मिस्टर हॅव्हेरिंग यांच्यासमोर मिडलँड रेल्वेच्या पहिल्या वर्गाच्या डब्यात बसलो होतो. गाडी लंडनपासून दूर चालली होती.

“कॅप्टन हेस्टीग्ज, सुरवातीला तुम्हाला हे समजून घेतले पाहिजे, की जिथे आपण चाललो आहोत, डर्बीशायरमधील

शिकार करण्याची पठारावरील जागा आणि जिथे खून झाला, ते शिकाऱ्याचे लॉज. आमचे खरे घर न्यूमार्केटजवळ आहे. आम्ही सहसा गावातील सदनिका काही काळाकरता भाड्याने देतो. आम्ही कधीकधी शनिवार रविवार बाहेर जातो, तेव्हा घर राखणारा शिकाऱ्याचे लॉज समर्थपणे सांभाळतो. अर्थात शिकारीच्या काळात, आम्ही आमच्या न्यूमार्केटच्या घरातील काही नोकर आणतो. माझे काका, मिस्टर हॅरिंग्टन पेस [ तुम्हाला माहिती असेल, की माझी आई न्यूयॉर्कची मिस पेस होती. ] गेली तीन वर्षे आमच्याबरोबर रहात होते. त्यांचे माझ्या वडिलांशी किंवा मोठ्या भावाशी कधी जमले नाही.

मला असा संशय आहे, की मी खर्चिक/उधळ्या मुलगा असल्याने, त्यांचे माझ्यावरचे प्रेम कमी होण्याऐवजी वाढले. अर्थात मी गरीब मनुष्य आहे. पण माझे काका श्रीमंत होते --- दुसऱ्या शब्दात, ते आम्हाला पैसे देत असत. पण कितीही युक्त्याप्रयुक्त्या केल्या तरी त्याच्याबरोबर जमवून घेणे अवघड होते. आणि आम्ही तिघे तरीही गुण्यागोविंदाने एकत्र रहात होतो. आमच्या गावातील काही विचित्र लोकांनी सुचवल्याप्रमाणे, दोन दिवसांपूर्वी माझे काका व आम्ही दोघे डर्बीशायरला रहायला गेलो. माझ्या बायकोने घर सांभाळणाऱ्या बाईला, मिसेस मिडलटनला फोन केला. त्याच दुपारी आम्ही तिथे गेलो. काल संध्याकाळी मला

परत यावे लागले. पण माझी बायको व काका तिथेच राहिले. आज सकाळी मला तार मिळाली. ती अशी होती:

"ताबडतोब या. काल रात्री हॅरिंग्टनकाकांचा खून झाला आहे. शक्य झाल्यास, तुम्ही एखादा चांगला गुप्तहेर घेऊन या. पण नक्की या --- झोई"

"म्हणजे तुम्हाला अजून साद्यंत हकीगत माहिती नसेल, बरोबर?"

"नाही. मला वाटते, आज संध्याकाळच्या वर्तमानपत्रात ती येईल. पोलीस नक्कीच कामाला लागले असतील.

आम्ही एल्मर्स डेल या लहानशा स्टेशनवर आलो, तेव्हा तीन वाजले होते. तिथून पाच मैलावरील उंचसखल पठारावरील छोट्या करड्या दगडी इमारतीपाशी आम्ही पोचलो.

मी शहारत बोललो, "एकाकी जागा!"

हॅव्हेरिंगने मान डोलावली. "मी यातून बाहेर पडायचा प्रयत्न करेन. इथे परत कधीच मी रहायला येणार नाही."

आम्ही गेटचे कुलूप काढले आणि ओकच्या दाराकडे अरुंद फरसबंद वाटेने चालू लागलो. तेव्हा एक ओळखीची आकृती बाहेर पडून, आम्हाला भेटायला आली.

मी ओरडलो, "जाप !".

माझ्या बरोबरच्याशी बोलण्यापूर्वी, स्कॉटलंड यार्ड इन्स्पेक्टर माझ्याकडे बघून मित्रत्वाने तोंड फाकवून हसला.

जाप बोलला, "मला वाटते, मिस्टर हॅव्हेरिंग? या केससाठी मला लंडनहून पाठवण्यात आले आहे. सर, मी हेस्टींग्जशी थोडे बोलू इच्छितो"

"माझी बायको --- "

"सर, मी तुमच्या बाईसाहेबांना भेटलो --- आणि नोकराणीला. मी तुम्हाला तिष्ठत ठेवत नाही. मी येथील सर्व परिस्थिती पाहिली आहे आणि आता मी गावात परत जायला उत्सुक झालो आहे."

"मला अजून इथे कायकाय घडले, काहीच माहिती नाही --"

जाप मवाळपणे बोलला, "तेच तर! पण मला एकदोन बाबतीत तुमचे मत हवे आहे. इथे कॅप्टन हेस्टीग्ज आहे. त्याला मी माहिती आहे. तो घरी जाऊन, त्याना तुम्ही येत असल्याचे सांगेल. कॅप्टन हेस्टीग्ज, तसेही छोट्या माणसाला काय झाले?

"फ्लूमुळे तो अंथरुणाला खिळून आहे."

"अस्स होय? मला हे ऐकून खेद झाला. त्याच्याशिवाय तू, म्हणजे घोड्याशिवाय गाडी, नाही का?"

आणि त्याच्या आजारपणाच्या काळातील प्रतिनिधी म्हणून मी त्या घरी गेलो. घंटी वाजवली. कारण जापने त्याच्यामागे दार लावले होते. काही वेळाने ते काळ्या कपड्यातील एका मध्यमवयीन बाईने उघडले.

मी स्पष्ट केले, "एका मिनिटात मिस्टर हॅव्हेरिंग इथे येत आहेत. त्यांना इन्स्पेक्टरने थांबवून ठेवले आहे. मी लंडनपासून त्यांच्याबरोबर आलो आहे. कदाचित तुम्ही मला काल रात्री काय झाले, ते सांगू शकता."

"आत या, सर." तिने तिच्यामागे दार लावले व आम्ही कमी उजेडाच्या हॉलमध्ये उभे राहिलो. "सर, काल रात्री जेवणानंतर, एक मनुष्य आला. त्याने मिस्टर पेसना भेटायची इच्छा व्यक्त केली. मला वाटले, तो मिस्टर पेस यांचा अमेरिकन मित्र आहे. त्यामुळे मी त्याना बंदुकीच्या खोलीत नेले. आणि मी मिस्टर पेसना [ मिसेस पेसचे चुलत सासरे ] सांगायला गेले. त्याने काही नाव सांगितले नव्हते. अर्थात, ते जरासे विचित्र होते. माझ्या डोक्यात आता तो विचार आला. मी मिस्टर पेसना सांगितले. ते कोड्यात पडल्यासारखे दिसले. आणि मालकीणबाईंना म्हणाले, "झोई, मी या माणसाला काय हवे आहे ते बघतो." ते बंदुकीच्या खोलीत गेले. आणि मी स्वयंपाकघराकडे परतले. पण काही वेळाने मला ते

भांडत असल्यासारखे, जोरात आवाज ऐकू येऊ लागले. मी हॉलमध्ये आले. त्याच वेळी झोई बाईसाहेब पण खाली आल्या. लगेच बंदुकीच्या गोळीचा आवाज झाला आणि मग स्मशानशांतता पसरली. आम्ही दोघी धावत बंदुकीच्या खोलीत गेलो. पण ती बंद होती. आम्ही खिडकीशी घुटमळलो. ती उघडी होती. आत गोळी लागलेले मिस्टर पेस रक्तात थारोळयात पडले होते.

"तो मनुष्य कुठे गेला?"

"तो आम्ही येण्यापूर्वी, खिडकीतून बाहेर गेला असणार."

"आणि मग?"

"मिसेस हॅव्हेरिंगने मला पोलिसांना आणण्यासाठी पाठवले. ते पाच मैल अंतर होते. पोलीस माझ्याबरोबर आले. कॉन्स्टेबल रात्रभर इथे राहिला. आणि आज सकाळी लंडनहून अजून पोलीसांची कुमक आली."

"मिस्टर पेसना भेटायला आलेला माणूस कसा होता?"

नोकराणी विचार करू लागली. "त्याची काळी दाढी होती. तो मध्यमवयीन होता. त्याचा हलकासा मोठा कोट होता. तो अमेरीकनांसारखा बोलत होता. पण अजून काही लक्षात आले नाही."

“अस्स! मला नवल वाटते, की मी मिसेस हॅव्हेरिंगना भेटू शकेन का?”

“त्या वर आहेत. मी त्यांना सांगू का?”

“कृपया सांग. त्याना सांग की मिस्टर हॅव्हेरिंग बाहेर इन्स्पेक्टर जापशी बोलत आहेत. आणि त्यांच्याबरोबर लंडनहून आलेला गृहस्थ म्हणजे मी, लवकरात लवकर त्यांच्याशी बोलायला उत्सुक आहे.”

“सर, ठीक आहे.”

मी सर्व काही जाणून घ्यायला अधीर झालो होतो. जापने माझी वाट बघत दोनतीन तास घालवले होते. त्याला वाटणाऱ्या काळजीमुळे, मी त्याच्याजवळ जाण्यासाठी अधीर झालो होतो.

मिसेस हॅव्हेरिंगने मला फार वेळ वाट बघायला लावली नाही. काही मिनिटात, ती जिन्यावरून उतरत असल्याचा आवाज मला आला. मी वर बघितले, तर एक सुंदर तरुण स्त्री माझ्याकडे येत होती. तिने आगीच्या रंगाचा खमीज घातला होता. त्यात तिची शेलाटी पोरकट आकृती उठून दिसत होती. तिच्या काळ्या केसांच्या डोक्यावर लहानशी त्याच रंगाची टोपी होती. आताच घडलेल्या खुनाने तिच्या व्यक्तिमत्वाची उभारी कमी झाली नव्हती.

मी माझी ओळख करून दिली. तिने झटपट समजून घेऊन मान हलवली.

ती म्हणाली, “मी नेहमी तुम्ही व तुमचा मित्र पायरोचे नाव ऐकले आहे. तुम्ही दोघांनी नवलपूर्ण गोष्टी केल्या आहेत, नाही का? माझ्या नवऱ्याने तुम्हाला लवकर इथे आणून, फार हुशारी दाखवली आहे. आता तुम्ही मला प्रश्न विचाराल का? तेच सोपे पडेल, नाही का? या भयंकर प्रकरणाविषयी तुम्हाला सर्व काही जाणून घेता येईल.”

“मिसेस हॅव्हेरिंग, मी तुमचा आभारी आहे. तो मनुष्य आला, ती कुठली वेळ होती?”

“साधारण नऊपूर्वीची वेळ असावी. आम्ही रात्रीचे जेवण संपवले होते. आणि कॉफी व सिगरेटच्या प्रतिक्षेत बसलो होतो.”

“तुमचा नवरा आधीच लंडनला गेला होता?”

“हो. तो ६:१५ च्या गाडीने गेला.”

“तो स्टेशनपर्यंत मोटारीने गेला का, की चालत गेला?”

“आमची स्वतःची मोटार इथे नाही. एल्मर्स डेल येथील गॅरेजमधून त्याला स्टेशनवर नेण्यासाठी मोटार आली होती.”

“मिस्टर पेस नेहमीसारखेच होते का?”

“अगदी रोजच्यासारखेच होते.”

“आता तुम्ही भेटायला आलेल्या माणसाचे वर्णन करू शकाल का?”

“मला वाटते, नाही. मी त्याला पाहिले नाही. मिसेस मिडलटनने त्याला सरळ बंदुकीच्या खोलीत नेले आणि मग काकांना सांगायला आली.”

“काका काय म्हणाले?”

ते जरा चिडले. पण लगेच गेले. त्यानंतर पाच मिनिटांनी, मी आवाज चढलेले ऐकले. मी हॉलमध्ये धावले. आणि मिसेस मिडलटनवर आपटले. मग आम्ही ठो असा आवाज ऐकला. बंदुकीच्या खोलीचे दार आतून बंद होते. आणि आम्हाला घराभोवती फिरून त्या खोलीच्या खिडकीशी जावे लागले. अर्थात त्याला काही वेळ लागला. त्यामुळे, तोपर्यंत खुनी पसार झाला होता. आमचे बिचारे काका” --- तिचा आवाज थरथरू लागला --- “त्यांना डोक्यात गोळी लागली होती. ते मेलेले मला लगेच कळले. मी मिसेस मिडलटनला पोलिसांना आणायला पाठवले. मी कुठल्याही वस्तूला हात न लावायची काळजी घेतली. ती खोली होती, तशीच ठेवली.”

मी पसंतीदर्शक मान हलवली.

“आता शस्त्राकडे?”

“कॅप्टन हेस्टीग्ज, मी अंदाज करू शकते. माझ्या नवऱ्याच्या दोन बंदुका भिंतीला लटकवलेल्या होत्या. त्यातील एक नाहीशी झाली आहे. हे मी पोलिसांच्याही लक्षात आणून दिले. ते दुसरी बंदूक घेऊन गेले. जेव्हा ते गोळी काढतील, तेव्हा त्यांची खात्री होईल.”

“मी बंदुकीच्या खोलीत जाऊ शकतो का?”

“नक्कीच. पोलीसानी ती पाहिली आहे. प्रेत हलवले आहे.”

तिने मला गुन्हा घडला, त्या जागी नेले. त्याच वेळी मिस्टर हॅव्हेरिंग हॉलमध्ये शिरला. माझी माफी मागत, त्याची बायको त्याच्याकडे धावली. माझा शोध एकट्याने सुरु राहिला.

मला हे ताबडतोब कबूल केले पाहिजे, की ते मनाने खचले होते. गुप्तहेरांच्या कादंबरीत ढिगांनी पुरावे असतात. पण इथे मला असामान्य असे काही दिसले नाही. फक्त जिथे मृत मनुष्य पडला होता, तिथे गालीच्यावर रक्ताचा सडा होता. मी मोठ्या काळजीपूर्वक रीतीने सगळे काही नीट तपासले. मी बरोबर आणलेल्या माझ्या लहानशा कॅमेऱ्याने खोलीचे बरेच फोटो काढले. मी खिडकीबाहेरील जमीनदेखील तपासली. पण त्यावर पाऊलांचे इतके ठसे उमटले होते, की त्यावर वेळ घालवणे, काही

कामाचे नव्हते. मला शिकाऱ्याच्या लॉजने जेवढे दाखवले, तेवढे मी बघितले. आता मला एल्मर्स डेलला परत गेले पाहिजे आणि जापशी संपर्क साधला पाहिजे. त्याप्रमाणे, मी हॅव्हेरिंग जोडप्याचा निरोप घेतला आणि आम्हाला स्टेशनपसून घरी आणणाऱ्या मोटारीने गेलो.

माटलॉक आर्म्सला मला जाप सापडला आणि त्याने मला प्रेत बघण्यासाठी नेले. हॅरिंग्टन पेस हा लहानसा, घोटून दाढी केलेला, दिसायला अमेरिकन होता. त्याला डोक्याच्या मागील बाजूस गोळी मारण्यात आली होती आणि बंदूक जवळून मारण्यात आली होती.

जापने शेरा मारला, “क्षणभर पेस वळला आणि दुसऱ्याने बंदुक हिसकावून, त्याला ठार केले. आम्हाला मिसेस हॅव्हेरिंगने दिलेल्या बंदुकीत देखील गोळ्या ठासून भरलेल्या होत्या. त्यामुळे बहुधा ज्या बंदुकीने खून झाला, ती सुद्धा पूर्ण भरलेली असणार. काय मूर्खासारख्या गोष्टी लोक करत असतात! दोन भरलेल्या बंदुका घरातील भिंतीला लटकवून ठेवणे विचित्र आहे.”

आम्ही ती थरारक खोली सोडल्यावर, मी विचारले, “तुला या केससंबंधी काय वाटते?”

“अं --- पहिल्यांदा हॅव्हेरिंग लोकांवर माझी नजर होती. हो.” ---माझे आश्चर्योद्गार ऐकून तो पुढे बोलला, “भूतकाळात हॅव्हेरिंग

लोकांकडून एक दोन संदिग्ध घटना झाल्या होत्या. जेव्हा तो मुलगा होता, तेव्हा ऑक्सफर्डला त्याच्या वडीलांच्या चेकवर सही केल्याची विनोदी घटना झाली होती. अर्थात सर्वांनी आरडाओरडा केला. आता तो मोठ्या कर्जात बुडालेला आहे. आणि त्या बाबतीत तो काकांना काही सांगत नसे. पण काकांचे मृत्युपत्र नक्कीच त्याला फायदा करून देणारे असणार. हो, माझी त्याचावर नजर आहे. आणि म्हणूनच तो बायकोला भेटण्यापूर्वी मला त्याच्याशी बोलायचे होते.

पण त्याचे म्हणणे म्हणजे जोडलेले तुकडे वाटत होते. मी स्टेशनवर गेलो व १०:३० ला लंडनला पोचणाऱ्या ६:१५ च्या गाडीने निघालो. तो सरळ त्याच्या क्लबमध्ये गेला, असे तो बोलला. ते खरे असले तर ठीक आहे --- का? कारण म्हणजे हे सिद्ध होईल, की तो इथे काळी दाढी लावून, त्याच्या काकांना बंदुकीचा नेम धरून मारत नव्हता!"

"आहा, हो. मी तुला विचारणार होतो, की तुला दाढीबद्दल काय वाटते?"

जापने डोळे फडफडवले. "मला वाटते, ती फार लवकर वाढते --- एल्मर्स डेलपासून शिकारी लॉजपर्यंतच्या पाच मैलात ती वाढली. मी भेटलेले बहुतेक अमेरिकन घोटून दाढी केलेले होते.

खुनी शोधायचा तर ते मिस्टर पेसच्या अमेरिकन सहकाऱ्यांपैकी कुणाला तरी शोधायला पाहिजे. मी पहिल्यांदा नोकराणीला हे विचारले व मग मिसेस हॅव्हेरिंगला. त्यांच्या गोष्टी तशा ठीक होत्या. पण मिसेस हॅव्हेरिंगला तो आलेला मनुष्य बघायला मिळाला नाही. ती चलाख बाई आहे. तिने आपल्याला त्याला शोधायला सोपे जाईल, असे काही सांगितले असते."

मी बसलो व पायरोला सगळा लांबलचक वृतांत लिहिला. त्यात पुढे मी अनेक प्रकारची माहिती टाकून ते पत्र पोस्टात टाकले.

पोलिसांकडे असलेल्या बंदुकीसारख्याच बंदुकीतून, गोळी मारली गेली होती. अजून म्हणजे मिस्टर हॅव्हेरिंगच्या त्या रात्रीच्या हालचाली पुन्हा पुन्हा तपासून बघितल्या गेल्या. आणि संशयातीतपणे हे सिद्ध झाले की, तो खरोखर लंडनमध्ये त्याने सांगितलेल्या गाडीने आला होता. आणि तिसरे म्हणजे, भावनिक प्रगती झाली होती. इएलिंग येथील शहरात रहाणाऱ्या सभ्य माणसाने सकाळी रेल्वे स्टेशनकडे जाण्यासाठी हेवन ग्रीन ओलांडतांना, तपकिरी कागदाचे पुडके कुंपणाला चिकटवलेले पाहिले होते. ते उघडल्यावर, त्यात बंदूक होती. त्याने ते स्टेशनवरील पोलिसाच्या हवाली केले. आणि रात्रीपूर्वी ते ज्याचा शोध घेतला जात होता, तेच असल्याचे आढळले. ते मिसेस

हॅव्हेरिंगच्या घरून आणलेल्या बंदुकीशी मिळतेजुळते होते. त्यातून एक गोळी चालवून बघितले गेले.

हे मी माझ्या वृतांतात वाढवले. दुसऱ्या दिवशी सकाळी मी न्याहारी करतांना पायरोकडून तार आली.

अर्थात काळी दाढीवाला माणूस मिस्टर हॅव्हेरिंग नव्हता, अशी कल्पना फक्त तुझी किंवा जापचीच असू शकते. मला नोकराणीचे व मालकिणीचे वर्णन पाठव. त्यांनी कुठले कपडे घातले होते, वगैरे. घराचे आतील फोटो घेण्यात वेळ फुकट घालवू नको. ते फारसे काही सांगू शकत नाहीत व फार कलात्मक देखील नाहीत.''

असे दिसत होते, की पायरोची पद्धत गरज नसतांना, चेष्टेखोर स्वरूपाची होती. शिवाय सर्व सुखसोयींसकट मी केसच्या जागी हजर असल्याने, त्याच्या वागण्यात थोडा हेवा वाटत असल्याचा रंग मला दिसला होता. त्या दोन बायकांच्या कपड्यांचे वर्णन मागवणे मला फार बेकार वाटत होते. पण शेवटी तो सांगेल तसे करायचे मी कबूल केलेला मनुष्य असल्याने, मी ते वर्णन मिळवले.

अकरा वाजता, पायरोकडून उत्तराची तार आली.

जापला उपदेश: फार उशीर होण्यापूर्वी, नोकराणीला अटक करा.''

अवाक होऊन मी ती तार जापकडे नेली. त्याने हळू श्वास रोधून, ती वाचली. मिस्टर पायरो, तू असे म्हणत असशील, तर त्यात तथ्य असले पाहिजे. मला त्या बाईचा संशय आला नव्हता. पण तिला अटक करण्याइतके हे प्रकरण ताणावे का, ते मला समजत नव्हते. पण मी तिच्यावर नजर ठेवायचे ठरवले. मी तिथे परत जाऊन, तिच्याकडे परत बघायचे ठरवले होते."

पण त्याला उशीर झाला होता. ती सर्वसामान्य व मान देण्यासारखी वाटणारी मध्यमवयीन मिसेस मिडलटन बाई हवेत नाहीशी झाली होती. तिची बॅग घरात राहिली होती. त्यात फक्त कपडे होते. त्यातून ती कुठे गेली याबद्दल, किंवा तिच्या आस्तित्वाबद्दल काही मागमूस लागत नव्हता.

मिसेस हॅव्हेरिंगकडून आम्ही जमेल तेवढी माहिती काढण्याचा प्रयत्न केला.

"तीन आठवड्यांपूर्वी जेव्हा आमची आधीची नोकराणी, मिसेस इमेरी गेली, तेव्हा आम्ही हिला ठेवले. माउंट रस्त्यावरील मिसेस सेलबोर्न या प्रसिद्ध दलालाकडून ती आली होती. माझे सर्व नोकर मी तिथूनच मिळवते. त्यांनी माझ्याकडे खूप बायका पाठवल्या. पण ही मिसेस मिडलटन मला सर्वात बरी वाटली. तिच्या ओळखी पण चांगल्या वाटल्या. मी तिथल्या तिथे तिची

नियुक्ती करून टाकली. आणि मिसेस सेलबोर्नला तसे कळवून टाकले. माझा विश्वास बसत नाही, की या प्रकरणात तिचा काही हात असेल. ती अगदी चांगली, शांत बाई होती.”

हे अजूनच गूढ होत चालले होते. पण एवढे समजत होते, की त्या बाईने आपण होऊन काही गुन्हा केलेला नसावा. कारण जेव्हा गोळी चालवली गेली, तेव्हा मिसेस हॅव्हेरिंग हॉलमध्ये तिच्याबरोबर होती. तथापि खुनाशी तिचा काहीतरी संबंध असला पाहिजे. नाहीतर ती नाहीशी व्हायचे काय कारण?

मी अलीकडील बातम्या पायरोला कळवल्या. आणि मिसेस सेलबोर्नकडे चौकशी करून, लंडनला परतत असल्याचे कळवले.

ताबडतोब पायरोचे उत्तर आले. “मिसेस सेलबोर्नकडे चौकशी करण्यात काही अर्थ नाही. त्यांनी तिच्याबद्दल काही ऐकले नसेल. ती प्रथम शिकारी लॉजमध्ये आली, तेव्हा तिने कुठले वाहन वापरले होते, याची चौकशी करा.”

मी चक्रावून गेलो, तरी आज्ञा पाळली. एल्मर्स डेल या गावात वाहतुकीची साधने फारशी नव्हती. स्थानिक गॅरेजमध्ये जुन्या दोन फोर्ड गाड्या होत्या आणि दोन स्टेशन विमाने होती. त्या तारखेला त्यातील कुठलेच वापरले गेले नव्हते. मिसेस हॅव्हेरिंगला विचारल्यावर, ती म्हणाली, की तिने तिच्या नवीन नोकराणीला

डर्बीशायरला यायला पैसे दिले होते. आणि ते मोटार करण्यासाठी पुरेसे होते. कुणाला लागली, तर एक फोर्ड मोटार स्टेशनवर उभी असे. पण असे आढळले, की त्या संध्याकाळी स्टेशनवर कुणी काळी दाढीवाली किंवा इतर परकी व्यक्ती आलेली नव्हती. सर्व बाबी लक्षात घेता, असा निष्कर्ष निघत होता, की खुनी शिकारी लॉजमध्ये मोटारीने आला व ती त्याला नंतर नेण्यासाठी हातभर अंतरावर उभी होती. आणि त्याच मोटारीने नोकराणी नवीन नोकरीवर रुजू झाली होती. मी हे देखील सांगू शकतो, की लंडनमधील दलालाच्या चौकशीतून पायरोची भविष्यवाणी निघाली होती. त्यांच्याकडील नोंदीमध्ये मिसेस मिडलटन असा काहीही उल्लेख नव्हता. त्यांच्याकडे मिसेस हॅव्हेरिंगला नोकराणी हवी असल्याची नोंद होती. आणि त्यांनी तिच्याकडे त्याचे बरेचसे अर्ज पाठवले होते. जेव्हा तिने त्यांना त्यांच्या कामाची फी पाठवली, तेव्हा ती हे सांगायला विसरली, की तिने कुणाला कामावर ठेवले आहे.

थोडा उदास आणि निराश होऊन, मी लंडनला परतलो. मी पायरोला शेकोटीशेजारी हाताच्या खुर्चीत झगमगीत गाउन घालून बसलेले पाहिले. त्याने मला प्रेमाने अभिवादन केले.

माझ्या मित्रा हेस्टीग्ज, तुला बघून मला खूप आनंद झाला आहे. तसेही मला तुझ्याबद्दल प्रेम आहेच आणि तुला स्वतःला मजा आली का? तू जापबरोबर धावपळ केलीस का? तुझे मन भरेपर्यंत तू प्रश्न विचारून काही शोधून काढलेस का?"

मी ओरडलो, "पायरो, पण सर्वत्र अंधार आहे. हे गूढ कधीच सुटणार नाही."

"हे खरे आहे, की आपण विजयी होऊच असे नाही."

"खरोखर ही फोडायला अवघड अशी फार कडक बी आहे."

"पण माझ्याबाबतीत बोलायचे झाले, तर मी असल्या बिया फोडण्यात माहीर आहे. जणू चपळ खार! यात मला काही लाज वाटत नाही. हॅरिंग्टन पेसला कुणी मारले, हे मला चांगले ठाऊक आहे."

तुला माहिती आहे? तू ते कसे शोधून काढलेस?"

"माझ्या तारांना तू जी झगमगती उत्तरे पाठवलीस, त्यावरून मी सत्यापर्यंत पोचलो. इकडे बघ हेस्टीग्ज, आपण पद्धतशीरपणे गोष्टी तपासू. हॅरिंग्टन पेस हा नशीबवान माणूस आहे. तो मरणात त्याच्या पुतण्याला संशयातीतपणे मागे टाकेल. मुद्दा क्रमांक १ त्याचा पुतण्या खूप गरीब आहे. मुद्दा क्रमांक २ त्याचा पुतण्या,

आपण असे म्हणू शकू का, की जरा नैतिक आधिष्ठान नसलेला म्हणून प्रसिद्ध आहे. मुद्दा क्रमांक ३.”

“पण रॉजर हॅव्हेरिंगने सरळ लंडनपर्यंत प्रवास केल्याचे सिद्ध झाले आहे.”

“नेमकेपणे --- त्यामुळे मिस्टर हॅव्हेरिंगने ६:१५ वाजता एल्मर्स डेल सोडले आणि त्यापूर्वी मिस्टर पेसला मारण्यात आले नसावे. नाहीतर डॉक्टरने प्रेत तपासले, तेव्हा गुन्ह्याची वेळ चुकीची सांगितली असती. त्यामुळे आपण योग्य निष्कर्ष काढला, की त्याने खून केला नाही. पण हेस्टीग्ज, तिथे मिसेस हॅव्हेरिंग आहे.”

“अशक्य! जेव्हा बंदूक चालवली गेली, तेव्हा तिथे नोकराणी तिच्याबरोबर होती.”

“हो, होती पण पण नंतर ती नाहीशी झाली.”

“ती सापडेल.”

“मला तसे वाटत नाही. त्या नोकराणीविषयी काही गोम आहे, असे तुला वाटत नाही का? माझ्या ते लगेच लक्षात आले.”

“तिने तिची कामगिरी केली. आणि गूढ उकलायच्या वेळी ती पळाली.”

“आणि तिची कामगिरी काय होती?”

“बहुतेक तिचा मित्र असलेल्या, काळ्या दाढीवाल्याला प्रवेश देणे.”

“नाही. नाही. ते तिचे काम नव्हते. तिचे काम तू आता सांगितल्या गोष्टींवरून असे वाटते आहे, की मिसेस हॅव्हेरिंगला गोळी उडाल्याच्या वेळी ती तिथे नसल्याचे भासवण्यास मदत करणे. आणि माझ्या मित्रा, ती कुणालाही सापडू शकणार नाही. कारण ती अस्तित्वातच नाही!” तुमचा थोर लेखक शेक्सपिअर म्हणतो, त्याप्रमाणे ‘तिथे अशी कुणी व्यक्ती नव्हतीच.’”

मला हसू दाबता येत नव्हते. मी पुटपुटलो, “तो डिकन्स होता. पण पायरो, तुला काय म्हणायचे आहे?”

“झोई हॅव्हेरिंग ही लग्नापूर्वी अभिनेत्री होती. तू व जापने अंधारी हॉलमध्ये एक पुसट, मध्यमवयीन, आवाज कमावलेली, काळी आकृती पाहिली. तुला, जापला किंवा स्थानिक पोलिसाला हे कळले नाही, की ती नोकरांणी मिसेस मिडलटन व तिची मालकीण, मिसेस हॅव्हेरिंग या दोघींना एका वेळेस कुणीच पाहिले नाही.

हा त्या हुशार आणि धीट बाईसाठी पोरखेळ होता. तिच्या मालकिणीला बोलावण्यापूर्वी ती वर धावत जाते. मोठा आगीच्या रंगाचा खमीज घालते आणि कुरळे केस चिकटवलेली टोपी घालते.

असे झटपट वेषांतर करण्याचे कसब वापरते. भरभर केलेले बदल! काढून टाकलेला मेकप! लालीचा हलकासा हात! आणि झगमगती झोई हॅव्हेरिंग तिच्या किणकिणत्या आवाजासकट खाली येते. कोणीही नोकराणीला निरखून बघितलेले नसते. ते असे का बघतील? तिचा गुन्ह्याशी संबंध जोडण्याचे काही कारण नसते. तिची पण काही वेगळी ओळख असते.''

''पण इएलिंगला कुंपणाला चिकटवलेले जे बंदूक असलेले पुडके सापडते, त्याचे काय? मिसेस हॅव्हेरिंगने ते तिथे ठेवलेले नसते?''

''नाही. ते रॉजर हॅव्हेरिंगचे काम असते --- पण ती त्यांची चूक ठरली व त्यामुळे मला मार्गदर्शन मिळाले. बंदुकीने खून केलेल्या माणसाने ती घेऊन लगेच पोबारा केला. पण त्याने लंडनपर्यंत ती त्याच्याबरोबर नेली नाही. नाही. हेतू स्पष्ट होता. पोलिसांचे लक्ष डर्बीशायरपासून व शिकाऱ्याच्या लॉजपासून दूर वळवायचे. अर्थात इएलिंगला जी बंदूक सापडते त्याने मिस्टर पेसचा खून झालेला नसतो. रॉजरने त्यातून एक गोळी चालवून ती लंडनला आणलेली असते. तो सरळ त्याच्या क्लबमध्ये जाऊन त्याचे निरपराधीत्व सिद्ध करायला बघतो. मग झटपट इएलिंगला जातो. ते अंतर फक्त वीस मिनिटांचे असते. जिथे ते पुडके सापडले, तिथे

ठेवतो व परत गावाला जातो. ती सुंदर बाई, त्याची बायको जेवणानंतर शांतपणे मिस्टर पेसला ठार मारते --- तुला आठवते का, त्याला पाठीमागून मारण्यात आलेले असते? दुसरा वैशिष्ट्यपूर्ण मुद्दा म्हणजे, ती बंदूक भरून परत जागेवर ठेवते. आणि मग तिचे ठरवलेले छोटेसे नाटक सुरु करते."

मी प्रभावित होऊन, पुटपुटतो, "हे अशक्य आहे, तरीही --- "

"आणि तरीही, ते खरे आहे. माझ्या मित्रा, खात्रीने, ते खरे आहे. पण त्या अमूल्य जोडीला कसे पकडायचे, ती वेगळी गोष्ट आहे. जापला जे शक्य आहे, ते त्याने करावे --- मी त्याला सर्व काही लिहिले आहे --- पण हेस्टीग्ज, मला भीती वाटते, की आपल्याला त्यांना त्यांच्या नशीबावर किंवा देवाच्या दयेवर सोडून द्यावे लागेल. तुला त्यातील जे पसंत पडेल, ते!"

मी त्याला आठवण करून दिली, "खाडीतील हिरव्या झाडासारखा तो दुष्टावा माझ्या नजरेसमोरून तरळून गेला."

"पण हेस्टीग्ज, काय किंमत देऊन! माझ्यावर विश्वास ठेव. किंमत नेहमीच चुकती करावी लागते."

पायरोचे भविष्यकथन पक्के झाले. जापला त्याचे म्हणणे पटले, तरी ते सिद्ध करण्यासाठीचे जरूर ते पुरावे, त्याला गोळा करता आले नाहीत.

मिस्टर पेसचे सगळे पैसे त्या खुन्यांच्या हातात पडले. तथापि त्याना शाप भोवला. जेव्हा मी वर्तमानपत्रात वाचले, की रॉजर आणि मिसेस हॅव्हेरिंग पॅरीसला जाणाऱ्या चिरडल्या गेलेल्या विमानात होते, तेव्हा मी त्याना न्याय मिळाल्याचा सुस्कारा टाकला.

## अनुवादिकेची ओळख



# डॉ. वृषाली जोशी

B Sc, M A, M Ed, Ph D

२५ अनुवादित कथा मराठी मासिकामधून प्रसिद्ध झाल्या आहेत. ई साहित्यतर्फे तीस पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत.

मराठी व इंग्रजी माध्यमांच्या शाळाकॉलेजमध्ये अध्यापन केले आहे.

संशोधन प्रकल्पात सहभाग घेतला आहे.


कॉलेजमध्ये प्राचार्यपद भूषवले आहे.


सुगमसंगीत स्पर्धेत पारितोषिके, सिंथेसायझरवर गाणी वाजवण्याचा, कविता करण्याचा व शब्दकोडी बनवण्याचा छंद आहे.

संपर्क: वृषाली जोशी ७, अक्षय, २० तुळशीबागवाले कॉलनी पुणे ४११००९, चलभाष ९९२१७४६२४५


ज्या कव्हरवर क्लिक कराल
ते पुस्तक उघडेल
(नेट आवश्यक)


## डॉ. वृषाली जोशी यांची पुस्तके










*Agatha Christrie*












# डॉ. वृषाली जोशी यांची पुस्तके


ज्या कव्हरवर क्लिक कराल


ते पुस्तक उघडेल


(नेट आवश्यक)














वृषाली जोशी
विश्वकथा१



वृषाली जोशी
विश्वकथा-२


वृषाली जोशी
विश्वकथा-३



वृषाली जोशी
विश्वकथा-४



वृषाली जोशी
अंतोन चेकॉव्ह
कंटाळवाणी गोष्ट
Classics To Go
A Dreary Story
Anton Chekhov


वृषाली जोशी
साकीच्या कथा
HECTOR HUGH
MUNRO SAKI


THE PICTURE OF
DORIAN GRAY
द पिक्चर ऑफ
डोरिअन ग्रे
वृषाली जोशी
OSCAR WILDE



सॉमरसेटमॉम
मेजवानीपूर्वी
व इतर कथा
अनुवाद
वृषाली जोशी
BEFORE
THE PARTY



वृषाली जोशी
THE SHAKESPEARE
STORIES
A MIDSUMMER NIGHT'S DREAM
THE MERCHANT OF VENICE
शेक्सपिअरच्या चार कथा
Much Ado
about
Nothing
Twelfth
Night






शेरलॉक होम्स
भाग १ ते ८ (५० कथा)


ज्या कव्हरवर क्लिक कराल ते पुस्तक उघडेल








**ई साहित्य प्रतिष्ठानचे हे चौदावे वर्ष.**
**डॉ. वृषाली जोशी यांचे हे तिसावे पुस्तक.**

डॉ. वृषाली जोशी या मराठी व इंग्रजी या भाषांच्या विद्वान आहेत. त्या प्राचार्य होत्या. त्यांनी काही काळ विदेशात राहून तेथल्या वाचन संस्कृतीचा अनुभव घेतला आहे. तशी वाचन संस्कृती महाराष्ट्रातही निर्माण व्हावी असे त्यांना वाटते. वाचकांची अभिरुची वाढली तरच लेखकांकडूनही दर्जेदार साहित्य निर्माण होईल. इंग्रजीतील उच्च दर्जाचे निवडक लेखकांचे साहित्य मराठीत अनुवाद करून मराठी वाचकांची अभिरूची संपन्न व्हावी यासाठी त्या अतोनात कष्ट घेतात. तसे पहाता अनुवादित पुस्तकांना अनेक व्यावसायिक प्रकाशकांकडून मागणी असते. परंतु मराठीतील जास्तीत जास्त वाचकांपर्यंत आपले साहित्य जावे म्हणून त्यांनी ई साहित्यची निवड आपल्या पुस्तकांसाठी केली आहे.

डॉ. वृषाली जोशी यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू

गणपुले (९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (२०), शुभांगी पासेबंद(१४), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(८), डॉ. नितीन मोरे (३५), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(१२), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (५० खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १७ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (११), डॉ. वृषाली जोशी(३०), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (१३), अंकुश शिंगाडे(१६), आनंद देशपांडे(४), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(४) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(३), अरुण कुळकर्णी(८), जगदिश खांदेवाले(५) पंकज कोटलवार(५) डॉ. सुरुची नाईक (३) डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे(४), रामदास खरे(४), अतुल देशपांडे, श्याम कुलकर्णी, किशोर कुलकर्णी असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी लेखक ई साहित्यच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं ’इ’यें ।
दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।